रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ३५४ ▌पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ३१ मे २०२६

किंमत ४ ₹

## भीषण अपघातात मायलेकी जागीच ठार

**पोलादपूर** : मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील लोहारे हद्दीत रसत्याबाहेर उभ्या आयशर ट्रकला भरधाव कारने मागील भागात धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील मायलेकी जागीच ठार झाल्या, तर बापलेक गंभीररित्या जखमी झाले. हे कुटुंब अहिल्यानगर येथून दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठामध्ये चालले होते. पोलादपूर तालुक्यातील महामार्गावर रस्त्याबाहेर आयशर ट्रक (क्र. एमएच ४ एलवाय १६३८) उभा करून चालक नदीकिनारी शौचास गेला असता उभ्या असलेल्या ट्रकला मागून येणाऱ्या कारने (एमएच ०८एएन २४३९) पान २ वर

## गृहविभाग 'पांडू हवालदार' चालवतोय!

**मुंबई** : महाराष्ट्रातील कायदा सुव्यवस्था रसातळाला गेली असून, खालच्या स्तरापासून मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यापर्यंत हप्ते पोहोचवले जात आहेत. हप्तावसुलीमुळे पोलीस प्रशासनावर कोणाचाही वचक राहिलेला नाही, म्हणूनच राज्यात ड्रग्जचा खुलेआम काळाधंदा सुरु आहे, गांजा विकला जातो, हातभट्ट्या व विषारी दारुने थैमान घातले आहे. या अवैध धंद्यातूनच पुण्यात विषारी दारुने २२ निष्पाप लोकांचे बळी घेतले आहेत. राज्याचा गृहविभाग 'पांडू हवालदार' चालवत असल्यामुळेच सगळीकडे बेबंदशाही माजली आहे, असा घणाघाती आरोप करत देवेंद्र फडणवीस यांनी याचे प्रायश्चित घेऊन राज्याला पूर्णवेळ सक्षम पान २ वर

### मुंबई, दिल्ली पुन्हा दहशतवाद्यांच्या रडारवर

# बॉम्बस्फोटाचा कट उधळला

## आयएसआयच्या नऊ जणांना अटक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशाची राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबईसह अनेक महत्त्वाच्या शहरांना लक्ष्य करण्याचा मोठा दहशतवादी कट सुरक्षा यंत्रणांनी उधळून लावला आहे. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने (स्पेशल सेल) पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि मुंबई अंडरवर्ल्ड नेटवर्कशी संबंधित नऊ संशयितांना शनिवारी अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात शस्त्रे, स्फोटके आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले आरोपी दिल्ली, मुंबई आणि पंजाबमधील असून, काही परदेशी नागरिकांचाही त्यामध्ये समावेश आहे. हे संपूर्ण मॉड्यूल पाकिस्तानस्थित आयएसआय आणि अंडरवर्ल्डमधील सूत्रधारांच्या निर्देशानुसार कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

तपास यंत्रणांच्या प्राथमिक चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशातील अणुऊर्जा केंद्रे, प्रमुख विमानतळ, रेल्वे स्थानके, वीज निर्मिती केंद्रे, पान २ वर

### मुंबईतील दादरमध्ये रेकी केल्याचा संशय

तपास यंत्रणांच्या प्राथमिक चौकशीत अटक करण्यात आलेल्या काही संशयितांनी मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणांची रेकी (पाहणी) केल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः दादर परिसरातील गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्थानक परिसर आणि सार्वजनिक वाहतूक केंद्रांची पाहणी करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दादर हे मुंबईतील सर्वाधिक वर्दळीचे रेल्वे जंक्शन आणि मध्यवर्ती वाहतूक केंद्र असल्याने ते संभाव्य लक्ष्यांच्या यादीत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींचे मोबाईल फोन, डिजिटल उपकरणे, लोकेशन डेटा आणि संपर्कांची तपासणी सुरू असून, त्यांनी मुंबईतील आणखी कोणत्या ठिकाणांची रेकी केली होती याचा शोध सुरक्षा यंत्रणा घेत आहेत.

# अ‍ॅड. गौतम पाटील यांचा गौरव

## डॉक्टरेट पदवीसह प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागचे सुपुत्र आणि सामाजिक, शैक्षणिक, कायदेविषयक तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अ‍ॅड. गौतम पाटील यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा सन्मान प्राप्त झाला आहे. त्यांच्या बहुआयामी आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत त्यांना थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित करण्यात आलेल्या ३६ व्या 'वर्ल्ड स्कूल समिट'मध्ये 'आऊटस्टँडिंग एज्युकेशनल अ‍ॅडमिनिस्ट्रेटर' या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले.




शनिवार, दि. ३० मे रोजी बँकॉक येथील आलिशान मॅरियट मार्किस क्विन्स पार्क हॉटेलमध्ये हा सोहळा पार पडला. ऑलिम्पिक पदक विजेत्या भारताच्या पहिल्या महिला कुस्तीपटू साक्षी मलिक यांच्या हस्ते अ‍ॅड. गौतम पाटील यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याच कार्यक्रमात त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि नेतृत्वक्षम योगदानाचा गौरव म्हणून अमेरिकेतील मेरीलँड स्टेट युनिव्हर्सिटीकडून त्यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी इन एज्युकेशन' ही मानद डॉक्टरेट पदवी बहाल पान २ वर




### वेधक

## 'तारीख पे तारीख'ला लगाम

**नवी दिल्ली** : न्यायालयीन कामकाजातील विलंब रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व उच्च न्यायालयांना महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. राखून ठेवलेले निकाल आता तीन महिन्यांच्या आत देणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, तीन महिन्यांत निकाल न दिल्यास संबंधित प्रकरण मुख्य न्यायाधीशांच्या निदर्शनास आणले जाईल. त्यानंतरही निकाल न आल्यास प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे वर्ग केले जाऊ शकते. तसेच मुख्य आदेश जाहीर केल्यानंतर १५ दिवसांच्या आत संपूर्ण कारणांसह निकाल अपलोड करणे अनिवार्य केले आहे. जामीन प्रकरणांमध्ये निकाल राखून ठेवल्यास त्यावर शक्यतो दुसऱ्याच दिवशी निर्णय देण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित राहणाऱ्या खटल्यांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महामार्गालगत महिलेचा मृतदेह

**नेरळ** : कर्जत-खोपोली महामार्गावरील पळसदरी-तळवली दरम्यान रस्त्यालगतच्या खड्ड्यात ३५ ते ४० वर्षीय अज्ञात महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. स्थानिकांना दुर्गंधी येत असल्याने त्यांनी पाहणी केली असता मृतदेह आढळून आला.घटनेची माहिती मिळताच कर्जत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक अंदाजानुसार महिलेचा मृत्यू सुमारे पाच दिवसांपूर्वी झाला असावा.मृत महिलेच्या अंगावर कुर्ती व निळ्या रंगाची पॅन्ट असून उजव्या पान २ वर

## जंगलात अज्ञात तरुणाचा मृतदेह

**धाटाव** : रोहा तालुक्यातील नागोठणेजवळील पाटणसई गावाजवळील ऊनाठावाडी जंगल परिसरात एका अज्ञात तरुणाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. स्थानिक रहिवासी काशिनाथ शिंदे यांना खेकडे पकडण्यासाठी जंगलात गेल्यानंतर हा मृतदेह आढळला. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर रोहा आणि नागोठणे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मयताचे वय अंदाजे १८ ते २३ वर्षे असून, मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटलेली नाही. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून खून, पान २ वर

# बाळाराम पाटील यांची फेरनिवड

- 'रयत'च्या रायगड विभागाचे चौथ्यांदा चेअरमनपदी निवड
- पनवेलमध्ये भव्य सत्कार सोहळा



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आशिया खंडातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय चेअरमनपदी माजी आमदार बाळाराम पाटील यांची चौथ्यांदा फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचा पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भव्य सत्कार करण्यात आला.

आमदार दत्तूशेठ पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती, पनवेल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभात समितीचे सभापती नारायण घरत आणि सचिव प्रकाश नाईक यांच्या हस्ते बाळाराम पाटील यांचा गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम २९ मे रोजी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सत्काराला उत्तर देताना बाळाराम पाटील यांनी रायगड विभागातील शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देण्याचा संकल्प व्यक्त केला. रायगड विभागामध्ये ठाणे, रायगड, पनवेल, पालघर, मुंबई आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांचा समावेश असून, या सर्व भागांतील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अधिक प्रभावी काम करण्याचा निर्धार त्यांनी व ्यक्त केला. पान २ वर

# सख्ख्या भावावर जीवघेणा हल्ला

- डोक्यात कोयत्याचे घाव, आरोपी मोकाटच?
- गंभीर जखमी असूनही साधारण दुखापतीचा अहवाल?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आक्षीमध्ये सख्ख्या भावानेच आपल्या भावावर भरदिवसा कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे संतापाची लाट उसळली असून, डोक्यावर धारदार कोयत्याने वार करून गंभीर जखमी करण्यात आलेल्या वयोवृद्धावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, हल्ल्यानंतर वैद्यकीय अहवाल आणि पोलिसांच्या कारवाईवर



गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नंदकुमार गोपळ राणे असे जखमी वयोवृद्धाचे नाव असून, ते आक्षी येथील रहिवासी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, घराच्या दुरुस्तीच्या कामादरम्यान हिस्स्याच्या जागेतील टाईल्स बदलण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. याच रागातून सुधाकर गोपाळ राणे पान २ वर






# सरकारी जमीन टोरंटच्या ताब्यात ?

■ शिवसेनेचा आक्रमक पवित्रा

■ ५ जूनला मोर्चाची घोषणा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल-खलाटी परिसरातील तब्बल ९९ एकर महसूल जमीन टोरंट एनर्जी पॉवर स्टोरेज सोल्युशन लिमिटेड या खासगी कंपनीला ३० वर्षांच्या भाडेकरारावर देण्यात आल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या निर्णयाविरोधात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी कर्जत तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याची घोषणा जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे यांनी केली.

पत्रकार परिषदेत बोलताना बाबू घारे यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप करत, स्थानिक जनतेच्या हक्काची जमीन खासगी कंपनीच्या घशात घालण्याचे काम सुरू आहे. वन विभागानंतर आता महसूल विभागानेही टोरंट कंपनीसाठी लाल गालीचा अंथरला आहे, अशी टीका केली. घारे यांच्या म्हणण्यानुसार, सावळे ते कोटींबे गावादरम्यानची सुमारे ३७ हेक्टर (९९ एकर) जमीन ६ मे २०२६ रोजी ३० वर्षांच्या भाडेकरारावर कंपनीला देण्यात आली. या करारासाठी शासनाला केवळ २ कोटी ८० लाख रुपये मिळाल्याचा दावा त्यांनी केला. ही जमीन सरकारी प्रकल्पासाठी वापरण्यात आली असती तर स्थानिकांना रोजगार आणि विकासाच्या संधी मिळाल्या असत्या, असेही त्यांनी सांगितले.



## पर्यावरण दिनी आंदोलनाचा इशारा

**टोरंट प्रकल्पासह पोशीर आणि शिलार धरण प्रकल्पांच्या विरोधात ५ जून रोजी कर्जतमध्ये भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. पर्यावरण, शेती आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी हा लढा असून प्रकल्पांविरोधातील जनआंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशाराही देण्यात आला.**

## ढाक गावठाणावरही टोरंटची नजर ?

**ढाक येथील विस्तारित गावठाण क्षेत्रातील जमीनही टोरंट कंपनीकडून हस्तगत करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप घारे यांनी केला. यासंदर्भात ग्रामसेवकांशी चर्चा करण्यात आली असून, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन देऊन गावठाणाची जमीन कोणत्याही खासगी कंपनीला हस्तांतरित करू नये, अशी मागणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.**

> **“रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित जमीन टोरंट कंपनीला देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मी केवळ प्राधिकृत अधिकारी म्हणून काम पाहिले असून, शासनाच्या धोरणानुसार जमीन वाटपाची कार्यवाही करण्यात आली आहे.**
> **– कर्जत तहसीलदार”**

# महिलेचा विनयभंग, दोघांविरोधात गुन्हा

। पनवेल । प्रतिनिधी ।

महिलेच्या घरात शिरून तिचा विनयभंग करून तुझा बलात्कार करू व तुम्हा सर्वांना मारून टाकू, अशी धमकी दिल्याप्रकरणी अफजलखान आणि सिराज खान यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित महिलेच्या घरी येऊन आरोपींनी शिवीगाळ केली आणि तू काही बोललीस तर तुला मारून टाकेल असे बोलून आरोपी अफजल खान याने महिलेसोबत जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला आणि सिराज खान वाने त्या महिलेचा विनयभंग केला. यावेळी ओरडलीस तर आम्ही तुला उचलून नेऊन तुझ्यावर बलात्कार करू आणि तुम्हा सर्वांना मारून टाकू अशी धमकी दिली.

# पाले बुद्रुकमध्ये तीनपत्ती जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

। कोलाड । प्रतिनिधी ।

कोलाड पोलीस ठाणे हद्दीतील पाले बुद्रुक येथे सुरू असलेल्या तीनपत्ती जुगार अड्ड्यावर कोलाड पोलिसांनी धडक कारवाई करत चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर धंदे चालविणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पाले बुद्रुक परिसरात छुप्या पद्धतीने तीनपत्ती जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती कोलाड पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत फारने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचून शुक्रवारी (दि. २९) सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास कारवाई केली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगार खेळण्यासाठी वापरण्यात येणारे ५२ पत्ते, पाचशे रुपयांच्या सहा नोटा, रोख रक्कम तसेच केशरी व निळ्या रंगाची चटई असा सुमारे ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस कर्मचारी नितीन गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांकडून सुरू आहे. दरम्यान, कोलाड पोलीस हद्दीतील इतर बेकायदेशीर जुगार व मटका अड्ड्यांचीही माहिती पोलिसांकडून घेतली जात असून, अशा अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा कायम राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# रिक्षाचालकाने बसचालकाच्या डोक्यात मारला हातोडा

। पनवेल । प्रतिनिधी ।

एसटी बस किंचित घासल्याच्या किरकोळ कारणावरून एका माथेफिरू रिक्षाचालकाने थेट एसटी बसचालकाच्या डोक्यात हातोडीने घाव घालत् जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना पनवेलमधील तक्का सिग्नल परिसरात घडली. या हल्ल्यात एसटी चालक गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर संतप्त प्रवाशांनी आरोपी रिक्षाचालकाला पकडून चांगलाच चोप दिला. त्यानंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले.

विटा-मुंबई मार्गावरील एसटी बस पनवेलमधील शिवशंभो नाका येथील चौकात आली. तेव्हा एसटी बस रिक्षाला किंचित घासली गेली. या घटनेनंतर बसचालक आणि रिक्षाचालक यांच्यात जोरदार शाब्दिक वाद सुरू झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर रिक्षाचालक विलास म्हात्रे याने संतापाच्या भरात हातोडी काढून थेट बसचालकाच्या डोक्यावर हल्ला केला. हातोडीचा जोरदार फटका बसल्याने चालक गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. या घटनेनंतर जखमी चालकाला तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, एसटी बसच्या चालकावर झालेला जीवघेणा हल्ला पाहून बसमधील प्रवासी आणि परिसरातील नागरिकांनी आरोपी रिक्षाचालक विलास याला पकडून चांगलाच चोप दिला.

या प्रकारामुळे तक्का सिग्नल परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पनवेल शहर पोलिसांनी आरोपी रिक्षाचालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# रामवाडी बसस्थानक अस्वच्छतेचे आगर

■ प्रवाशांचे हाल, स्वच्छतेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

। पेण । प्रतिनिधी ।

मुंबई, ठाणे परिसरातून कोकणाकडे जाणाऱ्या एसटी प्रवाशांसाठी पेण येथील रामवाडी बस स्थानक हा महत्त्वाचा थांबा मानला जातो. पनवेलनंतर बहुतेक गाड्या थेट रामवाडी येथेच थांबत असल्याने दररोज हजारो प्रवासी येथे उतरतात. मात्र, सध्या या बस स्थानकावर असलेल्या अस्वच्छतेमुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



बसस्थानक परिसरात सर्वत्र घाण साचलेली असून स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. स्वच्छतागृहांमधून येणारी तीव्र दुर्गंधी इतकी असह्य आहे की काही क्षणही तिथे उभे राहणे कठीण होत आहे. त्यातच पाण्याची योग्य सुविधा नसल्याने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळेस कोकणात जाणाऱ्या अनेक गाड्या येथे थांबत असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्यांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. अंधार आणि अस्वच्छतेच्या वातावरणामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी जोर धरत आहे. याबाबत वाहतूक नियंत्रक आर.आर. घरत यांना विचारणा केली असता त्यांनी, येथे स्वच्छतेसाठी केवळ एकच महिला कर्मचारी कार्यरत आहे, अशी माहिती दिली.

महत्त्वाची बाब म्हणजे, कोकणाकडे जाणाऱ्या जवळपास सर्वच एसटी गाड्या रामवाडी बस स्थानकावर थांबत असताना केवळ एका कर्मचाऱ्यावर स्वच्छतेची जबाबदारी टाकणे म्हणजे प्रशासनाचा निष्काळजीपणा असल्याची भावना प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

प्रवाशांच्या मते, वरिष्ठ अधिकारी जाणीवपूर्वक या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत असून, संबंधित विभागाने तातडीने अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी नेमून बसस्थानकाची स्वच्छता सुधारावी, तसेच परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वतः लक्ष घालून स्थानकातील अस्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# व्यसनमुक्तीबाबत जनजागृती होणे आवश्यक

## डॉ. नीलम गोऱ्हे यांचे प्रतिपादन

। पुणे । प्रतिनिधी ।

हडपसरमधील पांढरे मळा परिसरात घडलेल्या विषारी दारू प्रकरणातील मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत मिळावी, तसेच अशा घटना रोखण्यासाठी केवळ दारूबंदी नव्हे तर, व्यसनमुक्तीच्या दिशेने ठोस पावले उचलणे अधिक गरजेचे असल्याचे मत शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

डॉ. गोऱ्हे यांनी आज घटनाग्रस्त कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार राहुल क्षीरसागर, अरुण डाडर, अशोक चव्हाण आणि विजय शर्मा यांच्या कुटुंबीयांना शिवसेना पक्ष व डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यावतीने रोख व धनादेश स्वरूपात आर्थिक मदतही देण्यात आली. याप्रसंगी, नाना भानगिरे, मारुती आबा तुपे, दत्ता खवले, संदीप शिंदे, मोहित काकडे, मयुरी बामणे, निशा थोरात यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, मृत व्यक्तींचे कुटुंबीय बहुतांश असंघटित क्षेत्रातील असल्याने प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, तसेच ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या योजनांचा तातडीने लाभ मिळावा, कुटुंबातील इतर सदस्यांना स्वावलंबी करण्यासाठीही प्रयत्न केले जातील, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी या घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच रुग्णालयाकडून झालेल्या कथित दिरंगाईची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई व्हावी, असेही त्यांनी म्हटले. ‘‘रुग्णाला तातडीने उपचार मिळण्याऐवजी आर्थिक बाबींना प्राधान्य दिले गेले. त्यामुळे काही रुग्णांना वेळेत मदत मिळू शकली नाही,’’ अशी खंत त्यांनी व्यक्त केली.पुणे महापालिकेनेही मृतांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान द्यावे, अशी सूचना आपण महापौर मंजुषा नागपुरे यांना दूरध्वनीवरून केली असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य सरकारही या प्रकरणात संवेदनशील असून योग्य ती मदत केली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, भरवस्तीत अवैध दारू सहज उपलब्ध असणे ही गंभीर बाब असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# पुणे पोलीस आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठवा

## खा. सुप्रिया सुळेंची मागणी

। पुणे । प्रतिनिधी ।

केंद्र सरकारच्या गृहविभागाच्या अहवालानुसार पुणे शहर क्राईमच्या बाबतीत राज्यात पहिले तर देशात पाचवे शहर बनले आहे. पुण्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली आहे. त्यामुळे पुण्याच्या पोलीस आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठवा, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी पुणे येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे. वाढत्या गुन्हेगारीवर त्यांनी नाराजी व्यक्त केली.

केंद्र सरकारच्या गृह विभागाचा अहवाल आहे की, पुणे शहर क्राईमच्या बाबतीत राज्यात पहिले तर देशात पाचवे शहर बनले आहे. त्यामुळे पुण्याच्या पोलीस आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठवा. मुख्यमंत्र्यांवर आमचा विश्वास आहे. नसरापूर प्रकरणातदेखील आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला होता. पोलिसांनी लवकर चार्जशीट दाखल केलं, मात्र हे गुन्हे रोखले पाहिजेत. हे सरकारचे अपयश आहे, हप्ते घेऊन गुन्हे केले जात आहेत, असा आरोपही सुप्रिया सुळे यांनी केला.

# धारण तलाव परिसरातील ३३ झोपड्या उद्ध्वस्त

■ पालिकेच्या अतिक्रमण विभागाची कारवाई

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कळंबोली येथील सिंग हॉस्पिटलसमोरील धारण तलाव परिसरात अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या ३३ झोपड्यांवर पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई करत त्या उद्ध्वस्त केल्या.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. प्रभाग अधिकारी प्रमोद ठाणेकर आणि प्रभाग अधीक्षक अरविंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विरोधी पथकाने धारण तलाव परिसरातील झोपड्यांवर कारवाई केली.



या कारवाईदरम्यान महापालिकेचे संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच अतिक्रमण विरोधी पथकाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तलाव परिसरातील अनधिकृत बांधकामांमुळे पर्यावरणीय तसेच सुरक्षेच्या दृष्टीने निर्माण होणाऱ्या समस्या लक्षात घेऊन ही मोहीम राबविण्यात आल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. महापालिकेकडून शहरातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर यापुढेही नियमितपणे कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही महापालिका अतिक्रमण विभागाच्या प्रशासनाने दिला आहे.

पान १ वरून

## ॲड. गौतम पाटील यांचा गौरव

करण्यात आली. या समारंभाला जगभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. तब्बल ४० देशांतील कर्तृत्ववान व्यक्तींना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले.

‘वर्ल्ड स्कूल समिट’ हे शिक्षण क्षेत्रातील शिक्षक, प्रशासक, संशोधक आणि नवोन्मेषक यांना एकत्र आणणारे जागतिक व्यासपीठ म्हणून ओळखले जाते. ज्ञानविनिमय, शैक्षणिक सहकार्य आणि उत्कृष्ट कार्याचा गौरव या माध्यमातून जगभरातील शिक्षणव्यवस्थेला अधिक सक्षम बनविण्याचे कार्य ही संस्था करत आहे. लंडनमधील प्रतिष्ठित हाऊस ऑफ कॉमन्स आणि हाऊस ऑफ लॉर्ड्ससह भारत, मलेशिया, दुबई आणि बँकॉक येथे यशस्वी अधिवेशने आयोजित करून या व्यासपीठाने जागतिक स्तरावर विशेष ओळख निर्माण केली आहे.

ॲड. गौतम पाटील यांनी वकिली व्यवसायात प्रामाणिकपणा, अभ्यासू वृत्ती आणि समाजहिताचा दृष्टिकोन जपत अनेकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्य केले आहे. कायद्याच्या क्षेत्रासोबतच शिक्षण क्षेत्रातही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, करिअर सल्ला आणि प्रेरणादायी व्याख्यानांच्या माध्यमातून मोलाचे योगदान दिले आहे. उच्च शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक जबाबदारी यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात.

क्रीडा क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग असून, युवकांनी शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक सबलीकरणालाही महत्त्व द्यावे, हा संदेश ते विविध उपक्रमांमधून देत असतात. सामाजिक बांधिलकी जपत विविध लोकहिताच्या उपक्रमांत त्यांनी घेतलेला पुढाकार समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची जागतिक स्तरावर झालेली दखल आणि प्रदान करण्यात आलेली मानद डॉक्टरेट पदवी हा त्यांच्या कार्याचा गौरव असून, अनेक युवकांसाठी ती प्रेरणेचा स्रोत ठरणार आहे. मेहनत, जिद्द, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेची तळमळ यांच्या बळावर यशाची सर्वोच्च शिखरे गाठता येतात, हे ॲड. गौतम पाटील यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे.

सन्मान स्वीकारल्यानंतर बोलताना त्यांनी हा पुरस्कार आपल्या कुटुंबीय, सहकारी, मित्रपरिवार आणि समाजातील सर्व शुभेच्छुकांना समर्पित केला. आगामी काळात शिक्षण, समाजसेवा आणि युवकांच्या सक्षमीकरणासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

ॲड. गौतम पाटील यांच्या या आंतरराष्ट्रीय यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक संस्था, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत. त्यांच्या या यशामुळे अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## बॉम्बस्फोटाचा कट उधळला

सुरक्षा दलांचे जवान आणि महत्त्वाची सरकारी कार्यालये यांना लक्ष्य करण्याची जबाबदारी या गटावर सोपविण्यात आली होती. दिल्ली आणि मुंबईतील गर्दीच्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडवून आणण्याचा कट आखण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

गेल्या काही महिन्यांपासून हे मॉड्यूल सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर होते. गुप्त पाळत आणि तांत्रिक तपासाद्वारे त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले होते. त्यानंतर शनिवारी समन्वित कारवाई करत सर्व आरोपींना अटक करण्यात आली. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी आयएसआय आणि मुंबई अंडरवर्ल्ड नेटवर्कच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. दिल्लीतील महत्त्वाच्या आस्थापनांवर आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांवर हल्ल्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. त्यांच्या ताब्यातून शस्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत.

**टेरर फंडिंगचा तपास सुरू**

अटक करण्यात आलेल्या आरोपींचे सीमापार संबंध, टेरर फंडिंगचे स्रोत, तसेच पाकिस्तान आणि इतर देशांत बसून या कटाचे सूत्र हलविणाऱ्या मुख्य हँडलर्सचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणांनी व्यापक चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणातील आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**या संवेदनशील ठिकाणांवर हल्ल्याचा होता कट**

तपास यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, देशातील अणुऊर्जा प्रकल्प, वीज निर्मिती केंद्रे, विमानतळ, रेल्वे स्थानके, सुरक्षा दलांचे तळ तसेच महत्त्वाची सरकारी कार्यालये या दहशतवाद्यांच्या निशाण्यावर होती. देशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करून मोठी जीवितहानी घडवून आणण्याचा त्यांचा कट होता.

**पाकिस्तानमधून पाठवलेली स्फोटके जप्त**

अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या साहित्यामध्ये पाकिस्तानमधून पाठवण्यात आलेली स्फोटके, ग्रेनेड्स आणि अत्याधुनिक शस्त्रांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर अस्थिरता निर्माण करण्यासाठी या साहित्याचा वापर होणार असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

## सख्ख्या भावावर जीवघेणा हल्ला

यांनी कोयत्याने डोक्यावर वार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शिवीगाळ करत जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप करण्यात येत आहे.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या नंदकुमार राणे यांना रक्तबंबाळ अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, गंभीर स्वरूपाचा हल्ला असूनही वैद्यकीय अहवालात साधारण दुखापत नमूद करण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे डॉक्टरांवर दबाव होता का? गंभीर जखमा लपवण्याचा प्रयत्न झाला का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली असली तरी आरोपी अद्याप मोकाट असल्याचा आरोप करण्यात येत आहे. भरदिवसा कोयत्याने हल्ला होतो, व्यक्ती गंभीर जखमी होते, तरीही तात्काळ कारवाई का झाली नाही? असा सवाल आता उपस्थित होत आहे. राजकीय दबावामुळे पोलीस आणि वैद्यकीय यंत्रणा निष्क्रिय झाली आहे का? जखमी वयोवृद्धाला न्याय मिळणार का? आणि या संपूर्ण प्रकरणात वरिष्ठ अधिकारी नेमकी काय भूमिका घेणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## बाळाराम पाटील यांची फेरनिवड

कार्यक्रमाला पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा चिटणीस प्रकाश म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यालयीन चिटणीस विलास फडके, शेकाप पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी, सचिव प्रकाश नाईक, पनवेल अर्बन बँकेचे संचालक बी.पी. म्हात्रे, वामन शेळके यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य, शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बाजार समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच कार्यक्रमात पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमधून सेवानिवृत्त झालेले निरीक्षक प्रकाश पाटील, कनिष्ठ लिपिक पांडुरंग मोकल आणि सफाई कर्मचारी मधुकर जाधव यांचाही निवृत्तीनिमित्त विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना काशिनाथ पाटील यांनी बाळाराम पाटील यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा गौरव केला.

त्यांनी सांगितले की, ८ मार्च २०१५ रोजी नावडे येथे झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून बाळाराम पाटील यांनी केलेल्या कार्याची दखल घेतली होती. त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच त्यांची रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय चेअरमनपदी निवड झाली. त्यानंतर २०१७ मध्ये ते विधान परिषदेवर आमदार म्हणून निवडून गेले आणि शिक्षक व शिक्षण क्षेत्रासाठी त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची आणि नेतृत्वाची दखल घेत पुणे येथे झालेल्या रयत शिक्षण संस्थेच्या बैठकीत त्यांच्यावर पुन्हा एकदा रायगड विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बाळाराम पाटील यांची चौथ्यांदा झालेली निवड ही त्यांच्या कार्याची पोचपावती असून, याबद्दल सर्व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याचे काशिनाथ पाटील यांनी नमूद केले.

या सत्कार सोहळ्यामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली रायगड विभागातील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## महामार्गालगत महिलेचा मृतदेह

हातात बांगडी आढळली आहे. ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून बेपत्ता महिलांच्या नोंदींची पडताळणी सुरू आहे. हत्या, अपघात किंवा इतर कोणत्या कारणामुळे मृत्यू झाला याचा तपास सुरू असून, घातपाताची शक्यताही पोलिसांनी नाकारलेली नाही.याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, शवविच्छेदन अहवालानंतर अधिक माहिती समोर येणार आहे.

## जंगलात अज्ञात तरुणाचा मृतदेह

सर्पदंश किंवा अन्य कारणांची शक्यता तपासली जात आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात पाठविण्यात आला असून, अहवालानंतर मृत्यूचे गूढ उलगडण्याची शक्यता आहे. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## गृहविभाग ‘पांडू हवालदार’ चालवतोय!

गृहमंत्री द्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, पुण्यात विषारी दारुने २२ जणांचा बळी घेतल्यानंतर सरकारला जाग आली असून, हातभट्या तोडण्याची कारवाई केली जात आहे. या हातभट्ट्या काही रात्रीतून उभ्या राहिलेल्या नाहीत. राज्यात ५०० शहरे व ४३ हजार गावखेडी आहेत, या ठिकाणी अवैध धंदे व हातभट्या राजरोस सुरु आहेत. गुजरातचे महाराष्ट्रात येणारे ड्रग्ज, जामतारा सारखे प्रकरण व अवैध धंद्याचे रॅकेट राजरोस सुरु असून त्याला गृहविभागाचा आशिर्वाद आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांचे ‘सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रिद वाक्यच बदलले आहे. पुण्यातील प्रकरणाने सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात असल्याने स्वतःची अब्रू वाचवण्यासाठी आता कारवाईचे नाटक केले जात आहे.

## भीषण अपघातात मायलेकी जागीच ठार

महामार्ग सोडून जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये कार चालक दापोलीतील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कर्मचारी अनिल रावसाहेब मरकड (वय ४४) आणि मुलगा चिन्मय मरकड (वय५) हे गंभीररित्या जखमी झाले. अनिल मरकड यांना अधिक उपचारासाठी मुंबईकडे पाठविण्यात आले तर मुलगा चिन्मय याला महाडं येथे पाठविण्यात आले आहे. या अपघातामध्ये अनिल मरकड यांच्या पत्नी सुवर्णा मरकड (वय ४५) व मुलगी अनुश्री (वय १६) यांचा अपघातस्थळी जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, उपनिरीक्षक सतीश पवार आणि पोलीस कर्मचारी तसेच नरवीर व काळभैरवनाथ रेक्स्यू टिम तात्काळ घटनास्थळी पोहोचले.

अपघातातील पती अनिल मरकड हे अहिल्यानगरचे मूळ रहिवासी असून पत्नी सुवर्णा मरकड या दापोलीतील भारतीय स्टेट बँकेच्या कर्मचारी आहेत. पोलादपूर ग्रामीण रुग्णालय येथे प्राथमिक उपचारानंतर जखमींना पुढील उपचारासाठी रवाना करण्यात आले. अपघातस्थळी व ग्रामीण रुग्णालयात महाडचे उपविभागीय पोलिस अधिकारी शंकर काळे यांनी भेट दिली. पोलीस सहाय्यक निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू होत आहे.

# व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्या

## चित्रलेखा पाटील यांचे आवाहन; अलिबागमध्ये गुणवंतांचा सन्मान

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

एखादा उपक्रम हाती घेतल्यावर तो कायम ठेवणे कठीण आहे. मात्र सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या गुणगौरवची परंपरा आजही अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनने टीकून ठेवण्याचे काम केले आहे. युवक हे उद्याचे भवितव्य आहेत. आगामी काळात वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये एक प्रमुख म्हणून त्यांची भूमिका असणार आहे. त्यामुळे दर्जेदार समाज घडविण्यासाठी शिक्षणाबरोबरच स्वतःच्या व्यक्तीमत्व विकासावर भर देणे गरजेचे आहे, असे आवाहन पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी केले.

अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन व अश्वीनी टीचर्स क्लासेस अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी गुणगौरव सोहळा पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या मुख्य कार्यालयाच्या सभागृहात शनिवारी (दि.३०)आयोजित करण्यात आला. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा




### ■ अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचा स्तुत्य उपक्रम

परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी राहुल कदम, रायगड फोटोग्राफर्स अँन्ड व्हिडीओग्राफर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, उपाध्यक्ष राकेश दर्पे, सचिव विकास पाटील, सहसचिव अमोल नाईक, खजिनदार विवेक पाटील, सहखजिनदार प्रणेश म्हात्रे, कार्याध्यक्ष सुदेश माळी, सहकार्याध्यक्ष सुबोध घरत, सुरेश खडपे, अश्विनी टिचर्स क्लासेसच्या संचालिका अश्विनी मेहता, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर आदी मान्यवर, गुणवंत विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

अलिबाग तालुक्यातील शाळांमधून दहावीमध्ये प्रथम आलेल्या व अश्विनी टीचर क्लासेसमधील बारावीच्या परिक्षेत विशेष यश संपादन करणाऱ्या विद्यार्थी आणि फोटोग्राफर्स असोसिएशनच्या पाल्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, फोटोग्राफीसह व्हीडीओग्राफी क्षेत्र सोपा नाही. कारण याच फोटोग्राफीमुळे अनेक क्रांत्या घडल्या आहेत. अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन आपला व्यवसाय सांभाळून सामाजिक उपक्रम राबवित आहेत. त्यामुळे त्यांचे मनापासून कौतूक आहे. एखादा उपक्रम हाती घेतल्यावर तो कायम ठेवणे कठीण आहे. मात्र सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या गुणगौरवची परंपरा आजही टीकून ठेवण्याचे काम असोसिएशनने केले आहे, असे चित्रलेखा पाटील म्हणाल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे सदस्य जितू शिगवण अमर मढवी, विजय पाटील, निलेश दुदम, विराज घरत, निलेश बुरांबे, जयेंद्र वाघमारे, सुमित मालोदे यांनी मेहनत घेतली. सुत्रसंचलन प्रतिम सुतार यांनी तर विकास पाटील यांनी प्रास्ताविक केले.

### छंद जोपासा- राहुल कदम

आजची पिढी ही आत्मविश्वास असलेली आहे. पदव्या घेऊनही बेकार असाल तर आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. आपल्याकडील कौशल्य निर्माण स्वतःला सक्षम करणे गरजेचे आहे. व्यवहार, वास्तव व ॲकेडमीची सांगड घालणे आवश्यक आहे. शिक्षण घेत असताना प्रचंड टक्केवारी काढल्यानंतर स्वतःला सिध्द करण्याची ताकद निर्माण करा. एकतरी छंद जोपासा, वाचनाची आवड निर्माण कला. तुमच्याकडील छंद एकदिवस मोठा करून जाईल असा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी राहूल कदम यांनी व्यक्त केला.

### स्वतःला घडवा- ॲड. मानसी म्हात्रे

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत अलिबागसह रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. आज कर्तृत्ववान विद्यार्थ्यांचा सन्मान होत असल्याचा आनंद आहे. ९० टक्केहून अधिक गुण मिळविण्यासाठी घेतलेली विद्यार्थ्यांची मेहनत महत्वाची असताना पालकांचे श्रेयदेखील मोलाचे आहेत. विद्यार्थ्यांनो तुम्ही ध्येय बिंदू आहात. दहावी बारावीनंतर करिअरच्या शोधात अथवा उच्च शिक्षण घेत असताना तसेच बाहेरच्या जगात वावरत असताना आकर्षण भरपूर असतील. तुमचे भविष्य उज्वल आहे. परंतू आकर्षणाच्या पलिकडे जाऊन स्वतःला घडविण्यासाठी मेहनत घ्यावी, असे आवाहन अलिबागच्या उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.



# धाटावच्या ग्रामसभेकडे नागरिकांनी फिरवली पाठ

**| धाटाव | प्रतिनिधी |**

सर्वसामान्य नागरिकांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळत असते. त्यामुळे ग्रामस्थ व विकास कामे यामध्ये दुवा हा ग्रामपंचायत असतो. गावचा कारभार पाहण्याकरता ग्रामपंचायतीची निर्मिती केलेली आहे. असे असताना रायगड जिल्ह्यात नावलौकिक असलेल्या धाटाव ग्रामपंचायतमध्ये तेथील नागरिकांचा व महिला वर्गांचा ग्रामसभेचा निरुत्साह पाहता ग्रामसभेला नागरिकांनी पाठ फिरवल्याचे गणसंख्ये अभावी ग्रामसभा तहकुबीवरून दिसून आले.

शुक्रवारी (दि.२९) सकाळी ११ वाजता धाटाव ग्रामपंचायतीची सर्वसाधारण ग्रामसभा धाटाव ग्रामपंचायतचे प्रशासक एम.जी.फडतरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती.या ग्रामसभेत मागील सभेच्या इतिवृत्त वाचना बरोबरच सन २०२६/२७ या वित्तीय वर्षाचा ग्रामनिधी व पाणीपुरवठा कर मागणी कायम करणे बाबत तर २०२५/२६ चा पंचायत वार्षिक जमा खर्च वाचून मंजूर करणे, व २०२५/२६ आर्थिक वर्षात अंदाजपत्रकीय जादा खर्चास मंजूर देणे, त्याचप्रमाणे अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे अशा महत्वाच्या विषयावर चर्चा, निर्णय घेण्यात येणार होते. मात्र ग्रामपंचायतीमध्ये पद भूषविलेल्या आजी माजी पैकी एकाही सरपंच, उपसरपंच सदस्याने उपस्थिती दर्शविली नसल्याने त्यातच बहुतांशी नागरिकांनी सुद्धा अक्षरशः पाठ फिरविल्यामुळे अपुऱ्या गणसंख्ये अभावी ग्रामसेवक अमोल तांबडे यांना ग्रामसभा तहकूब करावी लागली.

## निवडक

### धुमाळ गुरुजींची आज शोकसभा

**रायगड :** शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि समाजसेवक मोहन कृष्णा धुमाळ यांचे शनिवारी (दि.९) निधन झाले. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने त्यांची शोकसभा आयोजित केली आहे. रविवारी (दि.३१) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास धुमाळ यांच्या निवासस्थानी चिखली येथे ही सभा घेतली जाणार आहे. यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, खारेपाट विभागातील शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित असणार आहेत. मोहन धुमाळ हे कुसुंबळे पंचक्रोशीतील चिखली येथील रहिवासी होते. ते हाडाचे शिक्षक व समाजसेवक होते. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी राजकीय, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, नातेवाईक, मित्रमंडळीनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. राजकीय, सामाजिक शैक्षणिक आदी क्षेत्रात धुमाळ गुरुजींचे योगदान मोलाचे होते. त्यांची शोकसभा रविवारी घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.



### ग्रामस्थांच्या दळणवळणाचा रस्ता उखडला

**पाली :** सुधागड तालुक्यातील नाडसूर ग्रामपंचायत हद्दीतील धोंडसेगाव फाटा ते श्री कानिफनाथ मंदिर व वाकणगाव आदिवासी वाडी कडे जाणारा सार्वजनिक वाहतुकीचा रस्ता येथील शेतकरी संतोष गोपाल खंडागळे यांनी सोमवारी (दि.२५) जेसीबीच्या साहाय्याने पूर्णपणे उखडून नादुरुस्त केल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापचे लाट उसळली असून या घटनेचे विरोधात येथील ग्रामस्थांनी पाली तहसीलदार, पाली पोलीस ठाणे आणि गटविकास अधिकारी यांना शुक्रवारी (दि.२९) मे रोजी निवेदन दिले. यावेळी सरपंच श्याम खंडागले, रिपाइचे तालुकाध्यक्ष भगवान शिंदे, शरद फोंडे, संदेश जाधव, महेश जाधव, अविनाश खडागळे, नरेश खडागळे, सखाराम खंडागळे, आदि ग्रामस्थ उपस्थित होते. सदर निवेदनातून त्यांनी म्हटले आहे की या रस्त्यावर सन २०१२/१३ यावर्षी दळणवळणाची गैरसोय होऊ नये म्हणून जिल्हा परिषदेने सरकारी योजना डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत फंड टाकून या रस्त्याचे काम करण्यात आले होते. मात्र आणि पावसाळ्याच्या तोंडावर हा वाहतुकीचा रस्ता या शेतकऱ्याने जाणीवपूर्वक नादुरुस्त केल्याने नागरिकांना तसेच आदिवासी वाढीतील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागणार आहे तरी संबंधित अधिकारी वर्गाने या समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत करावा आणि संबंधित शेतकऱ्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

### पनवेलच्या बाजारात छत्र्यांची मागणी

**पनवेल :** वाढत असलेल्या तापमानामुळे आणि भयंकर उष्म्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणेही कठीण बनले असून उन्हापासून संरक्षणासाठी अनेक नागरिक छत्रीचा आधार घेत आहेत. पावसाळा अद्याप सुरू झाला नसला तरी पनवेलच्या बाजारपेठेत विविध प्रकारच्या छत्र्यांचे आगमन झाले आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांसाठी आकर्षक आणि विविध आकारांच्या छत्र्या उपलब्ध आहेत. महिलांसाठीही खास डिझाईन व रंगसंगतीच्या छत्र्यांना चांगली मागणी आहे. यावर्षी छत्र्यांच्या किमतीत वाढ झाल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. तरी-ही उन्हाच्या तडाख्यापासून बचाव करण्यासाठी नागरिक छत्र्या खरेदी करत आहेत.सध्या पावसापेक्षा उन्हापासून संरक्षणासाठी छत्री अधिक उपयोगी ठरत असून,पाऊस कधी येणार? हा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे.






## निवडक



### बेसिक टेलरिंग प्रशिक्षणास प्रारंभ

**रोहा :** रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीतील एक्सेल इंडस्ट्रीज लि. यांच्या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून विकास भारत उपक्रमांतर्गत जन शिक्षण संस्थान यांच्या सहकार्याने श्रीविवेकानंद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट येथे कौशल्य बेसिक टेलरिंग प्रशिक्षण कार्यक्रमास मोठ्या उत्साहात प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये २० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून हा कोर्स एक महिन्याचा असून दररोज तीन तास प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणासाठी अनुभवी प्रशिक्षक म्हणून नम्रता फुलारे यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रकल्प समन्वयक म्हणून सीमा गूदळे या काम पाहणार आहेत. प्रशिक्षण बॅचच्या उद्‌घाटन प्रसंगी संस्थेकडून प्रसाद दगडे व प्रसाद भोईर यांनी उपस्थितांना संस्थेची माहिती देत व्यावसायिक मार्गदर्शन केले. महिलांनी कौशल्य आत्मसात करून स्वावलंबी बनावे, तसेच रोजगाराच्या नवीन संधी निर्माण कराव्यात, असा संदेश यावेळी देण्यात आला. महिलांच्या कौशल्यविकासासाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत असून भविष्यात अशा विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेकडून देण्यात आली आहे.

### कळंबोलीत स्वच्छता मोहीम संपन्न



**पनवेल :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता आणि आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी महापौर आपल्या प्रभागात हा विशेष उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत कळंबोली येथील प्रभाग क्रमांक ८ मध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना आपला परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा संदेश देण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत बबन मुकादम, रामदास शेवाळे, बायजा बारगजे, सायली सरक, हरेश कांबळे, दिपक म्हात्रे, जिग्नेश भोईर, अमित जाधव, अमोल कांबळे यांच्या सह स्वच्छता दूत आणि मोठ्या संख्येने सफाई कर्मचारी उपस्थित होते.मोहिमेदरम्यान लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मिळून प्रभागातील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते आणि सार्वजनिक परिसराची साफसफाई केली. माझा प्रभाग, स्वच्छ प्रभाग ही केवळ पालिकेची नसून प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक जबाबदारी आहे, असे आवाहन यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी केले. नागरिकांनी कचरा कुंडीतच टाकावा आणि ओला-सुका कचरा वेगळा करून पालिकेच्या गाडीत द्यावा, जेणेकरून कळंबोली परिसर अधिक सुंदर व निरोगी राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या मोहिमेला स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



### 'घंटागाडीवर संदेश मराठी सुरु कारा'

**खरोशी :** पेण नगरपरिषदेच्या घंटागाडीवरून प्रसारित होणारे स्वच्छता जनजागृती संदेश मराठी भाषेत सुरू करण्यात यावेत, अशी मागणी निवृत्त अभियंता जीवन पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पेण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच नगराध्यक्षांना पत्राद्वारे विनंती केली असून जिल्हाधिकारी रायगड व महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागालाही ई-मेलद्वारे निवेदन पाठविले आहे. सध्या घंटागाडीवरील संदेश हिंदी भाषेत प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले असून महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठी भाषेतूनच स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतो, असे पाटील यांनी नमूद केले आहे. स्वच्छ महाराष्ट्रासोबत मराठी महाराष्ट्रही तितकाच महत्त्वाचा आहे, असे सांगत घंटागाडीवरील सर्व संदेश, ध्वनीफिती व गीते मराठीत सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीला सोशल मीडियावर नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या रायगड जिल्ह्यात स्वच्छतेचा संदेशही मराठीतूनच घरोघरी पोहोचला पाहिजे, अशी भावना पेण येथील सामाजिक कार्यकर्ते निवृत्त अभियंता जीवन पाटील यांनी व्यक्त केली आहे.

### विशाल झोरे पोलीस दलात नियुक्ती

**खोपोली :** संघर्ष, जिद्द चिकाटी यांच्या जोरावर विशाल विनायक झोरे हा मुंबई पोलीस म्हणून नियुक्ती झाली आहे. आई-वडील नसतानाही विशालने केलेली मेहनत आणि लक्ष्मण मरगळा यांचे त्याला मार्गदर्शन विशाला मिळाल्यामुळे तो मुंबई पोलीस बनल्यामुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. त्यांचे



१२ वी पर्यंतचे शिक्षण अलिबाग येथे झाले. नंतर १५ वी पर्यतचे शिक्षण त्याने अमरावती येथे पूर्ण करुन त्यांने स्पर्धा परीक्षेची तयारी केली. त्यांनी यावेळी दोन वेळा पोलीस भरती दिली असून दोन वेळा त्याला अपयश आले. अखेर तिसऱ्या वेळेस त्यांनी पोलीस भरती यशस्वीरित्या पूर्ण केली, आणि तो आता मुंबई पोलीस बनला आहे, या यशामागे विशालचा खूप मोठा संघर्ष असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# खारपाडा टोलनाक्यावर महाआक्रोश

## ● कोकणकरांनी उपस्थित राहण्याच आवाहन ●प्रशासनाने खरी स्थिती जाहीर करावी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा टोलनाक्यावर टोलमाफी देण्यात आल्याचा दावा संपूर्णपणे खोटा आणि निव्वळ अफवा असल्याचे समोर आले आहे. राजकीय पक्षांचे नेते अर्ध्या हळकुंडात पिवळे होऊन टोलमाफीचे खोटे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आता स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या फसवणुकीच्या निषेधार्थ आणि जोपर्यंत महामार्गाच्या रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत एकही रुपया टोल वसूल करू देणार नाही हा आक्रमक पवित्रा घेत, खारपाडा टोल पूर्णपणे बंद करण्यासाठी (टोलबंदीसाठी) येत्या रविवारी (दि.३१) मे रोजी सकाळी ११:०० वाजता खारपाडा टोलनाक्यावर भव्य जनआंदोलन छेडण्यात येणार आहे.




मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा टोल बंद करण्यासाठी गेल्या २५ मे पासून सलग बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू आहे. आता या आंदोलनाला तीव्र स्वरूप देण्यासाठी रविवार, दिनांक ३१ मे रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता खारपाडा टोलनाका येथे जनआक्रोश समिती आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने महाआंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनात संपूर्ण कोकणकर रस्त्यावर उतरणार असून, खारपाडा टोल बंद करूनच राहणार, असा निर्धार जनआक्रोश समितीने केला आहे. या जनआंदोलनात स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि सर्व कोकणकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सुरेंद्र पवार आणि संजय जांगम यांनी केले आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NH-I) कुठेही असं लेखी स्वरूपात दिलेले नाही की MH-०६ (पेण/रायगड) आणि MH-४६ (पनवेल) या क्रमांकाच्या वाहनांना टोलमाफी देण्यात आली आहे. हा निव्वळ राजकीय नेत्यांनी पसरवलेला गैरसमज असून टोलनाका प्रशासनाने याबाबतची अधिकृत आणि खरी स्थिती जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

राजकीय पक्षांची आंदोलने आणि दावे अत्यंत फसवे आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NH-I) कुठेही असं लेखी स्वरूपात दिलेले नाही की MH-०६ आणि MH-४६ या क्रमांकाच्या वाहनांना टोलमाफी देण्यात आली आहे. हा निव्वळ राजकीय नेत्यांनी पसरवलेला गैरसमज आहे. टोलनाका प्रशासनाने याबाबतची अधिकृत आणि खरी स्थिती जाहीर करावी असे नागरिकांचे म्हणणे आहे.

> **जोपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोलवसुली पूर्णपणे बंदच झाली पाहिजे. या फसवणुकी विरोधात उद्या हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून टोलमुक्त महामार्गाच्या लढ्यात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे.**
> **– संतोष ठाकूर**
> **सामाजिक कार्यकर्ते**

> **टोलमाफी झाल्याच्या खोट्या घोषणा करून राजकीय नेते फक्त जनतेची दिशाभूल करत आहेत. जर खरंच टोलमाफी झाली आहे, तर मग आमच्या वाहनांचे पैसे का कापले जात आहेत? रस्त्याचे काम अजूनही अपूर्ण असताना अशा प्रकारे होणारी टोलवसुली म्हणजे सर्वसर्वसामान्य वाहनचालकांच्या खिशावर थेट दरोडा आहे.**
> **– रितेश सावंत त्रस्त वाहनचालक**

## नोकरीचे आमिष दाखवून तरुणाची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे येथील एका नामांकित शाळेत सरकारी क्लार्क पदावर नोकरी लावून देण्याचे खोटे आमिष दाखवून एका महिलेसह दोघांनी एका सुशिक्षित तरुणाची तब्बल ९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला, था प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात या दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू कला आहे. अरुणा जाधव व अमोल राऊत अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. या दोघांची २०२३ मध्ये नेरूळ येथे मयुर मानकर (३०) या सुशिक्षित तरुणासोबत ओळख झाली होती. त्या वेळी अरुणा व अमोल यांनी त्याची कोपरखैरणे सेक्टर ८ मध्ये भेट देऊन त्याला कामोठे येथील नामांकित विद्यालय व ज्युनियर कॉलेजमध्ये सरकारी कोट्यातून कायमस्वरूपी नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत त्याच्याकडून गेल्या ३ वर्षांत टप्प्याटप्प्याने लाखो रुपये उकळले. यात त्यांनी मयुरकडून ६ लाख रुपये ऑनलाइन स्वरूपात आणि ३ लाख रुपये रोख, असे एकूण . ९ लाख रुपये उकळले. त्यानंतर त्याला खोटे नियुक्ती पत्र दिले. हे नियुक्ती पत्र घेऊन मयुर संबंधित ज्युनियर कॉलेजमध्ये गेला असता, हे नियुक्तीपत्र बनावट असल्याचे त्याला सांगण्यात आले. त्यानंतर मयुरने या दोघांकडे पैसे परत मागितले असता, त्यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मयुरने कोपरखैरणे पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अरुणा जाधव व अमोल राऊत या दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

## तिघांविरोधात गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** सदनिका न देता पैसे परत न केल्याने आयुष अग्रवाल, विनय अग्रवाल, देवेंद्र केडिया यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नरेंद्र पाडवी हे रोडपाली येथे राहत असून त्यांनी अग्रवाल यांच्यामार्फतिने बालाजी सिंफनी, सुकापुरमधील सदनिका बुक केली होती. या सदनिकेसाठी नऊ लाख एक हजार रुपये ऑनलाईन आणि ३२ लाख ४५ हजार रुपये रोख असे एकूण ४१ लाख ४६ हजार ६३० रुपये बिल्डर आणि मॅनेजर यांना दिली. मात्र, यातील आरोपींनी संगणमत करून त्यांच्याकडून रक्कम घेतली आणि त्यांना सदनिका न देता त्यांचे पैसे देखील परत केले नाहीत. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस तपास करत आहेत.

## गंगामाता मंदिर घाटावर गंगापूजा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर शहरातील उत्तरवाहिनी सावित्री नदीपात्राजवळील गंगामाता मंदिरासमोरील गंगामाता घाटावर गंगाआरतीने गंगादशहरा साजरा करण्यात आला. अधिक ज्येष्ठ महिन्याच्या पाडव्यापासून दि. १७ मे ते गंगादशहरा दि. २५ मे दरम्यान अत्यंत उत्साही आणि आनंदी वातावरणातपूर्ण पोलादपूर शहरातील विविध भागातील भाविकांच्या उपस्थितीत या दहा दिवसांची गंगापूजा पार पडली.

पोलादपूरचे दशानेमा समाजाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष प्रशांत शेठ यांच्या अध्यक्षतेखाली आणि मार्गदर्शनाने अत्यंत उत्साहाने गंगादशहरा महोत्सव साजरा झाला. दशानेमा गुजराती समाजात सुज्योत



गांधी हे सातत्यान गंगामाता उत्सव, नवरात्री उत्सव, शिमगा महोत्सव, मारुतीमंदिराची सेवा अखंड अविरतपणे भक्तीभावाने करतात. अध्यक्ष प्रशांत शेठ यांच्यासोबत सर्व दशानेमा कार्यकारिणी मंडळाच्या सदस्यांनी मेहनतीने हा कार्यक्रम यशस्वी होण्यास हातभार लावला होता.

गंगादशहराच्या दिवशी कांचन तलाठी, उज्ज्वला शेठ अपर्णा शेठ, समाधान शेठ , बिपिन शेठ , केतकी शेठ, पूजा शहा, श्रावणी शहा, नयना शेठ, नयना कुडाळकर, निमा शेठ यांनी अल्पोपहाराचा प्रसाद भाविकांना दिला. गंगा आरतीच्या कार्यक्रमास दहाही दिवशी सायंकाळी पोलादपूर शहरामधील बहुजन समाजाने उपस्थिती दर्शवली होती.

## कर्जत-मुरबाड महामार्गवर रेलिंग बसविण्यास सुरुवात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खोपोली, कर्जत, मुरबाड राज्य मार्गावरील रस्त्याच्या बाजूला असलेली लोखंडी रेलिंग चोरीला गेले होते. त्याबाबत समाज माध्यमांनी ही माहिती राज्य रस्ते विकास महामंडळांच्या नजरेत आणून दिली होती. या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याने अवजड वाहने यांची ये-जा सुरू असते. अवजड वाहनांच्या सुरक्षिततेसाठी महत्वाचा खबरदारी घेतली जात असून रस्त्याच्या दुतर्फा लोखंडी रेलिंग लावण्यात आली होती. ती चोरीला गेल्यानंतर वाहनांची सुरक्षितता लक्षात घेऊन पुन्हा नव्याने रेलिंग लावली जात आहेत. याबाबत राज्य रस्ते विकास महामंडळांनी तक्रार दाखल केली



असून चौकशी सुरू केली होती.

मात्र, ही रेलिंग चोरल्यानंतर अनेक महिने उलटून गेले नंतर महामंडळाला जाग आली.

मात्र, यावर संबंधित अधिकाऱ्याने कुठल्याही प्रकारे लक्ष दिले नाही आणि वारंवार दुर्लक्ष करताना पाहायला मिळाले. आता राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून मुरबाड ते कर्जत राज्यमार्ग ज्या ज्या ठिकाणी रेलिंग तुटली आहे किंवा ज्या-ज्या ठिकाणी चोरीला गेली आहे अशा ठिकाणी कामाला सुरुवात केली आहे. तसेच मुरबाड-कल्याण राज्य महामार्गावर असलेले चाहूची वाडी या गावाच्या शेजारी एक मोठे नागमोडी वळण आहेत. मात्र, आता या ठिकाणी सुद्धा लोखंडी रेलिंग बसविण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

## अवधूत वारगे याची पोलिस दलात निवड

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील उंडरगाव येथील अवधूत वारगे याची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. जिद्दीच्या बळावर स्वयंअध्ययनातून परीक्षेची तयारी करून अवधूतला यश मिळाले. अभ्यासाबरोबरच खेळ क्रीडा प्रकारात तो निपुण आहे. शालेय जीवनापासून पोलीस होण्याचे स्वप्न होते. मुंबई पोलीस दलात अवधूतची निवड झाल्याबद्दल अश्विनी जंगम, प्रवीण बैकर तसेच नवगाव आगरी समाज कमिटी, ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळांच्यासह समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्याकडून शुभेच्छा वर्षाव केला जात आहे.



## पालीत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

### ● आपदा मित्रांची टीम सज्ज

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग, तहसीलदार तथा दंडाधिकारी कार्यालय पाली सुधागड यांच्या वतीने मंगळवारी (दि. २५) स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी आणि शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष शिबिरात तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण केले.

आपत्तीच्या प्रसंगी मदत कार्य किती वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचूशकते, याची अचूक चाचपणी करण्यासाठी प्रत्यक्ष घटनास्थळावर एक विशेष मअपघात मॉकड्रिलफ घेण्यात आले. या मॉकड्रिलमध्ये महाराष्ट्र सीमलेसचे अग्निशामक वाहन, रुग्णवाहिका आणि स्थानिक प्रशासन तसेच पोलीस दलाच्या जवानांनी सक्रिय सहभाग घेतला. या मॉकड्रिलला नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

प्रशिक्षक शशिकांत शिरसाठ यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्वपूर्ण धडे दिले. यामध्ये आपत्तीच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या बांबू, ब्लँकेट किंवा कपड्यांच्या साहित्यापासून तातडीने स्ट्रेचर कसे तयार करावे, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. अपघात किंवा आपत्तीत जखमी झालेल्या व्यक्तीला रुग्णालयात नेण्यापूर्वी डोक्याला, जबड्याला पट्टी कशी बांधावी (बँडेजिंग) यासह इतर प्रथमोपचारांची माहिती देण्यात आली. शासनाकडून पुरवण्यात आलेल्या अत्याधुनिक लाईफ जॅकेट, सुरक्षा सूट आणि इतर आपत्ती निवारण साहित्याची ओळख करून देऊन त्याचा प्रत्यक्ष वापर कसा करावा, हे शिकवण्यात आले. आग, वादळ, पूर आणि इतर नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी स्वतःचा जीव वाचवून इतरांना सुरक्षित कसे बाहेर काढावे, याचे नियोजन समजावून सांगण्यात आले.

पाली तहसील कार्यालय, पंचायत समिती आणि नगरपंचायत येथे आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणारे जवळजवळ सर्व आवश्यक साहित्य उपलब्ध असून कोणत्याही आपत्ती समयी त्याचा तातडीने उपयोग केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली.

## शीतपेयांना मागणी

**पाताळगंगा:** वाढत्या उष्णतेने रौद्ररूप धारण केल्याने नागरिक हैराण झाले आहे. उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिकांचा कळ शीतपेयांकडे वळला आहे. त्यात उसाचा रस, लिंबूपाणी, ताक, नारळपाणी घेऊन थंडावा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे थंड पेयांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली असून स्थानिक व्यावसायिकांना त्याचा फायदा होत आहे. आगामी काही दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी उष्माघातापासून बचावासाठी योग्य ती खबरदारी घेण्याची गरज आहे.

## समृध्द पंचायतराज अभियानात अंतर्गत काटेतळी प्रथम

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

ग्रामस्वच्छता अभियान आणि अन्य स्पर्धांमध्ये राज्यात लक्ष्यवेधी यश संपादन करणाऱ्या पोलादपूर तालुक्यातील काटेतळी ग्रामपंचायतीने तालुकास्तरीय ७ सहभागी ग्रामपंचायतींमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील मूल्यमापन समितीने केलेल्या मूल्यमापनानंतर तालुक्यात सर्वप्रथम क्रमांक प्राप्त केला. यानंतर पुणे जिल्हास्तरिय समितीतर्फे मूल्यमापन करण्यात आल्याने ग्रामपंचायतअंतर्गत सेवाभावी जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.



पुणे जिल्हा परिषदेचे भारतीय प्रशासकीय सेवा मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा जलसंधारण अधिकारी गौरव बोरकर, विठ्ठल जाधव, सुमीत शिंदे, तुषार साळुंके साईराज प्रधान, गौरव मोरे, सुनील मोरे, चंद्रकांत कळंबे, अनिल दळवी, पं. स. समितीचे ग्रामविस्तार अधिकारी हंबीर, ग्रामपंचायत अधिकारी शिल्पा कोंडाळकर, महसूल अधिकारी, कृषीसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशासेविका तसेच ग्रामपंचायतीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वायु गुणवत्ता निर्देशांक ३५ ते ५५ नोंदवला | हवेतील प्रदुषकांच्या प्रमाणात घट

# उन्हातही हवेच्या गुणवत्तेत सुधारणा

**। उरण । प्रतिनिधी ।**

गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्यभरात उष्णतेचा पारा चाळीशी पार गेला असून उरणमध्येही नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. मात्र, या अत्यंत उष्ण आणि कोरड्या हवामानात उरणकरांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि काहीशी आश्चर्यकारक बातमी समोर आली आहे. उरण परिसरातील हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक कमालीचा सुधारला असून, हवा 'उत्कृष्ट' ते 'समाधानकारक' श्रेणीत नोंदवली




गेली आहे. यामुळे वाढत्या उष्णतेने हैराण झालेल्या उरणच्या नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

सध्या उरण आणि परिसरात तापमान ३८ ते ४० च्या आसपास रेंगाळत आहे. दुपारच्या वेळी अंगाची लाहीलाही होत असतानाच, दुसरीकडे हवेतील प्रदूषकांचे प्रमाण मात्र लक्षणीयरीत्या घटले आहे. सध्याचा उरणमधील विविध भागांत वायु गुणवत्ता निर्देशांक ३५ ते ५५ च्या दरम्यान नोंदवला गेला आहे. सामान्यतः औद्योगिक क्षेत्र आणि वाहतुकीमुळे उरणचा मध्यम किंवा वाईट श्रेणीत असतो, मात्र सध्या तो उत्कृष्ट ते समाधानकारक पातळीवर आला आहे. सामान्यतः नागरिकांना वाटतं की कडक उन्हाळा म्हणजे प्रदूषण आणि त्रास वाढणार.

उरण हे समुद्रकिनाऱ्यालगत असल्याने, जमिनीवरील रिकामी झालेली जागा भरून काढण्यासाठी समुद्रावरून येणारे वेगवान आणि शुद्ध वारे जमिनीच्या दिशेने वाहू लागतात. या वेगवान प्रक्रियेमुळे जमिनीलगत साचलेले धुलीकण, गाड्यांचा धूर आणि कारखान्यांचे प्रदूषक हवेत वरच्या थरात निघून जातात किंवा समुद्राच्या दिशेने वाहून जातात. याशिवाय, सध्या उरण परिसरातील स्थानिक जेटी आणि बंदरांवरील काही अवजड वाहतुकीचे मार्ग अंशतः बदलण्यात आले असून, उन्हाळ्यामुळे दुपारी रस्त्यांवरील वाहनांची संख्याही काहीशी रोडावली आहे. याचाही संयुक्त परिणाम हवा शुद्ध होण्यात झाला आहे.

### श्वास घेताना जडपणा कमी

**उरणमधील जेष्ठ नागरिक आणि सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या लोकांनी या बदलाचे स्वागत केले आहे. उन्हाळा कडक असला तरी श्वास घेताना येणारा जडपणा कमी झाला असून, गेल्या काही वर्षांतील उन्हाळ्याच्या तुलनेत यंदा हवेतली धूळ प्रचंड कमी झाल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**३१ मे**

१) श्रीम. सिमंतिनी श्रीकृष्ण पाटील, ३१-५-१९५३ विद्यानगर, अलिबाग
२) श्री. शशिकांत गोपीनाथ म्हात्रे थळ, अलिबाग, ३१-५-१९५६
३) अक्षता दिपक रानवडे चेंढरे, अलिबाग, ३१-५-१९६२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**अमृतबेन व प्रेमजी जिवराज जैन, अलिबाग**

**हार्दिक मुकेश पाटील, चिंचवली नारंगी, अलिबाग**

## श्रीवर्धनमध्ये विष्णुयाग संपन्न

**श्रीवर्धन शहर :** श्रीवर्धनमध्ये परशुराम पुरोहित मित्र मंडळातर्फे पुरुषोत्तम मासानिमित्त लक्ष्मी नारायण मंदिरात दि.२८ व २९ मे रोजी विष्णुयागाचे आयोजन मोठ्या उत्साही व पवित्र वातावरणात करण्यात आले होते.

# उन्हाच्या तडाख्यात माठांना मागणी

## • गरिबांच्या फ्रीजला आजही नागरिकांची पसंती

**| महाड | प्रतिनिधी |**

वाढत्या उन्हाच्या झळांपासून दिलासा मिळवण्यासाठी आजही नागरिक नैसर्गिकरित्या थंडगार पाणी देणाऱ्या पारंपरिक मातीच्या माठांनाच पसंती देत आहेत. विजेशिवाय किंवा कोणत्याही इंधनाशिवाय पाणी गार ठेवणारे माठ हे 'गरिबांचा फ्रिज' म्हणून ओळखले जातात. उन्हाळा सुरू होताच घराघरांत ठेवणीतले जुने माठ बाहेर काढून स्वच्छ करून वापरण्याची परंपरा आजही कायम आहे. मात्र, अनेक माठ तुटफुट झाल्याने नव्या माठांसाठी नागरिकांना कुंभारवाड्यांकडे धाव घ्यावी लागत आहे.



दरम्यान, मागील काही वर्षांत बाजारात पर राज्यातील तुलनेने स्वस्त आणि आकर्षक माठ मोठ्या प्रमाणावर दाखल झाले आहेत. स्थानिक कुंभारांच्या पारंपरिक व्यवसायावर त्याचा परिणाम होत आहे. १५० ते २०० रुपयांत नळासह मिळणारे हे माठ स्वस्त असले तरी त्यांच्या गुणवत्तेत आणि स्थानिक हात बनावटीच्या माठांमध्ये मोठा फरक असल्याचे स्थानिक कारागीर सांगत आहेत. स्थानिक कुंभारांच्या मते, येथील भाट मातीपासून बनविलेले माठ अधिक जाडसर असून योग्य उष्णतेत भाजले जातात. त्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या झिरप्यामुळे आतले पाणी अधिक गार राहते. उलट पर राज्यातील व्यावसायिक उत्पादनातील माठांमध्ये झिरपा कमी असल्याने पाणी अपेक्षित तेवढे थंड राहत नाही. स्थानिक हाताने बनविलेले माठ दिसायला थोडे वेडेवाकडे असले तरी त्यांच्या नैसर्गिक थंडाव्याला ग्राहक आजही पसंती देत आहेत.

मात्र, माती, सरपण, मजुरी आणि इतर साहित्यांच्या वाढलेल्या दरांमुळे स्थानिक माठांची किंमत काहीशी जास्त असल्याचे कुंभार सांगतात. त्यामुळे नागरिकांनी केवळ स्वस्ताई न पाहता स्थानिक कारागिरांच्या कष्टांची दखल घेऊन त्यांच्या माठांना प्राधान्य द्यावे, तसेच हा पारंपरिक व्यवसाय टिकवण्यासाठी सहकार्य करावे, अशी भावनिक विनंती स्थानिक कुंभारांकडून करण्यात येत आहे.

# आदिवासी पाड्यावर उजळले शिक्षणाचे दीप




**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

रायगड किल्ल्याच्या कुशीत वसलेल्या निजामपूर या अति दुर्गम आदिवासी पाड्यावर सारथी फाऊंडेशनच्या अथक प्रयत्नांतून नव्या शाळेच्या इमारतीचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले आणि शाळेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या धरणग्रस्त पाड्यावर गेली सत्तावीस वर्षे अनेक आदिवासी कुटुंबे वास्तव्यास आहेत. एवढ्या दीर्घ काळातही येथे मूलभूत सुविधा आणि शैक्षणिक सोयींचा कायम अभाव राहिला. पूर्वीची शाळा इमारत पूर्णपणे जीर्ण अवस्थेत होती. छोट्या व तात्पुरत्या खोल्यांमध्ये मुलांना दाटीवाटीने बसावे लागत होते. शाळेत वीज नव्हती. या परिस्थितीचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत होता.

जिल्ह्यात गेली चाळीस वर्षे दुर्गम भागात निस्वार्थपणे कार्यरत असलेले सारथी फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले यांच्या निदर्शनास ही दयनीय परिस्थिती आली आणि त्यांनी या विद्यार्थ्यांसाठी नवीन, सुरक्षित व सुसज्ज शाळा उभारण्याचा निर्धार केला. त्यांच्या पुढाकाराने सारथी फाउंडेशनच्या माध्यमातून आता येथे प्रशस्त वर्गखोली, वीज जोडणी, करुन सुसज्ज अशी नवी इमारत उभी राहिली आहे.

शाळेसाठी आवश्यक आर्थिक सहाय्य राजश्री सामंत यांनी त्यांचे पुत्र सिद्धार्थ महादेव सामंत यांच्या पवित्र स्मरणार्थ दिले.

शाळेचे उद्घाटन मनिष पाटील यांच्या हस्ते पार पडले. या सोहळ्यास सारथी फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले, महेश चव्हाण, निलेश पवार, प्राचार्य संदीप नगरकर, गौरव जंगले, दिनेश डोके, प्रभाकर सावंत आणि गटशिक्षण अधिकारी राजनजी सुर्वे यांचीही या प्रसंगी उपस्थिती होती. दुर्गम डोंगरकपारीत राहणाऱ्या आदिवासी मुलांच्या डोळ्यांत आता शिक्षणाचे नवे स्वप्न पाहण्याचे धाडस आले आहे. आणि हीच या सगळ्या प्रयत्नांची खरी कमाई आहे.

## रोटरी क्लबतर्फे अन्नधान्य वाटप

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील डांगरणेश्वर वाडी, मोर्बे येथे आदिवासी बांधवांसाठी कपडे व अन्नधान्य वाटपाचा कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत उत्साहात पार पडला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश गरजू आदिवासी कुटुंबांना आवश्यक वस्तूंची मदत करणे हा होता. क्लबच्या सदस्यांनी एकत्र येऊन कपडे, धान्य तसेच इतर आवश्यक वस्तूंचे वितरण केले. या प्रकल्पात आदिवासी महिला, पुरुष आणि लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या उपक्रमात पुरणसिंग मेहरा यांनी मुलांसाठी गोष्टींची पुस्तके, पेन्सिल आदी वस्तू भेट दिल्या. क्लबच्या सर्व सदस्यांनी नियोजन, साहित्य वितरण आणि व्यवस्थापनामध्ये सक्रिय सहभाग घेतला. यावेळी सुनीता चौधरी, श्वेता खेडवाल, मुकुंद चौधरी, पुरणसिंग मेहरा उपस्थित होते.

## गणेश म्हात्रे यांची उपसरपंचपदी निवड

**| उरण | प्रतिनिधी |**

वशेणी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी गणेश म्हात्रे यांची निवड करण्यात आली. मावळते उपसरपंच प्रजा गावंड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त जागी वशेणी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच अनामिका म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांची बैठक बोलविण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी गणेश म्हात्रे यांची निवड करण्यात आली.उरण पंचायत समितीच्या उपसभापती दुर्गा म्हात्रे यांचे पती असलेल्या गणेश म्हात्रे यांची वशेणी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदासाठी निवड झाल्याने माजी आ. मनोहर भोईर, अनामिका म्हात्रे, विद्या भाटकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी ग्रामपंचायतीच्या प्रजा गावंड, जयंता म्हात्रे, संग्राम पाटील, ज्योत्स्ना पाटील, सुनील ठाकूर, अस्मिता पाटील, शेवंती पाटील, प्रिती पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग**

**प्रवेश प्रक्रिया २०२६**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI)
https://admission.dvet.gov.in

**१००५ औ.प्र.संस्था (ITI) ८४ अभ्यासक्रम**
- १ वर्ष व २ वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम
- अभ्यासक्रमानुसार इ. १० उत्तीर्ण व अनुत्तीर्ण उमेदवार पात्र
- महिला, अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, अल्पसंख्यांक, नक्षलग्रस्त भाग, माजी सैनिक व दिव्यांग प्रवर्गाकरिता स्वतंत्र संस्था/ तुकड्या
- सर्व व्यवसाय अभ्यासक्रमात संगणक प्रशिक्षण, Artificial Intelligence व Employability Skill चा समावेश
- अल्पमुदतीचे प्रशिक्षण, On-Job Training, Dual System of Training, इ. ची संधी
- पात्रते नुसार विद्यावेतन, निर्वाहभत्ता, एस.टी.बस पास सुविधा,हत्यार पेटी, पुस्तक पेढी, इ. सुविधा
- २ वर्षे अभ्यासक्रमास महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्दारे इ. १२ वी ची समकक्षता

**महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ**
प्रमाणपत्र, पदवीका व प्रगत पदवीका अभ्यासक्रम
https://msbsvet.edu.in

**१२६५+ कौशल्य प्रशिक्षण संस्था** ३८ गटात १६५०+ अभ्यासक्रम
- ३० तास ते १ वर्ष कालावधीचे प्रमाणपत्र (Certificate), २ वर्ष कालावधीचे पदवीका (Diploma) व १ वर्ष कालावधीचे प्रगत पदवीका (Advance Diploma) अभ्यासक्रम
- अभ्यासक्रमानुसार केवळ साक्षर (Basic Literate) ते पदव्युत्तर (Post Graduate) प्रवेश पात्रता
- Manufacturing, Healthcare, Hospitality, Banking and Finance, Agriculture, Automobile, Power, IT, Beauty, Media and Entertainment, इ. ३८ गटात (Sector) पायाभूत ते प्रगत अभ्यासक्रमात प्रशिक्षण उपलब्ध
- निवडक अभ्यासक्रमांचा शासकीय सेवा प्रवेशात समावेश
- रोजगारक्षम कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांमुळे रोजगाराच्या संधी
- पदवीका अभ्यासक्रमांत प्रवेशीत उमेदवारांना एस.टी.बस पास सुविधा
- मराठी व इंग्रजी भाषेत प्रशिक्षण व परीक्षा

**प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर शिकाऊ उमेदवारी योजना (Apprenticeship) अंतर्गत संधी**
**रोजगार मेळाव्यातून शिकाऊ उमेदवारी व नियमित रोजगाराची संधी**

महत्वाची सूचना
महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, दि. २१.०८.२०१३ अन्वये मनाई करण्यात आली आहे व नियमावली दि. ०८.१०.२०२४ अन्वये तक्रारी, अपील व सुधारणात्मक उपाययोजना संबंधी नियम निर्गमित करण्यात आले आहेत.
प्रवेशोच्छुक उमेदवार व पालकांनी अनधिकृत संस्थांच्या फसव्या जाहिरातींना बळी पडू नये. केवळ केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त संस्थेतच प्रवेश घ्यावेत. प्रवेश घेण्यापूर्वी मान्यता प्राप्त संस्था व अभ्यासक्रमांची माहिती केवळ संबंधीत प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर तपासावी.

**वरिल अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दिलेल्या प्रवेश संकेतस्थळावर आजच ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करा**
एक कौशल्य अनंत संधी

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ३१ मे ते ६ जून २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## खर्चात वाढ होणार

**मेष :** हा सप्ताह मेष राशीधारकांना खर्चात वाढ होणारा जाणार आहे, व्यापार करणाऱ्या व्यक्तींना साह्य न मिळाल्यामुळे त्रास सहन करावा लागेल, जो चिकाटी धरून राहील त्याचे नशीब फळ-फळणार आहे. कोणतीही कृती आताताईपणे न करता विचार पूर्वक करा या आठवड्यात आपल्यावर जबाबदाऱ्या येणार आहेत. या जबाबादाऱ्या पार पाडताना आपला कस लागणार आहे. आपल्याला झेपतील इतकीच जबाबदारी स्वीकारा. आपल्यात असणारी सकारात्मक बाजू आपल्याला अडचणी सोडवण्यास मदत करतील. कुटुंबात वाद विवादाचे कारण बनू नका. देव दर्शनाला जाण्याचा बेत आखला असेल तर ही इच्छा आता फलद्रूप होणार आहे. आठडवड्याच्या शेवटी राजकारणात आपल्याला मानसन्मान मिळणार आहे. **महिलांना :** महिलावर्गाचा वेळ दुसऱ्यांची भांडणे सोडवण्यात जाणार आहे. मात्र, अशावेळी सत्याची बाजू घ्या त्यामुले यश प्राप्त होईल, कोणीतरी आपली कानउघडणी करण्याची गरज निर्माण होईल. तुमची ताकद तुमच्या विचारात आहे. आर्थिक लाभासाठी आमवशेला श्री सुक्त वाचणे गरजेचे आहे. **शुभदिनांक :** २,३.

## पूर्वजांचे स्मरण करा

**वृषभ :** हा सप्ताह वृषभ राशीसाठी उत्साहपूर्ण असणार आहे. नोकरी धंद्यासाठी केलेला प्रवास यशस्वी होणार आहे. आपण केलेला लहान व्यवहार ही फायदा देणारा ठरणार आहे. महत्वाच्या कामासाठी आपली निवड होऊन आपल्यावर जबाबदारी सोपवली जाणार आहे. आपण मेहनतीने ती यशस्वी करू शकाल प्रॉपर्टी बाबत व्यवहार होण्याचा संभव आहे. योग्य तो निर्णय घेण्यास हरकत नाही. प्रेम विवाहात बदल करण्यास बोलणी होऊ शकतात. आपण ताणून धरू नका नाहीतर आपला तोटा होऊ शकतो. भावनेच्या भरात घेतलेला निर्णय चुकीचा असू शकतो. मनोरंजनासाठी जास्त खर्च करू नका. विवाहिताना घराच्या जबाबदाऱ्या पार पडताना नाकी नऊ येतील. इतर दिवस चिंतेत टाकणारे नसले तरी आमवस्या मात्र घरातील व्यक्तीसाठी काळजी वाढवणारी ठरणार आहे. संतती बाबत ही चिंता असू शकते. **महिलांना :** आपल्या पूर्वजांना स्मरण करून तो दिवस त्यांच्यासाठी देणे आपल्यासाठी हितकारक असेल. पूर्वजांसाठी अंमवसेस पितृपीडा स्तोत्र वाचने हितकारक आहे. **शुभदिनांक :** ०४,०५.

## वादविवादाचे प्रसंग टाळा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्चावर मात्र कटाक्षाने निर्बंध ठेवणे हितकारक राहील. आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे योग्य राहील. आपला राग एकदम बाहेर पडणारा असतो, त्या वाफ जाई पर्यंत थांबणे हितकारक असेल त्यासाठी वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक सध्या नको. व्यवहारात चढउतार संभवतात. तरीही हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. त्यामुळे आपले काम थांबवू नका, नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. ५० पुढील व्यक्तीनी प्रकृतीस्वास्थ्य जपा. एका बाजूने आपल्याला जोडीदाराची उत्तम साथ मिळणार आहे. **महिलांना :** महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणारा कालावधी आहे, एखादा सत्कार ही होण्याचा संभव आहे. प्रवासाचे योग संभवतात, आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. **शुभदिनांक :** २,०३.

## प्रलोभनांपासून दूर राहा

**कर्क :** या सप्ताहात कर्क राशीधारकास त्याने घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची योग्य साथ मिळणार असल्याने एखादे मोठे काम करण्यास हरकत नाही, आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे म हत्त्वाचे ठरणार आहे. पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाह इच्छुकांच्या आशा पल्लवित होतील. प्रलोभनांपासून दूर राहा. आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. **महिलांना :** आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. थोडा हट्टीपणा बाजूला ठेऊन जोडीदाराच्या मनाप्रमाणे वागा. घरातील वातावरण बदलून जाईल एखादे शुभ कार्य करण्याबाबत ठरवले जाईल. **शुभदिनांक :** ०३,०५.

## कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने आपण अपेक्षित गोष्टी साध्य करू शकाल. नोकरदारांनी मात्र वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. विद्यार्थ्यांना अध्ययनात अपेक्षित यश मिळू शकेल. विवाह इच्छुकांच्या आशा-आकांक्षा पल्लवित होतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीबाबत मात्र सावधानता बाळगा. विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आर्थिक बाजू सांभाळा. अनावश्यक खर्चापासून लांब रहा. बचती बाबत सजग राहा. जोडीदाराची साथ मिळेल. पदवीधारकाने अभ्यास सुरू करावा प्रवास संभवतो. घरात एखादे शुभकार्य होण्याची शक्यता राहील. कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. **महिलांना :** विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्याव लागेल घरात काही किमती वस्तूची खरेदी कराल शुभ मनोरंजनामध्ये जागरण टाळणे हितावह आहे. **शुभदिनांक :** ३१,०१.

## व्यवहारात सावधानता बाळगा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता ते आपणास पुष्कळशा बाबतीत साथ देणारे असल्याने आपले कार्य सफल करू शकाल. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही, ते नामोहरम होतील. आपल्या कामकाजात अधिक लक्ष देऊन ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा वृद्धिंगत होईल. सरकारी नियमांचे पालन करा. व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रलोभने टाळा. आठवड्याच्या शेवटी महत्त्वाची कामे हाती न घेतल्यास, पुढे ढकलल्यास सर्व दृष्टीने हितकारक ठरू शकेल. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. अमावस्येस प्रवास टाळावा. **महिलांना :** बाहेर पडताना तब्बेतीची पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे. थंड पदार्थ अजिबात घेऊ नये त्यापासून लांब राहणे उत्तम ठरेल. संततीकडून खुश खबर मिळणार आहे. लांब फिरण्यास जाण्याचे नियोजन केल जाईल. तीर्थयात्रा करण्यास हरकत नाही. **शुभदिनांक :** ०२,०४.

## धार्मिक कार्यात रस घ्या

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या मेहनतीलाच यशाची झालर प्राप्त होण्याची शक्यता आहे. याचा योग्य उपयोग करणे सर्व दृष्टीने ठीक राहील. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक राहील. आपल्या श्रमाला योग्य न्याय दिला जाईल. कौटुंबिक वातावरण वादाच्या प्रसंगाने बिघडणार नाही याची दक्षता घ्या. सरकारी कर्मचारीवर्गाने नको त्या प्रलोभनात अडकू नका. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने पाळा. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक विचाराने वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. बढती व बदली बाबत विचार होऊन नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. विशेषतः मुलांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. **महिलांना :** धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. **शुभदिनांक :** ०५,०६.

## गैरसमजापासून दूर राहा

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता एकूण वातावरण चांगले राहिल्याने आपणास आनंद घेता येईल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास गैरसमजापासून दूर राहू शकाल. गोड बोलून आपला कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारणे योग्य राहील. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते कसोशीने पाळा. आपण कार्यक्षेत्राबाबत दुसऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वतः जातीने लक्ष घातल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. कामाचा उत्साह वाढला तरी आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्रमंडळी व आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. हाती घेतलेल्या कामांना मार्गी लावण्याचा प्रयत्न करा. घरगुती वातावरनात गोडवा येऊ शकेल, बाहेर फिरताना आपल्या किमिती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. **महिलांना :** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **शुभदिनांक :** ३१,०३.

## आर्थिक बाजू ठीक राहील

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांना बढती मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग करा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. पण आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना :** हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यांची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. **शुभदिनांक :** ०२, ०५.

## यशाचा आलेख उंचावेल

**मकर :** हा सप्ताह मकर राशीसाठी प्रलोभन समोर आले तरीही नको त्या प्रलोभनात अडकून जाऊ नका. बौद्धिक क्षेत्राला उत्तम वाव मिळेल. व्यवसायीक लाभ घेऊ शकतील. प्रकृतीबाबत आपण चालढकलपणा न करता पथ्ये पाळा. नियमित व्यायाम करा, मसालेदार पदार्थ खाण्याचे व चहा टाळा. आपण अध्ययनातील क्षेत्रात कठोर परिश्रम व सातत्य अंमलात आणल्यास आपल्या यशाचा आलेख उंचावू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास उत्तम राहील. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. राजकीय व्यक्तींचे राजकीय क्षेत्रात वर्चस्व राहू शकेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची संधी मिळू शकेल. आपण सर्व बाबतीत व कार्यक्षेत्रात शांततेने परिस्थिती हाताळल्यास आपणास अपेक्षित यश मिळू शकेल. **महिलांना :** आपणास प्रोत्साहित करणाऱ्या घटकांना जाणून घ्या व मग त्यांचा अवलंब करा. आर्थिक बाजू ठीक राहील. शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल. संतातीच्या प्रकृतीबाबत आपण अधिक दक्ष राहा, डॉक्टरचा सल्ला घ्या. **शुभदिनांक :** ०३,०६.

## नियोजित कामे पार पाडा

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागल्यास व त्याप्रमाणे कृती केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. कामकाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना शांतपणे व संयमाने हाताळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य होऊ शकतील. प्रत्येक गोष्टींचा आस्वाद घेताना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. नोकरदारांना व व्यावसायिक क्षेत्राला चांगला काळ राहील. हितशत्रूंची चिंता करण्याचे कारण नाही, ते गप्प बसतील. आपण आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना :** जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोगयाबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तु मिळेल. **शुभदिनांक :** ४,५.

## कामाची दगदग वाढेल

**मीन :** हा साप्ताहात मीन राशीसाठी प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे राहील. आठवड्याच्या शेवटी स्थिती सामान्य होणार आहे, तो पर्यत दम धरणे क्रम प्राप्त राहील. घराबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. कोर्ट कचेरी ही होऊ शकते. आपण कितीही काम केलेत तरी आपल्या अधिकारी वर्गाचे समाधान होणार नाही. घरात ही अशीच स्थिती राहील, कामात दगदग वाढणार आहे. स्थावर मालमत्तेची कामे करताना विचारपूर्वक करावीत. हातचे सोडून पळत्याच्या पाठी जाऊ नका. कामकाज नसलेल्याना अचानक काम हाती येणार आहे. त्यामुळे हाती पैसा खेळू शकेल. आपल्या जिवलगा सोबत वेळ घालवण्याची संधी उपलब्ध होईल. योग्य त्या रीतीने त्याचा फायदा घ्या. नोकरदारवर्गाने मोठ्या मंडळी बरोबर गोड बोलून राहावे. **महिलांना :** घरात एखादे मंगल कार्य होणार आहे त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. नवीन नोकरी असणाऱ्याना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका. त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक :** ३१,०२.

# मालवाहतूकदार संघटनांचा संप मागे

## ● कंटेनर संघटनांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा● बंदरातील वाहतूक पूर्ववत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जेएनपीएची यशस्वी मध्यस्थी आणि शिपिंग कंपन्या, कंटेनर यार्ड, वाहतूकदार यांच्यातील लोलो शुल्काबाबत झालेल्या सकारात्मक चर्चेअंती राज्यभरातील कंटेनर मालाची वाहतूक करणाऱ्या ११ संघटनांनी जेएनपीए बंदरातील कंटेनर वाहतूक २८ मे पासून पुकारलेला बेमुदत संप अखेर मागे घेण्यात आला आहे. बंदरातील वाहतूक आत्ता पूर्ववत झाली असल्याची माहिती महाराष्ट्र हेवी व्हेईकल ॲण्ड इंटरस्टेट कंटेनर ऑपरेटर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रविण पैठणकर यांनी दिली. जेएनपीए बंदर आणि बंदर परिसरातील सीएसएफ, शेकडो कंटेनर यार्ड आणि इतर ठिकाणच्या दरम्यान कंटेनर मालाची मोठ्या प्रमाणावर चढ-उतार केली जाते.



कंटेनर मालाच्या वाहतुकी दरम्यान कंटेनरची ट्रॅक्टर ट्रेलरवर चढउतार करावी लागते.

या कंटेनर मालाच्या हाताळणी दरम्यान लागणाऱ्या विविध शुल्काची (लोलो) प्रत्येक कंटेनर मागे ६ ते १० हजार रुपयांची वसुली वाहतूकदारांकडून केली जाते. त्यानंतर ज्या शिपिंग कंपन्या कंटेनर वाहतूकदारांना शुल्काची रक्कम ६० ते ९० दिवसात अदा करतात.

मात्र, या दरम्यान वाहतूकदारांचे लाखो रुपये दोन-तीन महिन्यांसाठी अडकून पडतात.शिपिंग कंपन्या मात्र लोलो शुल्काची रक्कम आगाऊ भरण्यासाठी राजी नसल्याने २८ मे पासून वाहतूकदारांनी बेमुदत संपाला सुरुवात केली होती. या संपात राज्यभरातील ११ वाहतूकदार संघटना सहभागी झालेल्या होत्या. त्यामुळे आज सुमारे १५ हजार कंटेनर ट्रेलर जागोजागीच थांबले होते.

वाहतूकदारांच्या संपामुळे उद्भवलेल्या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी गुरुवारी सकाळी जेएनपीएच्या प्रशासन भवनात तातडीने बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत जेएनपीएचे कंटेनर वाहतूक विभागाचे वरिष्ठ प्रबंधक गिरीश थॉमस, विविध शिपिंग कंपन्या, कंटेनर यार्ड व विविध वाहतूकदार संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या बैठकीत चाललेल्या चर्चेत लोलो शुल्क व वाहतूकदारांच्या इतर मागण्यांबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात आला. यामुळे संप मागे घेण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र हेवी व्हेईकल ॲण्ड इंटरस्टेट कंटेनर ऑपरेटर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण पैठणकर यांनी दिली. याला जेएनपीएचे कंटेनर वाहतूक विभागाचे वरिष्ठ प्रबंधक गिरीश थॉमस यांनीही दुजोरा दिला.

बैठकी दरम्यान संपामुळे सकाळपासूनच परिसरातील विविध रस्ते, पार्किंग व पार्किंग प्लाझा थांबलेल्या कंटेनर ट्रेलरच्या गर्दीने फुलून गेले होते.

# लता ढेबेंकडून रोपांची लागवड

**। माथेरान । प्रतिनिधी ।**



माथेरान नगरपरिषदेच्या अखत्यारीत असणाऱ्या पेमास्टर उद्यानात लता ढेबे यांच्या माध्यमातून स्वखर्चाने विविध प्रकारच्या फुलांच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे. माथेरानमधील सर्वात उंच ठिकाणी हे उद्यान असून काही वर्षांपासून इथे फुलांची झाडे नाहीत. अनेकदा नगरपरिषदेच्या कार्यालयात रोपे पुरविण्याबाबतीत कळविण्यात आलेले असताना अद्यापही काहीच हालचाली दिसत नाहीत. अखेरीस नगरसेविका लता ढेबे यांनी गुलाब, जास्वंद, पिंपळ, बेल अशाप्रकारे विविध रोपे आणून स्वतः रोपण केले आहे.

**ग्रुप ग्रामपंचायत तरणखोप,**
**ता.पेण,जि.रायगड**
**जाहीर निविदा**

सर्व अधिकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते कि, ग्रुप ग्रामपंचायत तरणखोप १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ खालील विकास कामांची सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | तरणखोप अंतर्गत गटार बांधणे प्रभाकर पाटील ते बायपास हायवे | ९,४९,०००/- | १% |
| २. | तरणखोप जुनी अंगणवाडी दुरुस्ती करणे | १,५३,२००/- | १% |
| ३. | ग्रा.पं.तरणखोप हद्दीतील शौचालय दुरुस्ती करणे. | २,००,०००/- | १% |
| ४. | बेलवडे ते रामराज रस्ता बनविणे. | १,५३,२००/- | १% |
| ५. | ग्रा.पं.तरणखोप मध्ये शौचालय बांधणे दुरुस्ती करणे | ३,८३,०००/- | १% |

**अटी व शर्ती :**

१.निविदा संबंधीत सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळेल.
२.निविदा कार्यालयीन वेळेत मा. सरपंच यांच्या नावाने ग्रामपंचायत कार्यालयात सादर कराव्यात.
३.निविदा ६ जून पर्यंत स्विकारण्यात येतील. तर निविदा ८ जून रोजी उघडण्यात येतील.
४.कोणतेही कारण न देता १ किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.
५.निविदा मंजूर झाल्या नंतर ५०० रू. स्टॅम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करून दयावा.
६.निविदा नामंजूर केलेल्या ठेकेदाराने कोणत्याही प्रकारचे पत्र व्यवहार केला जाणार नाही.
७.शासकीय नियमानुसार शासकीय कपात करून अंतिम बिल दिले जाईल.

सही
**श्री.तानाजी महादु मेकाले**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत तरणखोप
ता.पेण जि.रायगड

सही
**सौ.दर्शना दिनेश पाटील**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत तरणखोप
ता.पेण, जि.रायगड.

# इस्कॉन मंदिरात 'होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट'चा शुभारंभ

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

विज्ञान मानवी शरीराला बरे करण्याचे कार्य करते, तर अध्यात्म मन, आत्मा आणि जगण्याची इच्छाशक्ती बळकट करण्याचे सामर्थ्य प्रदान करते. विज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय साधला गेल्यास जीवनाकडे पाहण्याचा अधिक समग्र दृष्टिकोन विकसित होतो, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले. खारघर येथील इस्कॉन मंदिरात आयोजित होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी इस्कॉन नवी मुंबईचे मंदिराध्यक्ष डॉ. सूर दास, माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, डॉ.




व्ही. सेवक दास, कॅल्विन सेउंगवॉन यी, जिल्हाधिकारी किशन जावळे, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, डॉ. विक्रम गोटा, डॉ. अमित जोशी, डॉ. रजनीश कामत, डॉ. अविनाश टिप्पणी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील संशोधक, तज्ज्ञ डॉक्टर, कर्करोग रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कर्करोग हे आज मानवजातीसमोरील एक गंभीर आरोग्य आव्हान असून जगभरात दरवर्षी सुमारे २ कोटी, तर भारतात १४ लाखांहून अधिक नवीन कर्करोग रुग्णांची नोंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. आधुनिक वैद्यकशास्त्रामुळे उपचारपद्धतीत मोठी प्रगती झाली असली, तरी कर्करोगाचा परिणाम रुग्णांच्या मानसिक, भावनिक आणि कौटुंबिक आयुष्यावरही होत असतो. ड्ढहोलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीटफ हा उपक्रम या सर्व पैलूंचा विचार करून रुग्णांना सर्वांगीण आधार देणारा ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# खांदा वसाहतीत फूटपाथची सफाई

**पनवेल :** पावसाळा तोंडावर आल्याने पनवेल महानगरपालिकेकडून खांदा वसाहत, कळंबोली परिसरातील फूटपाथ व ड्रेनेजमधीलसाचलेलीमातीकाढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.ड्रेनेज लाईनमधील गाळ आणि माती तातडीने उचलून पाण्याचा निचरा सुरळीत ठेवण्यावर भर दिला जात आहे.पावसाच्या पाण्यामुळे पुन्हा माती वाहून जाऊन नाले तुंबू नयेत यासाठी प्रशासन विशेष काळजी घेत आहे. पालिका कर्मचाऱ्यांकडून यंत्रसामग्रीच्या सहाय्याने साफसफाईची कामे वेगाने सुरू असून नागरिकांनाही दिलासा मिळत आहे. पावसाळ्यात पाणी साचू नये व वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी ही मोहीम महत्त्वाची ठरत आहे.

**जाहीर नोटीस**

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे मालेगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल सौ. पुजा गणेश म्हसे व श्रीम. कमल मुरलीधर इंगळे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक डॉ. दिपक रामचंद्र सावंत यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५३/९/ब | ०.६१.०० | ०.५८ |

वरील वर्णन केलेली मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पूराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर मिळकत कायम स्वरूपी खरेदी करण्याचे व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३१/०५/२०२६.

सही/-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

# आशा शिर्के यांची नियुक्ती

**नागोठणे :** पोलीस मित्र संघटना, नवी दिल्ली या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष चौधरी यांच्या आदेशानुसार आणि संघटनेचे राष्ट्रीय जनसंपर्क प्रमुख गजानन भगत यांच्या सूचनेनुसार तसेच संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील पाटील व महाराष्ट्र राज्य महिला आघाडी अध्यक्षा सुजाता चिंता यांच्या सहमतीने नागोठण्यातील सामाजिक कार्यकर्त्या आशा शिर्के यांची पोलीस मित्र संघटनेच्या रोहा तालुका महिला जनसंपर्क प्रमुखपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.

# खांदा वसाहत गार्डनमध्ये नागरिकांची गर्दी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वाढत्या उन्हाळ्यामुळे घरात प्रचंड उकाडा जाणवत असल्याने नागरिक सायंकाळी मोकळ्या हवेसाठी खांदा वसाहत येथील गार्डनमध्ये मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. शाळांना सुट्ट्या लागल्याने लहान मुलेही खेळण्यासाठी गार्डनमध्ये येत असून महिला वर्गदेखील सायंकाळी सहा नंतर फेरफटका मारण्यासाठी येथे उपस्थित राहत आहे.

मात्र, गार्डनमधीलसजावटीसाठी लावण्यात आलेले बटरफ्लाय लाईट बंद अवस्थेत असल्याने नागरिकांनी



नाराजी व्यक्त केली आहे. गार्डनच्या देखभालीसाठी नियुक्त कर्मचारी नेमके काय काम करतात, असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन लाईट बटर फ्लाय बंद लाईट सुरू करावेत व गार्डनची नियमित देखभाल करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उतान्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| शिवाजी जगन्नाथ बिबवे<br>अरुण वसंत घाग | ३९ | ३ | १-१४-०० | ३ | ७३ |
| | यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ५० पॉ ०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ३१/०५/२०२६

# शेतकरी फार्मर कपसाठी सज्ज

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील प्रगतशील शेतकरी बी. सी म्हात्रे यांच्या शेतावर कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२८) आयोजित करण्यात आलेल्या सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेच्या तयारीला उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकऱ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला. प्रशिक्षणासाठी चिरनेर येथील सुजलाम शेतकरी गट व श्री महागणपती शेतकरी गटाच्या शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून शेती विषयक महत्त्वाची माहिती जाणून घेतली.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना गट शेतीचे महत्त्व आणि शेतीतील नवीन व्यवस्थापन पद्धती शिकवून व्यवसायाभिमुख दृष्टिकोन विकसित करणे हा होता. एकत्रित गट शेतीमुळे संसाधनांचा प्रभावी वापर करणे, मोठी बाजारपेठ मिळवणे आणि उत्पादन खर्च कमी करणे यांसारखे फायदे होत असतात. या संदर्भात प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.

पाणी फाऊंडेशनचे मार्गदर्शक आशिष लाड यांनी मफार्मर कपफ स्पर्धेचे नियम, विविध टप्पे आणि शेती व्यवस्थापनातील नव्या पद्धती याबाबत मार्गदर्शन केले. तर उपस्थित प्रशिक्षकांनी स्पर्धेची गरज, अंमलबजावणीचे टप्पे आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शेतकऱ्यांच्या भूमिकेबाबत सविस्तर माहिती देऊन चर्चा केली.

कृषी सहाय्यक अधिकारी आदीका पानसरे यांनी फार्मर कप स्पर्धेचे महत्त्व आणि शेतीच्या व्यवस्थापन प्रणालीतील नवीन बदलांविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी २०२६ च्या खरीप हंगामापासून सुरू होणाऱ्या सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही केले.

# शिक्षक संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यातील आदर्श शिक्षक, आदर्श शिक्षिका व समाजातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना अनुक्रमे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, क्रांतीज्योती सावित्राबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्कार प्रदान सोहळा प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ५ जून रोजी सकाळी दहा वाजता व्ही. के हायस्कुल पनवेल जिल्हा रायगड येथे आयोजीत केला आहे. तरी ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल राजपल्ले यांनी केले आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे** भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे. ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६

● **शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय** आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● **jai santoshi maa CNG Alibag** wadgav 1) Filler-man 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812

● **अलिबाग एसटी स्टॅंन्डजवळ** दूकानगाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

● **उसर-अलिबाग येथील** गेल/एच.पी. कंपनी जवळ वेलवली बस स्टॉप नजिक नवीन इमारत (एकूण ११ सूसज्ज फ्लॅट) पार्कींग व्यवस्थेसह भाडे तत्वावर देण्याची आहे. कृपया इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. मोबा. नं. ८४५४८६२७६७

● **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹१४,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम, तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. इच्छुकांनी संपर्क साधावा. ७८७५८६६५५५

● **अंकुर नर्सरी-(वाडगाव फाटा, अलिबाग पेण रोड पासून** १ मिनिटाच्या अंतरावर) अलिबाग ५ जून पर्यावरण दिनानिमित्त, सर्व प्रकारची फळझाडांची मजबूत कलमे, फूलझाडे, ईनडोअर प्लांटस, बुके प्लांटस वर भरपूर सवलत! दि. २ जून २६ ते १० जून २६ पर्यंत संपर्क - ९४२३८९०२९५

● **अलिबाग मधील क्लीनिक करीता** महिला-पुरूष मदतनीस पाहिजेत ८ तास ड्यूटी-पगार १५००० ते २०००० मो. ९२२६७६६१२९

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णन केलेली मिळकत खालील नमूद मिळकतीचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.
**मिळकतीचे वर्णनः जिल्हा-रायगड, तालुका-पेण, मौजे-धावटे येथील जमिन मिळकत.**

| भुमापन क्रमांक व उविभाग | भुधारणा पद्धती | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ५२/१/ब | भोगवटादार वर्ग-१ | ०-२०-१० | ०.३४ |

वर नमुद एकुण मिळकतीपैकी क्षेत्र ०-०३-०० हे.आर. ही मिळकत श्रीमती. लता गोरखनाथ पाटील रा.उत्कर्ष गृहनिर्माण शेजार समिती संस्था, आकुर्ली रोड. न्यु पाल राजेंद्र हाईस्कूल जवळ, हनुमान नगर, मुंबई, कांदिवली ईस्ट मुंबई-४००१०१ यांच्या मालकीची व वहिवाटीची, निर्वेध, प्रत्यक्ष ताबेकब्जातील अशी मिळकत आहे. श्रीमती. लता गोरखनाथ पाटील यांच्या हिस्स्यास असलेले क्षेत्र ०-०३-०० हे.आर. हि मिळकत विक्री करण्याबाबत आमच्या पक्षकाराबरोबर बोलणी होऊन आमच्या पक्षकारांबरोबर बयाणा रक्कम देऊन बयाणा पावती झालेली आहे.

तरी या मिळकतीबाबत इतर कोणाचाही साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, ताबाकब्जा, हक्क, दान, गहाण, फरोक्त, बक्षिसपत्र, चार्ज, लिज, इतर कोणतेही करार अथवा हक्क हितसबंध असल्यास खालिल ॲडव्होकेट यांचे कडे १५ दिवसांत लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागावून येणारी हरकत आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ३१/०५/२०२६

**ॲड. तन्मय जि.म्हात्रे**
बी.एल्.एस्.एल् एल्.एम्
कार्या -शॉप नं.४, डी विंग, समर्थ प्रसाद नगर,
राजू पोटे मार्ग, ता.-पेण, जि.-रायगड.
फोन नं. ८४१२०९१४५४

**जाहीर नोटीस**

सर्वांना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव बामणसुरे येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकती श्री.दिपम जयंतीभाई पटेल यांचे मालकीच्या असून, आमचे अशिलांची सदर मिळकती विकत घेण्याबाबत मिळकतीचे मालकांबरोबर बोलणी चालू आहेत.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र आर.चौ.मी | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३२ | - | २९-१०-०० | २९१=०० |
| ३३ | - | ११-६०-०० | ११६-०० |
| ३४ | - | ०६-००-०० | ६०=०० |

तरी सदर मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यावर नांव असणाऱ्या मालकाव्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध या मिळकतीमध्ये असल्यास आणि वर नमूद केलेल्या जमिनीच्या प्रस्तावित व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत नोंदवावी. त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीखः ३१/०५/२०२६

सही /-
**ॲड. संजीव अनिल घरत**
मु. पो. खंडाळे,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.
मो.९९२१५५२६७७

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना कळविण्यात येते की, गाव मौजे-तळेगाव तर्फे तळे ता. तळा, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलानी खरेदी घेण्याचे ठरविले असून या मिळकतीत इतर कोणाचा काही एक हक्क हितसंबंध, गहाण, तारण, लिज, पोटगी, निवाडा, भाडेपट्टा अगर अन्य प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत खाली सही करणार यांचेकडे लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात, या मुदतीत हरकती न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून या मिळकतींबाबत पुढील व्यवहार केले जातील व त्याप्रसंगी कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. करिता जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**ता. तळा, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-**

| अनु क्र. | मौजे | स.नं./ गट नं. | क्षेत्र (हे. आर) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| १ | तळेगाव तर्फे तळे | ४८४ | ०-८९-३० | श्री. नाना पांगा म्हात्रे |

सही/-
**ॲड. प्रितेश प्रमोद मेकडे**
बी.एस्सी. एल.एल.बी
रा.तळा ता.तळा जि. रायगड
मो.नं. ८४४६२८४९४९

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या कामात दिलासा मिळेल. अचानक अधिक खर्च करावे लागतील. धावपळ, दगदग होईल.
- **वृषभ** : कारकिर्दीला नवी दिशा मिळेल. कौटुंबिक सुख-समाधान लाभेल. अनावश्यक खर्च कमी करावा.
- **मिथुन** : आर्थिक स्थिती बऱ्यापैकी राहील. दिलासादायक घटना घडतील. मुलांच्या कलांना वाव मिळेल.
- **कर्क** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. मानसिक ताण वाढेल.
- **सिंह** : मुलांची प्रगती मनासारखी राहील. कर्ज प्रकरणं मार्गी लागतील. स्थावर प्रश्नात तडजोड करावी.
- **कन्या** : व्यवसायात अडचणी संभवतात. जुनी येणी रखडतील. नव्या संधी चालून येतील.
- **तूळ** : घरगुती व्यवसायात प्रगती होईल. स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवावा. खऱ्या हितचिंतकाची पारख करा.
- **वृश्चिक** : व्यापारात अनपेक्षित दिलासा मिळेल. सरकारी कामांना गती येईल. छोटा-मोठा प्रवास घडेल.
- **धनु** : आजचा दिवस धावपळीचा राहील. महत्त्वाचे करार तुर्तास नको. आर्थिक व्यवहारात काळजी घ्यावी.
- **मकर** : कामाचा ताण वाढता राहील. कौटुंबिक मतभेद वेळीच दूर करावे.
- **कुंभ** : वास्तुच्या खरेदीला चालना मिळेल. व्यवसायात ध्येयपूर्तीचा आनंद मिळेल. बाकी चिंता करू नये.
- **मीन** : कौटुंबिक सहलीचा आनंद घ्याल. मित्र-मैत्रिणींच्या गाठीभेटी होतील.

ब्युटी टॉक

## तंत्र तरुण दिसण्याचं

मेक अपमुळे फक्त आपलं सौंदर्यच खुलतं असं नाही तर चेहऱ्यातले दोष झाकण्याचं कामही होतं. विशेषत: प्रौढ वयात महिलांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. त्वचा सैल पडणं, ओठ पातळ होणं अशा वार्धक्याच्या खुणा दिसू लागतात. मात्र मेक अपचं योग्य तंत्र वापरून हे सर्व दोष लपवता येतात. यासाठी फक्त महागडी मेक अप उत्पादनं वापरून भागत नाही तर त्याचं तंत्र जाणून घ्यायला हवं. त्वचेची नेमकी गरज समजून घ्यायला हवी. मेक अपच्या माध्यमातून तुम्ही नक्कीच तरुण दिसू शकता.

* आपल्या त्वचेला मेक अपसाठी तयार करणं गरजेचं आहे. यासाठी चेहरा धुतल्यानंतर टोनिंग करा. यानंतर अँटी एजिंग किंवा 'क' जीवनसत्त्वयुक्त सिरमचा वापर तुम्ही करू शकता. यामुळे तुमचा चेहरा तजेलदार दिसेल. मेक अप बेसचा सौम्य थर लावा. मेक अप बेसचे थर चढवले तर त्वचेवरच्या सुरकुत्या अगदी स्पष्ट दिसतात. त्यामुळे कमीत कमी मेक अप करण्यावर भर द्या. त्वचेच्या रंगाशी मिळतंजुळतं फाउंडेशन वापरा. (क्रमश:)

## ३१ मे

दिन विशेष

**२०१३** : पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय ठाण्यांवर गोळीबार केला.
**२०१५** : केंद्र सरकारने अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेली सेवाकरवाढ अंमलात आली.
**२०१७** : मोबाईल नंबरप्रमाणे बँक खाते पोर्टेबल करता येणार असल्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय.
**२०१८** : महाराष्ट्राचे कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर यांने निधन.

स्मार्ट टॉक

## यूएसबी ड्राईव्हच्या फॉरमॅटिंगसाठी...

कॉम्प्युटर, मोबाईलमधला महत्त्वाचा डाटा साठवून ठेवण्यासाठी पेनड्राईव्हसारख्या पोर्टेबल यूएसबी ड्राईव्हचा वापर केला जातो. भरपूर स्पेस असणाऱ्या पेनड्राईव्ह मिळतात. हार्ड डिस्कच्या तुलनेत त्या स्वस्तही असतात आणि कुठेही अगदी सहज कॅरी करता येतात. अशा यूएसबी ड्राईव्हजचे अनेक लाभ असले तरी बरेचदा अशा ड्राईव्हज विंडोज कॉम्प्युटरवर फॉरमॅटहोत नाहीत. पेनड्राईव्हच्या फॉरमॅटिंगमधल्या अडचणी कशा सोडवायच्या याबाबतच्या काही टिप्स...

* पेनड्राईव्हमध्ये काही एरर असू शकतात. हे एरर तपासण्यासाठी ड्राईव्हमध्ये इन बिल्ट फीचर्स असतात. ड्राईव्ह स्कॅन करण्यासाठी 'माय कॉम्प्युटर' किंवा 'धीस पीसी' ओपन करा. यूएसबी ड्राईव्हवर राइट क्लिक करून 'प्रॉपर्टीज' हा ऑप्शन निवडा. याच्या वरच्या बाजूला टूल्स टॅबवर क्लिक करा. 'चेक नाउ'चा पर्याय निवडा. **(क्रमश:)**

### पंचांग

**रविवार, ३१ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अधिक ज्येष्ठ शु. १५, चंद्रराशी : वृश्चिक,
नक्षत्र : अनुराधा, योग : सिद्ध, सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१०

### फॉरवर्ड्स

**बड़ी मुश्किल से मिलतें हैं आशियानें आज़कल...**

**हमनें दिल में ज़गह दी हैं आप रहना तों सिखिये...!**

आरोग्यमंत्र

## दक्षता घ्यायला हवी

सध्या लहान वयात शारिरिक व्याधी जडण्याचं प्रमाण वाढलं आहे. सदोष प्रजीवनशैलीमुळे अनेकांना वृद्धत्वापूर्वीच गुडघ्यांमधील वेदनांचा सामना करावा लागतो. मात्र प्रगत शस्त्रक्रियेनंतर रुग्ण वेदनांवर मात करुन पूर्वीच्या दिनचर्येकडे वळू शकतो. अर्थात यावेळी काही धोकेही संभवतात. त्यांची माहिती घेऊ या...

* हाडांशी संबंधित शस्त्रक्रियांमध्ये रक्ताच्या गुठळ्या होण्याची शक्यता जास्त असते. शास्त्रीय भाषेत त्याला 'डीप व्हेन थ्रॉंबोसिस' आणि 'पल्मोनरी एंबॉलिझम' असं म्हटलं जातं.

* पायांमध्ये होणाऱ्या रक्ताच्या गुठळ्यांसाठी 'डीप व्हेन थ्रॉंबोसिस' ही संज्ञा वापरली जाते तर फुफ्फुसात होणाऱ्या रक्ताच्या गुठळ्यांना 'पल्मनरी एंबॉलिझम' असं म्हटलं जातं.



* प्रत्येक शस्त्रक्रियेनंतर रक्ताच्या गुठळ्यांचा धोका उद्भवत असला तरी हाडांशी संबंधित शस्त्रक्रियांमध्ये हा धोका अनेकपटींनी वाढतो. शस्त्रक्रियेनंतरच्या दोन आठवड्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्यांची निर्मिती होऊ लागते. रक्ताच्या या गुठळ्या हृदय, फुफ्फुसापर्यंत पोहचून रूग्णाचा मृत्यू होण्याची शक्यताही असते.

* अशा शस्त्रक्रियेनंतर जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो. मधुमेहाप्रमाणे 'ऱ्हेयूमेटॉइड आर्थ्रारायटिस'मध्येही रोगप्रतिकारक क्षमता घटते. अशा रुग्णांमध्ये गुडघे प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेनंतर जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो.

### वेगळ्या वाटा

काहीतरी क्रिएटिव्ह करायचं असेल तर तुम्ही गारमेंट टेक्नॉलॉजीचा विचार करू शकता. कपडे उत्पादनाशी संबंधित विविध तांत्रिक पैलू यात हाताळले जातात. फॅशन डिझायनर ड्रेस डिझाइन करतो तर गारमेंट टेक्नॉलॉजिस्ट या डिझाइनची उपयुक्तता ठरवतो. ड्रेस डिझाइनिंगची सर्वोत्तम पद्धत निवडण्यासोबतच त्यात बदल करण्याचं कामही त्याच्याकडे असतं. यासोबतच कपडा तयार करण्याचं तंत्रज्ञान, मटेरियल कॉम्बिनेशन तसंच त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मटेरियलची निवडही गारमेंट टेक्नॉलॉजिस्टलाच करावी लागते. आवश्यकता भासेल तिथे ही मंडळी फॅशन डिझायनरला सल्लाही देतात. (क्रमश:)

करिअरवाटा

## माहिती हटके अभ्यासक्रमांची

सध्या जनुकीय अभियांत्रिकी, स्टेम सेल्स आणि बायोटेक्नॉलॉजी या शास्त्रांमध्ये प्रचंड गतीने घडामोडी घडत आहेत, महत्त्वपूर्ण संशोधन समोर येत आहे. त्यामुळेच या क्षेत्रातील संशोधकांना नानाविध संधी उपलब्ध होत आहेत. उदाहरणार्थ नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस (एनसीबीएस) या खाजगी संस्थेनं जीवशास्त्रातल्या नवनव्या संशोधनांना महत्त्व देऊन संशोधनासाठी निरनिराळे अभ्यासक्रम उपलब्ध केले आहेत. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि अणु ऊर्जा विभाग यांनी त्यांना अनेक प्रकारचे सहकार्य देऊ केलं आहे. जैव तंत्रज्ञानाच्या संशोधनाचा अनेक शास्त्रांशी संबंध येत असतो. त्यामुळे इंटर डिसिप्लीनरी संशोधन करण्याच्या सोयी उपलब्ध असणंही गरजेचं आहे. त्याचाच एक भाग म्हणून भौतिक आणि रसायनशास्त्र या दोन शास्त्रांच्या अभ्यासावर भर द्यावा लागतो. भारतामध्ये स्टेम सेल्सच्या तंत्रावर फारसं संशोधन होत नाही. ती कसर एनसीबीएस तसंच अन्य काही संस्थांनी भरून काढली आहे. त्याशिवाय एनसीबीएसमध्ये दोन वर्षांचा एम.एस्सी. इन वाईल्डलाईफ असा एक आगळावेगळा अभ्यासक्रमही उपलब्ध आहे. त्याचा लाभ घ्यायला हवा.



खेचाखेची

## प्यारे देशवासियों

तेल कमी वापरा,

सोने खरेदी करू नका,

इथपर्यंत ठीक आहे.

पण...

दारू कमी प्या नाही म्हणाले.
उलट... 'प्यारे देशवासियों...' असे म्हणाले.

...तेवढीच दिलासादायक बातमी!

### वेगळं काही

मध्यंतरी जॉर्ज रेमिरेज आणि एनिटा रेमिरेज या नव्वदी ओलांडलेल्या दोन भावंडांनी एकत्र पदवी प्राप्त केली. तब्बल ८० वर्षांनंतर या दोघांनी पुन्हा अभ्यास केला आणि पदवीधर होण्याची इच्छा पूर्ण केली. ही भावंडं अमेरिकेतल्या डेनवरमध्ये राहतात. जॉर्ज ९५ तर एनिटा ९४ वर्षांच्या आहेत. या दोघांनी जागतिक महायुद्धाची दाहकता अगदी जवळून अनुभवली आहे. जॉर्ज या आठवणींना उजाळा देतात. ते म्हणतात, शाळेतून घरी आल्यानंतर वडिलांनी मला नोकरी करायला सांगितली. नोकरी केल्याशिवाय आमचं काहीच भागणार नव्हतं. त्यामुळे मला शिक्षण अर्धवट सोडावं लागलं. मी अमेरिकन लष्करात टँक ड्रायव्हर म्हणूनही काम केलं आहे.

रुचिरा

## कच्च्या केळ्याची रुचकर भाजी

भाज्यांबाबतीत प्रत्येकाची आवडनिवड वेगळी असते. नेहमी त्याच त्याच प्रकारे केलेल्या भाज्या खाण्यास कोणीही तयार नसतं. पण पद्धतीत थोडासा बदल केला तर भाजी आवडीने खाल्ली जाते. कच्च्या केळ्याची भाजी हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकारही सगळ्यांना आवडू शकतो. चला तर, याची रेसिपी जाणून घेऊ या.



**साहित्य-** सहा कच्ची केळी, दोन टेबलस्पून तेल, कोथिंबीर, जिरं, हिंग, हळद, धने पावडर, आलं पेस्ट, आमचूर पावडर, गरम मसाला, तिखट, चवीपुरतं मीठ इत्यादी.

**कृती-** सर्वप्रथम कच्च्या केळ्यांचे काप करून पाच मिनिटं पाण्यात ठेवावेत. दुसरीकडे कढईत तेल घालून ते गरम झाल्यानंतर जिरे, हिंग, हळद, धने पावडर, आल्याची पेस्ट टाकून चांगलं परतावं. त्यानंतर यात केळ्यांचे काप टाकावेत आणि थोडं पाणी मिसळून पाच ते दहा मिनिटं शिजू द्यावे. त्यानंतर आमचूर पावडर, गरम मसाला आणि कोथिंबीर मिसळावी. पुन्हा वाफ आणावी. रुचकर भाजी तयार आहे. कोथिंबीर बारीक चिरून भाजीवर भुरभुरा. गरमागरम भाजी सर्व्ह करा.

## सुडोकू १११

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | ९ | १ | | | | | |
| | २ | | | ७ | | | | ६ |
| ५ | | ४ | ३ | | | | १ | ७ |
| | | | | | ९ | | ५ | ४ |
| ९ | | ७ | | ४ | | १ | | २ |
| ८ | ४ | | ७ | | | | | |
| ६ | ९ | | | | ८ | ५ | | १ |
| ४ | | | | ३ | | | ६ | |
| | | | | | ६ | ४ | | ९ |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११०चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | २ | १ | ६ | ४ | ५ | ९ | ७ |
| ७ | ९ | ५ | २ | ८ | ३ | ६ | ४ | १ |
| १ | ४ | ६ | ७ | ९ | ५ | २ | ३ | ८ |
| ९ | २ | ३ | ८ | ४ | ७ | १ | ६ | ५ |
| ६ | ७ | १ | ९ | ५ | २ | ३ | ८ | ४ |
| ४ | ५ | ८ | ६ | ३ | १ | ९ | ७ | २ |
| ३ | ६ | ७ | ५ | २ | ८ | ४ | १ | ९ |
| ५ | ८ | ४ | ३ | १ | ९ | ७ | २ | ६ |
| २ | १ | ९ | ४ | ७ | ६ | ८ | ५ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १११



**आडवे शब्द :-**
१) समुद्रातील अग्नी
५) मर्यादा,सीमा नसणे
८) नभोवाणी
११) प्रश्नोत्तरे
१३) अतिशय मऊ कापड प्रकार
१४) हत्तीचे ओरडणे
१५) घोड्याच्या पायाखाली लावण्याची लोखंडी पट्टी
१६) गहाण ठेवलेली वस्तू
१८) विवाहित स्त्री
२०) प्रहर
२१) उत्तराधिकारी
२३) बारीक- सारीक
२६) भाजी
२८) नर्तक (चे).
३०) जून,तंतू,निबर
३१)हिंदीत जनावर
३२) वर-वधू मधील पडदा
३४) साडीचा शेवटचा भाग
३५) श्रीविष्णूच्या गरुडाचे नाव
३७) घराणे
३८) लाज,लज्जा
३९) पर्ण
४०) एक पालेभाजी
४१) लग्नातील एक विधी
४३) लोकसभेचा सदस्य
४६) तांबुसपणा
४७) नकला करणारा
४८) एका जागी वास्तव्य न करणारा,भटक्या
५१) ओकारी
५३) एकाग्र नजर
५५) आश्चर्य
५६) ढगांचा आवाज
५९) हालचाल
६२) पाप्यांची यातना भोगण्याची जागा
६३) उत्कर्ष,आर्थिक प्रगती
६५) जननी
६६) चुलता
६७) पायजमा
६८) उत्कर्षाचा काळ
७०) अन्न शिजताना जळणे
७२) अलमारी
७३) फक्त,केवळ
७४) विझविणे(दिवा वगैरे)
७५) खादाड राक्षस

**उभे शब्द:-**
१) नसता संबंध जोडणे (वा.प्र.)
२) दिवस, वार
३) जुनाच्या विरुद्ध
४) स्त्री,महिला
५) मुरली
६) वहिवाट,जाणे येणे.
७) रमविणारा, पती
८) विधानसभेचा सदस्य
९) नुकताच गेलेला दिवस
१०) सदोदित,एकसारखे
१२) नाव, जहाज इ. जलवाहतुकीचे साधन
१७) बारीक झणझण
१८) सद्वर्तन
१९) कागद खाणारी वाळवी, उणीव
२१) यात्रेस जाणे
२२) शाश्वत
२४) दृष्टी
२५) न संपणारे वैर,दुश्मनी
२६) मुलगा,पुत्र
२७) कारखान्याचा मालक.
२९) खोडा, अपशकुन
३१) धान्य दळण्याचे दगडी घरगुती साधन
३२) तर्क
३३) वैमानिक
३६) मूळ विषयाला येण्या अगोदरचे फार मोठे प्रास्ताविक (वा.प्र).
३८) शांत करणे
३९) जवळ (हिं)
४२) कठोर (उपाय)
४३) मीठाची चव
४४) मुस्लीमांचा उपवासाचा महिना
४५) चांदणी
४९) चिंतन
५०) मिठाई तयार करणारा
५२) शहर,गाव
५४) केर
५७) चिटविकणे
५८) चेष्टा,टिंगल
६०) भीतीने वा थंडीने शरीराचे कंपन होणे
६१) कोळशाचे दुकान
६२) होकारच्या विरुद्धचा शब्द
६४) भ्रमंती करणे,फिरणे
६५) नाविक दल
६६) वेलाला येणारे एक उन्हाळी फळ
६९) फणसाचा एक प्रकार
७१) अर्धी ओंजळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागच्या शब्दकोड्याचे उत्तर



**नागरिकांचा रोष, विद्यार्थ्यांचे प्रश्न, समाजमाध्यमांवरील प्रतिक्रिया ही केवळ सत्ताधाऱ्यांवरील टीका नसते, तर लोकशाहीचा इशारा असतो. या इशाऱ्याचे रूपांतर सुधारणा आणि संवादात झाल्यास समाज अधिक मजबूत होतो. दुर्लक्ष झाले तर सत्तेची ताकद कितीही मोठी असली, तरी जनतेच्या मनातील असंतोषाकडे कायम दुर्लक्ष करता येत नाही, याची इतिहास पुन्हा आठवण करून देतो. आजच्या भारतासमोर हाच सर्वात मोठा धडा आहे.**

# जनतेच्या असंतोषापुढे सत्तेची ताकद फिकी



इतिहास पुनरावृत्ती करतो का, हा प्रश्न जितका जुना आहे, तितकाच महत्त्वाचा आहे. कार्ल मार्क्सने म्हटले होते, की इतिहास प्रथम शोकांतिकेच्या रूपात आणि नंतर प्रहसनाच्या रूपात समोर येतो. सुप्रसिद्ध विचारवंत मार्क ट्वेनचे मत यापेक्षा थोडे वेगळे होते. त्याच्या मते इतिहास पुन्हा घडत नाही; परंतु अनेकदा त्याचे स्वरूप पूर्वीच्या घटनांशी साधर्म्य दाखवते. भारताच्या सध्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीकडे पाहिल्यास ट्वेनचे निरीक्षण अधिक समर्पक वाटते. कारण देशात निर्माण होत असलेली अस्वस्थता, वाढती आर्थिक अनिश्चितता, तरुणांमधील नाराजी आणि जागतिक घडामोडींचे परिणाम यांमध्ये १९७३-७५ या कालखंडाच्या काही छटा निश्चितपणे दिसून येतात; मात्र आजचा भारत त्या काळातील भारत नाही. त्यामुळे तुलना करताना साम्यांइतकेच फरकही लक्षात घेणे आवश्यक आहे. १९७१ मध्ये इंदिरा गांधी यांनी अभूतपूर्व राजकीय यश मिळवले. लोकसभा निवडणुकीतील प्रचंड विजय, पाकिस्तानविरुद्धच्या युद्धातील यश आणि बांगलादेशची निर्मिती यामुळे त्यांची प्रतिमा चांगलीच निखरली होती. देशाच्या राजकारणात त्यांचे निर्विवाद वर्चस्व होते. काँग्रेस पक्ष, केंद्र सरकार, राज्ये आणि प्रशासकीय यंत्रणा या सर्वांवर त्यांचा प्रभाव होता; परंतु इतिहासाने दाखवून दिले, की कोणतीही लोकप्रियता कायमस्वरूपी नसते. १९७२ आणि १९७३ मधील अपुरा पाऊस, कृषी उत्पादनातील घट, जागतिक तेलसंकट आणि वाढती महागाई यांनी अर्थव्यवस्थेला हादरा दिला. बेरोजगारी वाढली. सामान्य नागरिकांचे जीवन कठीण झाले. आर्थिक प्रश्नांमधून निर्माण झालेली अस्वस्थता हळूहळू राजकीय विरोधात परिवर्तीत झाली.

गुजरातमधील नवनिर्माण आंदोलन आणि बिहारमधील विद्यार्थी आंदोलन ही त्या असंतोषाची प्रतीके होती. सुरुवातीला ती आंदोलने राजकीय नव्हती. वाढत्या महागाईमुळे आणि जीवनावश्यक खर्चातील वाढीमुळे सामान्य लोक त्रस्त झाले होते. विद्यार्थ्यांनी या असंतोषाला आवाज दिला. भ्रष्टाचाराविरोधात घोषणाबाजी सुरू झाली. पुढे जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनांना व्यापक लोकसमर्थन मिळाले. सरकार आणि जनतेतील विश्वासाचा धागा कमकुवत होत गेला. त्यानंतर आलेली आणीबाणी भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वाधिक वादग्रस्त अध्याय ठरला. आजची परिस्थिती पाहताना काही बाबी विचार करायला भाग पाडतात. पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक तेलबाजार अस्थिर आहे. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशासाठी तेलाच्या किंमतीतील वाढ ही केवळ आर्थिक समस्या नसून सामाजिक परिणाम घडवणारी बाब असते. इंधन महागले, की वाहतूक खर्च वाढतो, त्याचा परिणाम वस्तूंच्या किंमतींवर होतो आणि महागाई वाढते. महागाईचा सर्वाधिक फटका मध्यमवर्ग आणि निम्न-मध्यमवर्गाला बसतो. त्याच वेळी रोजगारनिर्मितीचा वेग अपेक्षेइतका नसल्याची भावना तरुणांमध्ये आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्थिर रोजगार मिळवण्यासाठी त्यांना मोठी स्पर्धा करावी लागते. ही परिस्थिती अस्वस्थता निर्माण करणारी आहे.

भारताची लोकसंख्या तरुण आहे. देशाच्या विकासासाठी ही मोठी ताकद मानली जाते; परंतु हीच शक्ती संधींच्या अभावामुळे नाराज झाली, तर सामाजिक आणि राजकीय दबावाचे रूप धारण करू शकते. आज लाखो विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीत गुंतले आहेत. वैद्यकीय शिक्षणासाठी 'नीट', अभियांत्रिकीसाठी 'जेईई', व्यवस्थापनासाठी 'कॅट', 'कायद्यासाठी क्लॅट', केंद्रीय विद्यापीठांसाठी 'सीयूईटी' तसेच 'यूपीएससी', संरक्षण दलांच्या परीक्षा आणि इतर असंख्य भरती प्रक्रिया यामुळे तरुणांचे जीवन स्पर्धेच्या चक्रात अडकले आहे. या परीक्षांमधील गैरव्यवहार, पेपरफुटी, निकालांवरील वाद किंवा भरती प्रक्रियेतील विलंब यामुळे निर्माण होणारी निराशा केवळ वैयक्तिक राहत नाही, तर व्यापक सामाजिक असंतोषाचे रूप घेऊ शकते. कोचिंग उद्योगाचे वाढते साम्राज्य हेही या वास्तवाचे एक महत्त्वाचे प्रतीक आहे. शिक्षण हे ज्ञान मिळवण्याचे साधन राहण्याऐवजी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याचे माध्यम बनत चालले आहे. अनेक कुटुंबे आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग कोचिंगवर खर्च करतात. निम्न-मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी हा खर्च अनेकदा कर्ज घेऊन भागवावा लागतो. त्यानंतरही यशाची हमी नसते. त्यामुळे आर्थिक आणि मानसिक तणाव वाढतात. अशा परिस्थितीत परीक्षा रद्द होतात किंवा गैरव्यवहार उघडकीस येतात, तेव्हा तरुणांचा संताप वाढणे स्वाभाविक असते; अर्थात सध्याच्या भारताची तुलना थेट १९७३ च्या भारताशी करणे योग्य ठरणार नाही. त्या काळात भारतीय अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीवर अवलंबून होती. आज परिस्थिती वेगळी आहे.

आज सेवा क्षेत्र, उद्योग, तंत्रज्ञान, दूरसंचार, डिजिटल अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांनी मोठी प्रगती केली आहे. भारत जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनला आहे. परकीय चलनसाठा, वित्तीय संस्था, बँकिंग व्यवस्था आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासन या बाबतीत देश अधिक सक्षम आहे. त्यामुळे कोणतेही आर्थिक संकट आले, तरी त्याचा सामना करण्याची क्षमता पूर्वीपेक्षा अधिक आहे. लोकशाही व्यवस्थाही अधिक परिपक्व झाली आहे. माध्यमांचे स्वरूप बदलले आहे. सामाजिक माध्यमांनी नागरिकांना अभिव्यक्तीचे नवे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. यामुळे सरकारवरील सार्वजनिक दबाव वाढतो. कोणतीही घटना काही तासांमध्ये राष्ट्रीय चर्चेचा विषय बनू शकते. हे लोकशाहीसाठी सकारात्मक आहे; परंतु त्याचबरोबर अफवा, दिशाभूल आणि भावनिक प्रतिक्रियांचा धोकादेखील वाढवते. त्यामुळे सरकार, माध्यमे आणि नागरिक या तिन्ही घटकांनी अधिक जबाबदारीने वागण्याची गरज आहे. राजकीयदृष्ट्या पाहिले तर आणखी एक महत्त्वाचा फरक दिसतो. १९७० च्या दशकातील विरोधी नेतृत्वाला जनआंदोलनांचा दीर्घ अनुभव होता. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या व्यक्तींना नैतिक नेतृत्वाची प्रतिमा लाभली होती. आज विरोधी पक्षांकडे तितकी व्यापक सामाजिक विश्वासार्हता आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे सध्याच्या असंतोषाला तात्काळ संघटित राजकीय रूप मिळेलच असे नाही; परंतु याचा अर्थ जनतेतील नाराजी दुर्लक्षित करता येईल, असा नाही. कारण असंतोषाला नेहमी संघटित नेतृत्वाची आवश्यकता असतेच असे नाही.

आज सामाजिक माध्यमांच्या युगात भावना जलद गतीने पसरतात आणि त्यांचे परिणाम अनपेक्षित असू शकतात. या पार्श्वभूमीवर सरकारसमोरची सर्वात मोठी जबाबदारी म्हणजे विश्वास टिकवून ठेवणे. कोणत्याही लोकशाहीत जनतेचा विश्वास हे सर्वात मोठे राजकीय भांडवल असते. रोजगार, शिक्षण, परीक्षा व्यवस्था, कृषी, महागाई आणि प्रशासनातील पारदर्शकता या क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा करणे आवश्यक आहे. विशेषतः उच्च शिक्षण क्षेत्रात व्यापक बदलांची गरज आहे. केवळ प्रवेश परीक्षांची संख्या वाढवून किंवा नवीन योजना जाहीर करून समस्या सुटणार नाहीत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधनाच्या संधी, कौशल्यविकास आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यांवर भर द्यावा लागेल. तरुणांच्या अपेक्षा समजून घेणे कोणत्याही सरकारसाठी अनिवार्य आहे. आजचा युवक अधिक माहितीपूर्ण, अधिक महत्त्वाकांक्षी आणि अधिक जागरूक आहे. तो केवळ आश्वासनांवर समाधानी राहत नाही. त्याला परिणाम अपेक्षित असतात. रोजगार, सामाजिक न्याय, संधींची समानता आणि पारदर्शकता या बाबतीत तो अधिक संवेदनशील आहे. त्यामुळे प्रशासनाने संवाद वाढवणे, चुका मान्य करणे आणि तातडीने दुरुस्तीची पावले उचलणे आवश्यक आहे. इतिहास आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. संकटे अचानक निर्माण होत नाहीत. ती हळूहळू आकार घेतात. सुरुवातीला ती किरकोळ असंतोषाच्या स्वरूपात दिसतात. त्याकडे दुर्लक्ष झाले, तर ती व्यापक अस्थिरतेत रूपांतरित होतात. १९७३ ते १९७५ या काळातील अनुभव याची साक्ष देतात.

आजचा भारत अधिक मजबूत आहे; परंतु कोणताही देश लोकांच्या अपेक्षांपासून वेगळा राहू शकत नाही. आर्थिक विकासाची आकडेवारी महत्त्वाची असली, तरी नागरिकांच्या अनुभवांइतकी ती प्रभावी नसते. म्हणूनच सध्याच्या परिस्थितीकडे भीतीने नव्हे, तर सजगतेने पाहण्याची गरज आहे. आज १९७३ ची पुनरावृत्ती होणार नाही, कारण इतिहास तसाच परत येत नाही; पण त्या काळातील काही संकेत आज पुन्हा दिसत असतील, तर त्यांना वेळेवर ओळखणे आवश्यक आहे. महागाई, बेरोजगारी, शिक्षणातील अडचणी आणि तरुणांचा वाढता असंतोष या प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना केल्या, तर संकट टाळता येईल. अन्यथा, असंतोषाचा आवाज अधिक तीव्र होईल. **

# महागाईच्या विळख्यात तरुणाई

## सरकारला लाडक्या भावांची आठवण कधी होणार?

विशेष
विक्रांत वार्डे





सध्या देशात पेट्रोल, डिझेल आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर सातत्याने वाढत आहेत. या वाढत्या महागाईचा सर्वात मोठा फटका जर कुणाला बसत असेल, तर तो सामान्य तरुणांना. रोज नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या युवकाचा महिन्याचा खर्च प्रचंड वाढला आहे. काही वर्षांपूर्वी जेवढ्या पैशात महिनाभराचा इंधन खर्च भागायचा, तेवढे पैसे आता काही दिवसांतच संपतात. आज अनेक तरुण खाजगी कंपन्यांमध्ये काम करतात. त्यांना रोज २०, ३० किंवा ५० किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. पगार मात्र तेवढाच आणि खर्च दिवसेंदिवस वाढतोय.

पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे नोकरी टिकवणंही काही जणांसाठी कठीण होत चाललं आहे. काम करा, प्रवास करा आणि महिनाअखेरीस हातात काहीच उरू नये, अशी अवस्था अनेकांची झाली आहे. व्यवसाय करणाऱ्या तरुणांची परिस्थितीही काही वेगळी नाही. मालवाहतूक महाग झाली, वाहनांचा खर्च वाढला, ग्राहकांची क्रयशक्ती कमी झाली. परिणामी छोट्या व्यावसायिकांच्या नफ्यावर थेट गदा आली आहे. अनेक तरुणांनी कर्ज काढून व्यवसाय सुरू केले, पण वाढत्या खर्चामुळे त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभं राहिलं आहे.

पर्यटन क्षेत्राशी संबंधित हॉटेल, रेस्टॉरंट, होमस्टे आणि खाद्य व्यवसाय करणाऱ्या तरुणांची व्यथा तर अधिक गंभीर आहे. गॅस सिलिंडरचे वाढते दर, भाजीपाला आणि अन्नधान्याच्या किमती, वीजबिले, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर खर्च यामुळे व्यवसाय चालवणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

ग्राहकांना जास्त दर लावले तर ते नाराज होतात, आणि दर वाढवले नाहीत तर नफा राहत नाही. अनेक तरुणांनी शिक्षण पूर्ण करून किंवा कर्ज काढून हॉटेल व्यवसाय उभा केला आहे. पण आज त्यांच्यासमोर व्यवसाय टिकवण्याचंच मोठं आव्हान उभं आहे.

लग्नाचा विचार करणाऱ्या तरुणांची अवस्था तर आणखी कठीण आहे. सोन्याचे भाव गगनाला भिडले आहेत. घर, वाहन, संसाराची सुरुवात, बँकेचे हप्ते आणि त्यात महागाईचा वाढता बोजा. सामान्य कुटुंबातील तरुणाने भविष्याची स्वप्नं तरी कशी पाहायची? आज अनेक तरुणांना लग्नापेक्षा आर्थिक स्थैर्याचीच जास्त चिंता वाटू लागली आहे. निवडणुका आल्या की तरुणांच्या नावाने घोषणा केल्या जातात. रोजगार, विकास, संधी, उद्योजकता यावर मोठमोठी भाषणं होतात. पण निवडणुका संपल्या की त्याच तरुणांच्या अडचणींकडे दुर्लक्ष होताना दिसतं.

पेट्रोल, डिझेल, शिक्षण, घर, व्यवसाय, रोजगार अशा मूलभूत प्रश्नांवर ठोस उपाययोजना कधी होणार? आजचा तरुण फक्त आश्वासनं मागत नाही. त्याला दिलासा हवा आहे. त्याच्या खिशावर पडणारा भार कमी व्हावा, त्याच्या मेहनतीला न्याय मिळावा आणि त्याला भविष्याबद्दल आत्मविश्वास वाटावा, एवढीच अपेक्षा आहे. सरकारने आता इलेक्शन इलेक्शन न खेळता राजकीय समीकरणं, पक्षांतरं आणि निवडणुकांचे हिशोब यापलिकडे जाऊन तरुणांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिलं पाहिजे.

कारण आजचा तरुण हा फक्त मतदार नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तरुणांच्या खिशावर दिवसेंदिवस वाढणारा भार कमी करण्यासाठी सरकारकडे काही ठोस योजना आहेत का? की पुन्हा एकदा निवडणुका, प्रचार आणि राजकीय गणितांमध्येच तरुणांच्या प्रश्नांचा बळी जाणार?

आज रायगडपासून महाराष्ट्रापर्यंत आणि महाराष्ट्रापासून देशभरातील लाखो तरुण हा प्रश्न विचारत आहेत. आणि या प्रश्नाचं उत्तर आता भाषणातून नव्हे, तर कृतीतून मिळायला हवं. **

**– अध्यक्ष,शेकाप पुरोगामी युवक संघटना, अलिबाग तालुका**



# विद्यार्थी जडणघडणीत बुद्धीगुणांक : एक महत्त्वाचा घटक

सुनील गवळी

आजच्या ज्ञानाधारित, स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या जगात शिक्षणाची व्याख्या केवळ परीक्षेतील गुण किंवा शैक्षणिक यश इतकी मर्यादित राहिलेली नाही. शिक्षणाचा खरा उद्देश विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात आहे. प्रत्येक विद्यार्थी हा स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घेऊन जन्माला येतो. त्याची विचारशक्ती, आकलन क्षमता, शिकण्याची पद्धत, भावनिक जडणघडण, आवडीनिवडी आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना एकाच निकषावर मोजणे किंवा एकाच चौकटीत बसवण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरत नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतांचा अंदाज घेण्यासाठी बुद्धीगुणांक हा एक महत्त्वाचा आणि उपयुक्त घटक मानला जातो.

बुद्धीगुणांक म्हणजे व्यक्तीची तर्कशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता, आकलनशक्की, स्मरणशक्ती आणि विचारांची गती यांचे शास्त्रीय मापन होय. हा विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा अंतिम मापदंड नसला, तरी त्याच्या बौद्धिक क्षमतेची दिशा समजून घेण्यासाठी तो उपयुक्त ठरतो. विद्यार्थ्यांचा लक्षात घेऊन त्यांना योग्य शिक्षण, समुपदेशन आणि मार्गदर्शन दिल्यास त्यांच्या क्षमतांचा अधिक प्रभावी विकास करता येतो.

विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक क्षमतांच्या विविध पातळ्या आढळतात. काही विद्यार्थी अत्यंत बुद्धिमान असतात. त्यांची निरीक्षणशक्ती तीव्र असते, नवीन संकल्पना ते लवकर समजून घेतात आणि सर्जनशील विचार करतात. अशा विद्यार्थ्यांना नेहमीच्या अभ्यासक्रमाबरोबरच संशोधन, प्रकल्प, विज्ञान प्रदर्शन, वाचन आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणाऱ्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्यांच्या जिज्ञासेला योग्य दिशा मिळाली तर ते समाजासाठी मौल्यवान योगदान देऊ शकतात.

सरासरी बुद्धिमत्ता असलेले विद्यार्थी समाजातील मोठा घटक असतात. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि सकारात्मक प्रोत्साहन मिळाल्यास हे विद्यार्थीही उत्कृष्ट यश संपादन करू शकतात. अशा विद्यार्थ्यांसाठी नियमित अभ्यास, पुनरावृत्ती, कौशल्याधारित शिक्षण आणि आत्मविश्वास वाढविणाऱ्या उपक्रमांची आवश्यकता असते.

काही विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी अधिक वेळ, संयम आणि विशेष मार्गदर्शनाची गरज असते. अशा विद्यार्थ्यांकडे कमीपणाने पाहण्याऐवजी त्यांच्या शिकण्याच्या शैलीचा अभ्यास करून त्यानुसार अध्यापन करणे आवश्यक आहे. दृश्य साधने, अनुभवाधारित शिक्षण, कृतीप्रधान उपक्रम आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन यांच्या माध्यमातून त्यांची प्रगती घडवून आणता येते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात; गरज असते ती ते ओळखण्याची आणि विकसित करण्याची.

भारतीय तत्त्वज्ञान आणि संतपरंपरा देखील व्यक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमतांचा आदर करण्याचा संदेश देतात. भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, ''स्वधर्मे निधनं श्रेयः'' म्हणजे प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्वभाव, क्षमता आणि कर्तव्यांनुसार कार्य केले पाहिजे. हा संदेश शिक्षणक्षेत्रातही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या बौद्धिक पातळी, आवड आणि क्षमतांनुसार शिक्षण व मार्गदर्शन मिळाले पाहिजे.

स्वामी विवेकानंद यांनी ''प्रत्येक आत्मा संभाव्य दिव्य आहे'' असे सांगून प्रत्येक व्यक्तीमध्ये अमर्याद क्षमता दडलेल्या असल्याचे अधोरेखित केले आहे. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे मनुष्यामधील परिपूर्णतेचे प्रकटीकरण होय. म्हणूनच विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना ओळखून त्यांचा विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय असले पाहिजे. संत तुकाराम महाराजांनी ''जसे बीज तसे फळ'' असे सांगून प्रत्येक व्यक्तीचा विकास त्याच्या स्वभावधर्मानुसार होत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक क्षमतांचा आदर करणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार असतो. विद्यार्थ्यांच्या , आवडी, क्षमता आणि शिकण्याच्या गतीचा विचार करून अध्यापन पद्धतीत आवश्यक बदल करणे ही काळाची गरज आहे. वर्गात प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचा आदर करणे, त्यांना प्रयोग करण्याची संधी देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला यशाची अनुभूती मिळवून देणे हे शिक्षकांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे.

विशेषतः कमी गतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर टीका करणे, त्यांची इतरांशी तुलना करणे किंवा त्यांना कमी लेखणे हे त्यांच्या आत्मविश्वासाला धक्का देणारे ठरते. त्याऐवजी त्यांच्या छोट्या-छोट्या यशाचे कौतुक करणे, त्यांना सकारात्मक अभिप्राय देणे आणि सातत्याने प्रेरणा देणे अधिक परिणामकारक ठरते. शिक्षकांचा एक प्रोत्साहनपर शब्द विद्यार्थ्याच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकतो.

पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वपूर्ण आहे. पालक हे मुलांचे पहिले आणि कायमचे शिक्षक असतात. अनेक वेळा पालक आपल्या मुलांची तुलना इतर मुलांशी करतात, ज्यामुळे मुलांच्या मनात न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. प्रत्येक मूल वेगळे असते आणि त्याची प्रगतीही वेगळ्या गतीने होत असते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या क्षमतांचा स्वीकार करून त्यानुसार अपेक्षा ठेवणे आवश्यक आहे.

मुलांच्या यशाचे कौतुक करण्याबरोबरच त्यांच्या अपयशालाही समजून घेणे गरजेचे आहे. अपयश म्हणजे शेवट नसून शिकण्याची एक संधी आहे, हा दृष्टिकोन मुलांमध्ये विकसित करणे आवश्यक आहे. घरातील प्रेमळ वातावरण, संवाद, भावनिक आधार आणि सकारात्मक प्रेरणा यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांची शिकण्याची क्षमता अधिक प्रभावीपणे विकसित होते.

विद्यार्थ्यांनीदेखील स्वतःची जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या सामर्थ्यांचा आणि मर्यादांचा स्वीकार केला पाहिजे. स्वतःची तुलना इतरांशी करण्याऐवजी स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे आहे. सातत्यपूर्ण प्रयत्न, वेळेचे नियोजन, मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या आधारे कोणताही विद्यार्थी प्रगती करू शकतो.

उच्च बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतेचा उपयोग केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी न करता इतरांना मदत करण्यासाठीही केला पाहिजे. दुसरीकडे, कमी गतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी निराश न होता प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. इतिहासात अनेक महान व्यक्तींनी सुरुवातीला सामान्य किंवा अपयशी मानले जाऊनही अथक परिश्रमांच्या जोरावर मोठे यश मिळविले आहे.

समुपदेशनाच्या प्रक्रियेत एक महत्त्वाचा सिद्धांत लक्षात ठेवला पाहिजे, प्रत्येक विद्यार्थी अद्वितीय आहे. बुद्धिमत्ता ही पूर्णपणे स्थिर नसते; योग्य वातावरण, प्रशिक्षण, अनुभव आणि प्रयत्नांमुळे तिचा विकास होऊ शकतो. मानसशास्त्रज्ञांनीही विकसनशील मनोवृत्ती या संकल्पनेद्वारे हे सिद्ध केले आहे की, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि योग्य मार्गदर्शनामुळे व्यक्तीच्या क्षमतांमध्ये सकारात्मक बदल घडू शकतो.

आजच्या काळात बरोबरच भावनिक बुद्धिमत्ता सामाजिक कौशल्ये, सर्जनशीलता, नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि नैतिक मूल्ये यांनाही तितकेच महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ बुद्धीगुणांकाच्या आधारे न करता त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विचार करणे आवश्यक आहे. शेवटी, शिक्षक आणि पालकांनी आपल्या वर्तनातून विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. संयम, प्रामाणिकपणा, कष्ट, सकारात्मकता, शिस्त आणि संवेदनशीलता या मूल्यांचे आचरण जेव्हा मोठी माणसे करतात, तेव्हा ती मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात सहजपणे रुजतात. उपदेशापेक्षा उदाहरणाचा प्रभाव अधिक खोलवर आणि दीर्घकालीन असतो. **

## कविता

### तु बाळ मी आई

तुझ्या जाण्याने बदलेल का सारे काही?
मग स्वत:चा जीव झाडाला का टांगून
देई. दोष का लावतोस तू मजसी,
मागील प्रारब्ध ही असते प्रत्येका ठाई.
कर्म आपुले सच्चाईने करीत जाई,
देईन साथ तुझी नित्यनिरंतरी. अनमोल
जिवन दिले मी माझ्या बाळांसी,
ते का असे व्यर्थ घालविण्यापाई.
हम गया नही जिंदा है ! हे असे सत्यवचन,
ह्याची येईल प्रचिती तुझ ठाई ठाई.
हात हाती देता तु मजलागी,
हात सोडीत नसती ही आई,
अशक्य ही शक्य करेन सारे काही,
बाळा अशक्य ही शक्य करेन सारे काही.

–सुवि

# राजकीय घराणेशाहीची ‘‘सदाबहार’’ परंपरा...!!

महाराष्ट्रात विधान परिषदेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागताच राजकीय घराणेशाहीला आलेला ऊत हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू आणणारा आहे. वर्षानुवर्षे पक्षाची प्रामाणिकपणे सेवा केल्यानंतरही निवडणुकीत जेव्हा तिकीट देण्याची वेळ येते तेव्हा प्रत्येकवेळी निष्ठावंत कार्यकर्त्यांऐवजी राजकीय नेत्यांकडून आपल्या कुटुंबातील सदस्यालाच पुढे आणले जाते. राजकीय घराणेशाहीची ही सदाबहार परंपरा जर अशीच सुरू राहिली तर ती लोकशाहीसाठी मारक ठरू शकते. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण सर्वांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. विविध संस्थाने भारतात विलीन होताच राजेशाहीचा आपल्या देशातून अस्त झाला. परंतु, असे असले तरी नंतरच्या काळात मात्र लोकशाही अस्तित्वात असतानाही राजकीय नेत्यांनी विविध निवडणुकांमधून आपल्या कुटुंबातील सदस्यांना तिकिटे देत घराणेशाहीला खतपाणी घातले. केवळ निवडणुकांची तिकिटेच नाही तर विविध महत्त्वाच्या पदांसाठीही नेत्यांकडून आपल्या नातेवाईकांची वर्णी लावली जाते. नेत्यांचे नातेवाईक राजकारणात वर्षानुवर्षे ठिय्या देऊन बसत असतील, तर खरेच ही लोकशाही आहे का असा प्रश्न पडतो. जनतेची सेवा करण्यासाठी असणारी पदे राजकीय घराणेशाहीमुळे वर्षानुवर्षे जर एकच कुटुंब उपभोगत असेल तर हीदेखील एकप्रकारची राजेशाहीच नाही का?

**शिवाजी चौगुले**

देशात विविध ठिकाणी राजकीय घराणेशाहीचे वाढलेले प्रमाण एकदिवस लोकशाहीला संपविल्याशिवाय राहणार नाही. विधान परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होताच अनेक प्रस्थापित नेत्यांनी आपल्या मुलांना तिकीट मिळावे, यासाठी मोठी धडपड सुरू केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे आपला मुलगा अनिकेत तटकरेंसाठी, मंत्री भरत गोगावले आपला मुलगा विकास गोगावलेंसाठी, बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर आपला मुलगा क्षितिज ठाकुरांसाठी, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे हे आपली कन्या रोहिणी खडसेंसाठी, काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार आपली मुलगी शिवानी वडेट्टीवार यांच्यासाठी, सोलापुरातील राजकारणातील बडे प्रस्थ असलेले विजयसिंह मोहिते-पाटील हे आपले पुत्र रणजितसिंह मोहिते-पाटील यांना तिकीट मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. आपल्या राजकीय नेत्यांकडून कौटुंबिक सदस्यांसाठी मोर्चेबांधणी सुरू होताच सर्वसामान्य कार्यकर्त्यांकडे डोळे पुसल्याशिवाय काही पर्याय राहिलेला नाही. आपल्या मुलांना तिकीट मिळवण्याच्या धामधुमीत कार्यकर्त्यांच्या डोळ्यातील अश्रूही अनेक राजकीय नेत्यांना दिसेनासे झाले आहेत किंवा त्याकडे मुद्दामच दुर्लक्ष केले जात आहे. कार्यकर्त्यांना केवळ सतरंज्या उचलण्यापुरतेच मर्यादित ठेवले जात आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांच्या लाठ्या-काठ्या खाण्याची वेळ येते, तेव्हा त्यांना पुढे केले जाते.

प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांसोबत दोन हात करण्याची वेळ आल्यावर कार्यकर्ता आठवतो. निवडणुकीच्या प्रचाराची वेळ आली की, कार्यकर्त्यांशिवाय पुढे जात नाही. दारोदार प्रचाराची पत्रके वाटण्याची वेळ आली तर त्याचेही ओझे कार्यकर्त्यांनीच उचलायचे. सर्व सेवा करायची कार्यकर्त्यांनी, तिकिटांचा मेवा खायचा मात्र नेत्यांच्या मुलांनी, असे आणखी किती दिवस चालणार? लोकशाहीत सर्वसामान्य कार्यकर्त्याला पक्षाचा कणा मानला जातो. पण, जेव्हा सत्तेची पदे देण्याची वेळ येते, तेव्हा मात्र हा कणा बाजूला सारून नेत्यांच्या घरातील मंडळींना प्राधान्य दिले जाते. महाराष्ट्राच्या राजकारणात घराणेशाही नवीन नाही. विधानसभा असो, लोकसभा असो की स्थानिक स्वराज्य संस्था, विविध घराण्यांचे वर्चस्व तिथे पिढ्यानपिढ्या पाहायला मिळते. लोकप्रतिनिधींच्या निवडणुकीत जनतेला थेट आपला नेता निवडण्याचा अधिकार असतो. तिथे घराणेशाही असली तरी जनतेच्या दरबारात कौल घेण्याचे आव्हान असते. विधान परिषदेचे गणित मात्र वेगळे आहे. येथे आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी सदस्य निवडून देतात किंवा अनेकदा थेट पक्षाचे हायकमांड कोणाला तिकीट द्यायचे हे ठरवतात. त्यामुळे जनतेच्या दरबारात थेट परीक्षा न देता, केवळ कौटुंबिक संबंधांच्या जोरावर विधिमंडळाचे तिकीट मिळवणे नेत्यांच्या मुलांना किंवा नातेवाईकांना अधिक सोपे जाते. या घराणेशाहीमुळे विधान परिषदेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. घटनाकारांनी विधान परिषदेची रचना करताना अशी अपेक्षा ठेवली होती की, ज्या व्यक्ती थेट निवडणुकीच्या राजकारणात पडू शकत नाहीत, पण ज्यांच्याकडे ज्ञान, अनुभव आणि समाजाला दिशा देण्याची क्षमता आहे, अशांना संधी देण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली होती. उदा. शिक्षक, पदवीधर, साहित्यिक, शास्त्रज्ञ किंवा ज्येष्ठ समाजसेवक अशा व्यक्तींना या सभागृहात स्थान मिळावे, यासाठी ही विधान परिषद होती.

परंतु, आजचे चित्र पाहिले तर असे जाणवते की, फोडाफोडीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी, राजकीय पक्षातील वजन आणि नेत्यांशी असलेले रक्ताचे नाते हीच विधान परिषदेत जाण्याची प्रमुख पात्रता बनली आहे. विधान परिषद राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांचे पुनर्वसन केंद्र किंवा घराण्यातील वारसांचे राजकीय लाँचिंग पॅड बनत चालली आहे. घराणेशाहीचा मुद्दा येताच नेत्यांच्या वारसांना राजकारणात येण्याचा अधिकार नाही का? असा युक्तिवाद अनेकदा केला जातो. डॉक्टरचा मुलगा डॉक्टर आणि वकिलाचा मुलगा वकील होऊ शकतो, मग नेत्याचा मुलगा नेता का नाही? हा प्रश्न वरकरणी योग्य वाटत असला तरी इतर क्षेत्रांत वारसाला स्वतःची पात्रता आणि कुवत सिद्ध करावी लागते. नेत्यांच्या मुलाला मात्र वडिलांच्या पुण्याईमुळे थेट पक्षाचे सर्वात मोठे तिकीट मिळते. जिथे गुणवत्तेपेक्षा रक्ताच्या नात्याला अधिक महत्त्व आहे. जोपर्यंत राजकीय पक्ष या घराणेशाहीच्या विळख्यातून बाहेर पडत नाहीत, तोपर्यंत लोकशाही खऱ्या अर्थाने प्रगल्भ होणार नाही. पक्षांनी आता तरी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. नेत्यांच्या घरापलीकडे जाऊन, जमिनीवर काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना आणि समाजातील खऱ्या सुजाण तज्ज्ञांना विधिमंडळात पाठवायला हवे. अन्यथा, विधान परिषद ही केवळ नेत्यांच्या नातलगांची परिषद म्हणून उपहासली जाईल. लोकशाहीवरील जनतेचा विश्वास आणखी कमी होईल. **

## व्यसनमुक्त समाजासाठी...

# वादळाचे किनारे

वादळाचे किनारे, हे डॉ.आनंद नाडकर्णी यांचे पुस्तक साधना प्रकाशनने, प्रकाशित केले आहे. संपूर्ण कुटुंबस्वास्थ्याला ग्रहण लावणाऱ्या व्यसनांच्या आजाराचे, त्या वातावरणात वाढणाऱ्या मुलांवर खोल परिणाम होतात. त्यांची व्यथा समजत नाही. अशा सहा प्रातिनिधिक कहाण्यांचा हा संग्रह आहे. त्यामधून आपण माणुसकीचा मंत्र शकलो तर अशा अनेकांच्या विकासवाटांना नवे बळ मिळेल,अशी डॉ.आनंद नाडकर्णी यांना खात्री वाटते. व्यसनात अडकलेल्या माणसाचे कुटुंबीय आणि मुले वेगवेगळ्या वयाची, बुद्धीची आणि क्षमतांची असतात. ‘‘मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र’’या पुण्यामध्ये दीर्घकाळ काम करणाऱ्या संस्थेची, कार्याची सविस्तर माहिती या पुस्तकाद्वारे वाचकाला होते. व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्तीसाठी, संस्थेत दाखल केले जाते. त्यांच्या कुटुंबाशी संवाद साधणारे विविध गट कार्यरत असतात. पुस्तकाचे समर्पक मुखपृष्ठ गिरीश सहस्रबुद्धे यांचे आहे.




नाशिकमधील सातवीत शिकणारा शांताराम आईबाबांसह राहतो. बाबा एमआयडीसीमध्ये एका फॅक्टरीत काम करतात. आई कॉलेज रोड जवळच्या सहा घरांमध्ये स्वयंपाकाची कामे करते. शांतारामला गरिबीमुळे पहाटे, सव्वा पाचला सायकल हाणत गंगापूर रोडच्या नाक्यावरून पेपराचा गठ्ठा घेऊन, पेपर टाकावे लागतात. मग दुधाच्या पिशव्यांचे घरोघरी वाटप. वडिलांच्या दारूचे वाढलेले प्रमाण त्याला जाणवते आहे. त्याला बाबा आवडतात, परंतु आता त्यांची वागणूक बदलली आहे. आईबाबांचा अबोला, भांडणे त्याला अस्वस्थ करतात. दारू वाईट असते, मग एवढी दारूची दुकाने का वाढत आहेत? असा त्याला प्रश्न पडतो. एका शनिवारी, आई नेहमी कामाला जात असलेल्या बंगल्यावर, जंगी पार्टी असल्याने, मदतीला बोलावते. चाळीस-पन्नास पाहुण्यांच्या जेवणाची जबाबदारी आईवर असल्याने, तो तिला स्वयंपाकात मदत करतो. बाहेरच्या लॉनवर जमलेले पाहुणे उंची मद्य पिण्यात मग्न असल्याचे शांतारामला जाणवते. दारूच्या सेवनामुळे बंगल्याचे मालक घरातील नोकरांना आणि नंतर पत्नीला वाटेल ते बोलतात, याचा शांतारामला धक्का बसतो. पाहुणे गेल्यानंतर उरलेले खाद्यपदार्थ दोन डब्यांमध्ये भरून, जड पिशव्यांसह शांताराम आईबरोबर बाहेर पडतो. उशीरा रात्री कडेच्या कट्ट्यावर दोघे बसतात. दारूमुळे श्रीमंत आणि गरीब यांची कशी वाताहत होते, हे शांतारामला जाणवते. बाबांना सुधारण्यासाठी, मामा त्यांना पुण्याला एका संस्थेत नेणार असल्याचे त्याची आई सांगते. ‘‘मी आहे तुला...’’ असे शांताराम आईला आश्वासन देतो.

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
**मो. ९२७३३४३१७७**

लता मुंबईमध्ये गिरगावच्या सीमेवर राहते. त्यांची जुनी इमारत पुनर्विकासाच्या मार्गावर आहे. तिच्या कुटुंबाचे, पिढीजात, तंबाखूयुक्त पदार्थ विकण्याचे दुकान आहे. अभ्यासू आणि हुशार, लता महापालिकेच्या शाळेत, पाचवीत आहे. ती आईबाबा आणि आजीआजोबांसह राहत आहे. अधूनमधून लताला दुकानात काम करावे लागते. त्यावेळेला तिचा येणाऱ्या गिऱ्हाईकांशी संवाद घडतो. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ खाणे आरोग्याला वाईट असते, हे तिला शाळेत समजल्यापासून ती अस्वस्थ होते. आपल्या या दुकानाऐवजी, अन्य काही व्यवसाय सुरू करता येईल का, असे तिला प्रश्न पडतात. याबाबत ती आईबाबांशी वेळोवेळी बोलते आणि शेवटी नवीन जागेत जाताना आपण हा व्यवसाय बंद करून, अन्य व्यवसाय सुरू करू, असे लताचे बाबा तिला आश्वासन देतात. त्यामुळे लता खुश होते. राहुल पुण्यात कर्वेनगरमध्ये राहतो. त्याचे बाबा आणि आई आयटीमध्ये काम करतात. राहुल दहावीत असून, उगवता अष्टपैलू खेळाडू अशी त्याची शाळेत ओळख आहे. त्याच्या वडिलांना हॉस्पिटलमध्ये सहाव्या मजल्यावर दाखल केले आहे. आईने सर्वांना बोलावून घेतले आहे. बाबांना क्रिकेटची आवड असल्याने, राहुलची बाबांशी वेळोवेळी चर्चाही होत असे. बाबा एवढे आजारी का आहेत, याची काळजी राहुलला वाटते आहे. नंतर आईकडून त्याला कळते की, त्याचे बाबा क्रिकेटच्या बेटिंगच्या नादाला लागल्याने, प्रचंड प्रमाणात कर्जबाजारी झाले आहेत. त्याचे शारीरिक आणि मानसिक परिणाम कोणते झाले आहेत, हे राहुल चर्चेतून शिकण्याचा प्रयत्न करतो. चुटकी म्हणजे अर्पिता. अमरावतीच्या प्राथमिक शाळेत जाते. मोठ्या कुटुंबामध्ये राहते. तिचे बाबा शेती करतात, इन्शुरन्स एजंटही आहेत. रात्रभर प्रवास करून चुटकी आईसह पुण्याला आल्यावर मीराताईसह बाबांना भेटायला अधीर झाली होती. बाबांचे दारूचे व्यसन सुटावे म्हणून त्यांना मुक्तांगणमध्ये ठेवले होते. छोट्या चुटकीच्या नजरेतून, मुक्तांगणचे दर्शन होते. तेथील विविध गटांमधील चर्चांमधून आणि तेथील कार्यकर्त्यांशी झालेल्या संवादातून मुक्तांगणची उत्तम ओळख होते. चुटकीला बाबा भेटतात. बाबांची सुधारलेली तब्येत पाहून चुटकी खुश होते. जेवण झाल्यावर नाईलाजाने, बाबांचा निरोप घेऊन, चुटकी आईसह गावाला जाते. बाबांची शाळा, हॉस्टेल पाहून चुटकी खुश होते. सौम्या दिल्लीमध्ये एका कायद्याच्या क्षेत्रातील कंपनीमध्ये नोकरी करते. तिचे आईबाबा ठाण्याचे. सौम्याच्या लहानपणीच तिला आईबाबांचे स्वभाव लक्षात येतात. बाबा सक्सेसफुल बिझनेसमन. ते प्रचंड वेगाने ड्रायव्हिंग करायचे आणि भरपूर मद्यपानही! आई सतत त्यांना घाबरून असायची. बाबांना खुश करून हवे ते मिळवण्यात सौम्या तरबेज होती. बाबांच्या क्रेडिट कार्डचा बेलगाम वापर केल्याचे कळल्याने, बाबा संतापला होता. तेव्हाच सौम्याने घराबाहेर पडून आपल्या करिअरकडे विशेष लक्ष दिले होते. तुफान काम करून, जबरदस्त एन्जॉय करण्याचा आदर्श सौम्याने बाबांकडून घेतला होता. तारुण्याच्या पदार्पणातच तिने विविध अमली पदार्थांचे सेवन केले होते. युवान या पहिल्या बॉयफ्रेंडशी ब्रेकअप झाल्यावर तिला वास्तव जाणवले. संगीत, व्यायाम आणि ‘मुक्तांगण’ यांनी तिला सावरले होते. कायद्याचा उत्तम अभ्यास केल्यामुळे तिचे करिअर सुरू झाले. तिच्या जीवनात आता सनीची एन्ट्री झाली आहे. विविध स्पर्धांमध्ये मिळणारे यश तिला आता सुखावते आहे. प्रेषित हा मुंबईच्या जीएस मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस पूर्ण करून नुकताच राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाला आहे. त्याची आई आदिवासी भागातील एका पाड्यामध्ये राहते. प्रेषित मुंबईत शिकत असतानाचे विविध अनुभव त्याने नोंदविले आहेत. हॉस्टेलवर राहत असताना, सुट्यांच्या दिवसात, अन्य विद्यार्थी घरी नातेवाईकांकडे किंवा अन्यत्र जायचे. तेव्हा त्याला शांतपणे, एकट्याने हॉस्टेलवर अभ्यास करायला आवडे. प्रेषित आईच्या पोटात असताना, त्याचे वडील अपघातात मरण पावले होते. त्यावेळी ते दारू प्यालेले होते. जाताना त्यांनी भरपूर कर्ज करून ठेवले होते. आईवर कर्जफेड आणि तीन मुलांचे शिक्षण करण्याची जबाबदारी होती. केवळ शेतीकामावर भागणे शक्य नसल्याने, तिने मोहाची दारू विकणे सुरू केले. मात्र त्यांच्या घरातील कोणीही दारूला कधी स्पर्शही केला नाही. आईची जबाबदारी पूर्ण करण्याच्या हेतूने प्रेषित मन लावून शिकत होता. त्याचे मित्र त्याला दारू पिण्याचा आग्रह करत. परंतु तो दिवसभरात दोन जेवणांशिवाय फक्त पाणी पीत असे. मेडिकल कोर्स पूर्ण झाल्यावर त्याने स्पर्धा परीक्षांचा ध्यास घेतला. झपाटल्याप्रमाणे अभ्यासाला सुरुवात केली. एकदा व्यायाम करताना, प्रेषितच्या मणक्याजवळच्या स्नायूंना इजा झाली. स्पर्धापरीक्षा जवळ आल्याने अभ्यासात खंड पडू नये, म्हणून वेदनाशामक गोळ्या तो घेऊ लागला. मात्र वेदना विसरण्यासाठी या गोळ्या घेण्याचे जणु त्याला व्यसनच लागले. सात दिवसांच्या २१ गोळ्या, तीन दिवसातच फस्त झाल्या होत्या. त्यामुळे तो प्रचंड हादरला होता. आपले शरीर आणि मन प्रभावी वेदनाशामक गोळ्यांचे गुलाम झाल्याचे त्याला जाणवले. दारू सारखेच हे व्यसन तर नव्हे? असे त्याला वाटले. त्याच्या मैत्रिणीने, अन्विताने त्याला आधार दिला. डॉ.शेखर भोजराज यांनी त्याला समजावले. सर्वांच्या मदतीने प्रेषितने स्पर्धा परीक्षा दिली. डॉ. प्रेषित सुपलीबाई तडवी देशात दहावा आणि महाराष्ट्रात पहिला आला. अधिकारी पदावर नियुक्ती झाल्यानंतर, आपल्या गाडीतून प्रेषित मायला भेटायला आला, बरोबर त्याची काळजी घेणारी अन्विताही होती.

शेवटी डॉ. आनंद नाडकर्णी सांगतात, व्यसनी माणसाकडे बघण्याचा समाज दृष्टिकोन प्रदूषित असतो. ही माणसे वाईट, बेजबाबदार आहेत, अशी लोकांची धारणा असते. पण वैद्यकशास्त्र सांगते की, कोणतेही व्यसन हा एक आजार आहे, त्यावर उपचार आहेत. हे उपचार फक्त व्यक्तीसाठीच नाहीत, तर संपूर्ण कुटुंबासाठी आहेत. व्यसन चटकन सुटत नाही. त्यासाठी सवयी बदलायला सतत मार्गदर्शन लागते. स्वतःचा विकास करून घेण्याची तीव्र इच्छा असणेही जरुरीचे असते. व्यसनाधीन व्यक्तीच्या कुटुंबातील मुले या कल्लोळाचे असहाय साक्षीदार असतात. अशा मुलांना समंजस आधार देणे, त्या कुटुंबाप्रमाणेच आपल्या, साऱ्यांसाठीच तो एक माणुसकी जपण्याचा एक मार्ग असणार आहे, असे ते सुचवतात. आनंद यांनी, जणु परकायाप्रवेश करून, पाच व्यक्तिमत्त्वांची मनोगते, त्यांच्याच शब्दांत मांडली आहेत. वादळाचे किनारे, हे पुस्तक व्यसनाधीन, त्यांचे कुटुंबीय आणि समाज या साऱ्यांचा प्रचलित दृष्टिकोन सुधारण्यास निश्चितच मार्गदर्शन करते. डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या अनपेक्षित निधनानंतर, त्यांच्या या पुस्तकाच्या वाचनामुळे, त्यांच्या विविध क्षेत्रांतील व्यापक कार्याची जाणीव होते.

त्यांच्या स्मृतीला भावपूर्ण आदरांजली! **

**पुस्तकाचे नाव: वादळाचे किनारे**
**लेखक : डॉ. आनंद नाडकर्णी**
**प्रकाशक : साधना प्रकाशन, पुणे-३० ७०५८२८६७५३**
**पहिली आवृत्ती : २६ जून २०२३**
**दुसरी आवृत्ती : २५ सप्टेंबर २०२३**
**पृष्ठे : ७२, किंमत : रू. १००/-**

# ताण (स्ट्रेस)

हल्ली ताण हा सगळीकडेच बघायला मिळतो. जो तो स्ट्रेस मध्ये असतो. ह्या विश्वात एकही माणूस असा नाही की, आजच्या युगात तो टेन्शन मध्ये नाही. जिकडे तिकडे आपल्याला टेन्शन टेन्शनच आढळून येत. लहानांपासून तर मोठ्यापर्यंत सर्वच जण तणावातच असतात. जन्मापासून तर मृत्यूपर्यंत माणूस तणावातच वावरत असतो. तणाव माणसाच्या मागे की, माणूस तणावाच्या मागे हे काही कळतच नाही. ही तर तशीच गोष्ट त्रिकालाबाधित सत्य आहे. जसे की, पृथ्वी सूर्याभोवती फिरते तसाच तणाव सुद्धा ह्या माणसाच्या आजूबाजूला असतो आणि सतत फिरत असतो. थोडं काही झालं की टेन्शन येत. माणूस कधी, केव्हा कशाचं टेन्शन घेईल हे सुद्धा सांगताच येत नाही. बर हे प्रत्येक माणसाला टेन्शन वेगळं वेगळं असत. एखाद्याला असं वाटत असतं की ह्याच काही टेन्शन घेण्याचं कारण नाही. ही अगदी साधारण बाब आहे. पण तो मात्र त्याच खूप टेन्शन घेतो. एकासाठी ते खूप टेन्शन असत तर ते दुसऱ्यासाठी काहीच टेन्शन नसत.

तसे बघितले तर ताण हा माणसाच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंत चिटकलेलाच असतो. माणूस हा आयुष्यभर तणावातच वावरत असतो. तो सतत मनाला समजवत असतो की बस माझे एवढे काम झाले की, माझे टेन्शन दूर होईल. परंतु त्याचे काही काम पूर्ण होत नाही आणि ह्याचे काही टेन्शन दूर होत नाही. हे चक्र आयुष्यभर सतत चालूच राहत असत.

मानवाचा आणि तणावाचा संबंध हा कायमचाच आहे. माणसाच्या जन्माची गोष्ट घ्या. तो जन्मल्या बरोबर रडत असतो. तो म्हणत असतो कालपर्यंत मी आईच्या पोटात सुरक्षित होतो. मला कशाला ह्या विश्वात आणले? त्याला असुरक्षित वाटत असते. त्याला ऊन, वारा, पाऊस ह्याची काहीच कल्पना नसते, तो म्हणतो, ते बर होत आईच्या पोटात. ना ऊन, ना वारा, ना पाऊस, ना भूक, ना काही. आईच्या पोटात बरे होते ना भुकेचे टेन्शन, ना कशाचे, सर्व मस्त होते अलबेल. आईच्या पोटातच सुरक्षित होत. कशाला मी इथे आलो ह्या पृथ्वीतलावर? कसे होईल माझे? देव जाणो. मानवाचा जन्म होत नाही तर टेन्शन सुरु होत.

टेन्शन काही आता मानवाला नवीन राहिलेले नाही. मानव ह्या टेन्शनमध्ये रुळलेला आहे. बी.पी. ची गोळी त्याला अगदी सामान्य वाटायला लागली आहे. ५०-६० वयानंतर येणारी बी.पी. ची गोळी ह्याच्या चाळिशीतच यायला लागली आहे. तरी ह्याला धीर देणारे बरेच जण असतात. सतत म्हणत असतात काही टेन्शन घेऊ नको आता बी.पी. नॉर्मल झाला आहे. तो सर्वांनाच असतो. माणूस बघा कसा त्याला आपलं करून घेतो आहे. बी.पी. नॉर्मल झाला आहे म्हणजे काय तर तो आता सर्वांनाच होतो आहे. बी.पी. नॉर्मल थोडीच आहे. बी.पी. मुळेच तर सगळी शरीराची गडबड होत असते. तरी माणूस ह्या बी.पी. ला आत्मसात करायला तयार आहे. काही हरकत नाही बी.पी. तुला पण बघून घेऊ. आपण दोघेजण एकाच घरात गुण्यागोविंदाने राहू. मी तुला सांभाळून घेतो, तू मला सांभाळून घे.



तणावाचे साधारणतः पाच प्रकार आहे. शारीरिक ताण, मानसिक ताण, वातावरणीय ताण, रेडिएशन ताण आणि आर्थिक ताण. हल्ली साधारणतः मानव ह्या पाच तणावातून जात असतो. किंबहुना हे पाच ताण त्याच्या अवती-भवती सतत वावरत असतात. माणसाला कधी ते जाणवतात कधी जाणवत सुद्धा नाहीत. परंतु त्यांची क्रिया ही शरीराच्या आतून चालू असते ती आपल्याला समजून सुद्धा येत नाही.

**अरविंद मोरे**

शारिरीरिक ताण हे कोणाला असतात तर शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, टेलर (शिंपी), संगणक ऑपरेटर, शेतकरी, कटिंग करणारा (केस कापणारा), ड्राइव्हर, कंडक्टर, पोस्टमन, पोलीस, देशाचा रक्षण करणारा सैनिक व कार्यालयातील शिपाई. या सर्वांना उभे राहूनच काम करायचे असते. नाही तर काहींना बैठे काम करावे लागत असते. केस कापणाऱ्याला, शिक्षक, प्राध्यापक, कंडक्टर, पोस्टमन, पोलीस, सैनिक व ऑफिस मधला शिपाई यांना आपले उभे राहूनच कर्तव्य बजावावे लागते. यांचे उभे राहून राहून पाय गळून जातात. घुटने उभे राहून कामातून जातात. यांना खूप शारीरिक ताण सहन करावा लागतो. तसेच टेलर (शिंपी), ऑफिस मधला कारकून, बँकेतील कॅशियर, बँकेतील कर्मचारी, बस ड्राईव्हर यांचा बैठा जॉब असला तरी ह्यांना पाठदुखीचा त्रास होतो. कोणाला फ्रोझन शोल्डर तर अशा बैठे जॉब करणाऱ्या मंडळींना पाठीच्या कण्यावर ताण पडतो आणि पाठीचा कणाच तर आपल्या आरोग्याचा मुख्य कणा आहे. ते बैठे असो की उभे, दोघांनाही शारीरिक ताण हा असतोच. उभे राहून काम करणाऱ्याला वाटत असते बैठे जॉब चांगले आहेत. त्याचे पाय काही दुखत नाही. तर बैठे काम करणाऱ्यांना वाटत असते की उभे राहून काम चांगले आहे. त्यांच्या पाठीचा कणा दुखत नाही. वास्तविक दोघांनाही शारीरिक ताण हा असतोच.

आमच्या बँकेत एक शिपाई होता. तो नेहमी म्हणायचा तुमचं बर आहे राव बसून टायपिंग करता. बैठा जॉब चांगला असतो. तो म्हणायचा शिपायाचा जॉब हा फार कठीण जॉब आहे. पाण्यापावसात, उन्हातान्हात, सायकल वरून येरझारा घालाव्या लागतात. सायकलचे पायंडल मारून पार पायाचा चुरा झाला. गंमत अशी की काही वर्षानंतर ह्या पठ्ठ्याचे प्रमोशन झाले. हा लिपिक झाला, कॅशियर झाला. कॅश केबिन मिळाली. स्वारी खुश झाली. २-३ वर्षांनी मला भेटीला आला आणि मला म्हटला साहेब शिपायाचीच नोकरी चांगली आहे. हे काय कॅशमध्ये बसून बसून पाठीचा कणा गेला, मानेची शीर गेली, फ्रोझन शोल्डर झाला. तेच बरं होत आपलं शिपाई. बघा साहेब काही रेव्हर्सल घेता येतं का? काही प्रावधान आहेत का? ते बर होत शिपाई आझाद पंछी. हे काय पिंजऱ्यात माणूस कैद झाला आहे. कुठे जाता येत नाही. ना सुट्टी, ना काही. सांगायचं तात्पर्य की प्रत्येक जॉब हा तणावाचाच असतो. ज्यांना-ज्यांना शारीरिक ताण असतो त्यांना पुढे जाऊन सर्वोयकल, स्पॉन्डेलिसिस, सायटिका, कंबरदुखी, पाठदुखी, मायग्रेन व संधिवाताचा त्रास होतो. मानसिक ताण हा कशाचाही असू शकतो. कोणी काही बोलले, कोणी काही नाकारले, नाही म्हटले की लगेच मानसिक ताण येतो. हल्ली लहान मुलांना सुद्धा महाभयंकर राग येतो. मी नुकताच मे महिन्यात लग्नाला शिर्डीला गेलो होतो. आलेल्या पाहुण्यांपैकी एका पाहुणीच्या आठ वर्षाची सिद्धी नावाची मुलगी एक खेळणी बघितल्यावर घेण्याचा आग्रह करीत होती. आईने नाही म्हटले तर तिला भयंकर राग आला. एवढा राग की सगळे जेवले पण ही जेवलीच नाही. तिला जेव जेव म्हणून थकले. पेट्रोल पंपावर गाडी पेट्रोल भरण्यासाठी थांबली. आम्ही सर्व सावलीत थांबलो पण ही सिद्धी भर रखरखत्या ४५ डिग्री उन्हात अर्धा तास उभी राहिली. किती मानसिक ताण म्हणायचं तो. ती मुलगी सिद्धी नाही तर जिद्दी होती. अशी सध्या मुलं स्वतःही ताण घेतात आणि पालकांनासुद्धा पराकोटीचा ताण देतात.

दिलेलं काम वेळेत झाले नाही म्हणून टेन्शन. साहेबांनी आत बोलावले म्हणून टेन्शन. आता काय म्हणतील, काय नाही. कधी कधी चांगली खबर असते. इन्क्रिमेंट मिळालेले असतं. आपलं काय असतं आपण अगोदरच गृहीत धरलेले असतं की तो नाही म्हणेल आणि मला नकार पाहिजे नसतो. मला होच पाहिजे असतं. आपण आपल्या मनातच काही कारण नसतांना कालवाकालव सुरु केली असते आणि मानसिक ताण तयार केला असतो. कारण नसताना जी गोष्ट आपल्या हातात नसते किंवा आपल्या आवाक्यात नसते, तिचे ताण घेऊन आपण आपले मानसिक ताण वाढवित असतो. हल्ली भयंकर स्पर्धा निर्माण झाली असल्यामुळे पालकांच्या खूप मुलांकडून अपेक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे मुलांवर भयंकर मानसिक ताण येतो आहे. तो बघ डॉक्टर झाला, इंजिनियर झाला. मुलावर ह्याचा ताण येतो. त्याला, तिला इतके मार्क पडले, तुला पडले पाहिजे. ह्यामुळे मुलांवर भयंकर ताण पडतो. त्यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य सुद्धा बिघडते.

मानसिक ताणामुळे आपल्याला झोप लागत नाही, भूक लागत नाही, ॲसिडिटी होते, मायग्रेन, संधिवात व ब्रेन स्ट्रोक सारखे आजार उद्‌भवत असतात.

वातावरणीय ताण - काही ताण असे असतात जे मानवाच्या नियंत्रणाच्या बाहेर असतात. जसे की, वातावरणातील बदल, हवेतील बदल. ह्यामुळे मानवाचे आरोग्य बिघडते. कधी कधी भर उन्हाळ्यात पाऊस पडतो. भर पावसाळ्यात उकडल्यासारखे होतं. कधी कधी अचानक तापत तर अचानक पाऊस पडतो. दुपारी भयंकर उन्हाळा असतो, तर रात्री एकदम कडाक्याची थंडी. काही काळापूर्वी वातावरण अगदी संतुलित होत. चार महिने पावसाळा, चार महिने हिवाळा तर चार महिने उन्हाळा होता. आता तसे नाही, वातावरणात बदल झाला आहे. ह्या ऋतुचक्रात हिवाळा हा ऋतू गायबच झाला आहे. ह्या बदलामुळे दमा, सर्दी व ताप ह्या रोगांचा प्रार्दूभाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. हवेमध्ये गुणवत्ता राहिलेली नाही. हवेमध्ये मोठ्या प्रमाणात प्रदुषण झाले आहे. ह्यामुळे ॲलर्जी सारखे रोग निर्माण झाले आहेत. **

# सक्ती गरजेची पण ती परकीयांवर नव्हे स्वकीयांवर

महाराष्ट्रात सध्या भाषेच्या मुद्द्यावरून अनेकदा राजकारण तापताना दिसते. मराठी भाषा ही आपल्या अस्मितेचा, संस्कृतीचा आणि ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे, याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. मराठीचा सन्मान झाला पाहिजे, ती टिकली पाहिजे आणि वाढली पाहिजे हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे. मात्र केवळ भाषेची सक्ती करून प्रश्न सुटणार आहे का, हा खरा विचार करण्याचा मुद्दा आहे. आज राज्यातील लाखो मराठी तरुण उच्च शिक्षण घेऊनही बेरोजगार आहेत. अनेकांना आपल्या पात्रतेनुसार नोकऱ्या मिळत नाहीत. उद्योगधंदे वाढत आहेत, मोठमोठ्या कंपन्या महाराष्ट्रात येत आहेत, पण स्थानिक तरुणांच्या हाताला काम कितपत मिळते, हा मोठा प्रश्न आहे.पर प्रांतातून आलेले लोंढे इथे मिळेल ते काम मिळेल त्या परिस्थितीत करण्यास तयार आहेत. त्यांना इथे रोजगार व्यवसाय मिळतो म्हणून ते स्थायिक होतात. उलट मराठी तरुण बेरोजगारी मुळे हताश आणि उदासीन दिसतो. परप्रांतातून आलेल्या लोकांना आपली भाषा शिकण्याची आणि शिकवण्याची काही गरज नाही. उलट आपल्याच बेरोजगार तरुणांनी मिळेल ते काम मिळेल त्या परिस्थितीत थोडेसे जिद्दीने चिकाटीने केले तर इतर लोकांना इथे येण्याची आणि स्थायिक होण्याची संधी फार कमी होते.त्यामुळे भाषेच्या सक्तीपेक्षा रोजगाराची हमी देणारी धोरणे अधिक गरजेची वाटतात.

**निलेश साठे**

मराठी तरुणाला जर चांगला रोजगार, स्थिर उत्पन्न आणि प्रगतीची संधी मिळाली तर तो स्वतःहून आपल्या भाषेचा अभिमान बाळगेल. मराठी माणूस टिकला तर मराठी भाषा टिकेल आधी माणूस तर टिकवा. त्यासाठी प्रयत्न व्हायला पाहिजेत. आर्थिकदृष्ट्या सक्षम समाजच आपली संस्कृती आणि भाषा अधिक प्रभावीपणे जपू शकतो. फक्त घोषणांनी किंवा सक्तीने भाषेवर प्रेम निर्माण होत नाही; त्यासाठी आत्मविश्वास आणि सुरक्षित भविष्य आवश्यक असते.

आज अनेक तरुण स्पर्धा परीक्षा, खाजगी नोकऱ्या, व्यवसाय किंवा परदेशातील संधी यांच्या मागे धावत आहेत. त्यांना सर्वात मोठी गरज आहे ती रोजगाराची. जर शासनाने स्थानिक युवकांसाठी उद्योगांमध्ये ठराविक प्रमाणात नोकरी आरक्षण, कौशल्य विकास प्रशिक्षण, नवीन उद्योगांना प्रोत्साहन आणि स्टार्टअपसाठी आर्थिक मदत दिली तर परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलू शकते. मराठी भाषा टिकवायची असेल तर मराठी माणूस आर्थिकदृष्ट्या मजबूत झाला पाहिजे. रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या संधी निर्माण केल्या तर भाषा आपोआप जिवंत राहते. त्यामुळे आजची खरी गरज म्हणजे भाषेची सक्ती नव्हे, तर मराठी बेरोजगार तरुणांच्या रोजगाराची सक्ती होय. वेळप्रसंगी बेरोजगार मराठी तरुणांची मुंडी दाबून त्यांना काम करण्यास प्रवृत्त करले पाहिजे अशी भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. मुंबई पुण्यासारख्या शहरांमध्ये करायला गेलं तर खूप कामे आहेत. छोटे मोठे व्यवसाय आहेत. ते आपल्या मराठी तरुणांनी केले पाहिजेत. अख्ख्या महाराष्ट्रातील प्रत्येक घरातला एक तरी व्यक्ती काही ना काही तरी रोजगार उद्योग करत असायलाच पाहिजे, हे पाहणारी एखादी संघटना निर्माण करायला हवी. एका जरी घरात बेरोजगार तरुण असेल तरी त्याला हाताला धरून घेऊन काहीतरी काम करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. अशी वेळ येऊन ठेपलेली आहे. मराठीचा अभिमान फक्त घोषणांमध्ये नाही, तर मराठी युवकांच्या उज्ज्वल भविष्यात दिसला पाहिजे. **

## निवडक

### सात्विक-चिराग जोडी उपांत्य फेरीत

**सिंगापूर :** भारताच्या पीव्ही सिंधूला जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असणाऱ्या आन से यंगकडून सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ७५० दर्जा) उपांत्यपूर्व फेरीत पराभूत व्हावे लागले. पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने उपांत्य फेरीत स्थान मिळवले.दोन ऑलिम्पिक पदक विजेत्या सिंधूला कोरियाच्या यंगविरुद्ध दबावाखाली चांगला खेळ करता आला नाही. त्यामुळे सिंधूला १७-२१, १४-२१ असे पराभूत व्हावे लागले. सामन्याच्या सुरुवातीपासूनच यंगने सिंधूला पुनरागमन करण्याची फारशी संधी दिली नाही. महिला एकेरीत लक्ष्यला चुरशीच्या लढतीत जपानच्या कोकी वातानाबेकडून १९-२१, २१-१५, १५-२१ अशी हार पत्करावी लागली.पुरुष दुहेरीत भारताच्या चौथ्या मानांकित आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेत्या सात्विक-चिराग जोडीने मलेशियाच्या खाइ झिंग कांग आणि आरोन ताइ जोडीला १९-२१, २१-१७, २१-१३ असे पराभूत केले. उपांत्य फेरीत भारताच्या जोडीसमोर अग्रमानांकित किम वोन हो आणि सेऊ सेऊंग जाए जोडीचे आव्हान असेल. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला व तनिषा क्रॅस्टो जोडीला उपांत्य फेरीत चाल मिळाली. उपांत्यपूर्व सामन्याच्या पहिल्या गेममध्ये तिसऱ्या मानांकित शेन टांग जीए आणि तो ए वेई जोडीने माघारू घेतली. भारतीय जोडीची गाठ जपानच्या युइची शिमोगामी आणि सयाका होबाराशी होईल.

### जान्हवी ठरली ६४ घरांची 'राणी'

**मुंबई :** संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिलेल्या जान्हवी सोनेजी (१७९२) हिने एजीएम राजवीर नाहर (१८०१) याला बरोबरीत रोखले आणि अखिल भारतीय बुद्धिबळ मुंबई मास्टर्स स्पर्धेच्या चौथ्या सत्राचे विजेतेपद पटकावले. पेडर रोड येथील रशियन सेंटर फॉर सायन्स अँड कल्चरमधील मुंबई चेस सेंटरमध्ये या स्पर्धेचे रंगतदार सामने पार पडले. अंतिम फेरीपूर्वी आघाडीच्या खेळाडूंमध्ये असलेल्या जान्हवीने संपूर्ण




स्पर्धेत सातत्यपूर्ण खेळ केला. विजेतेपद निश्चित करताना तिने पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना स्कॉच ओपनिंगची निवड केली. जान्हवी आणि राजवीर यांनी तोडीस तोड चाली रचताना प्रतिस्पर्धी राजाला सातत्याने लक्ष्य केल्याने सामना रंगतदार झाला. काही मोहऱ्यांची अदलाबदल झाल्यानंतर हा सामना संतुलित स्थितीत पोहोचला. परंतु, कोणालाही निर्णायक आघाडी घेता आली नाही. ही बरोबरी जान्हवीसाठी विजेतेपद निश्चित करण्यास पुरेशी ठरली. तिने ८ फेऱ्यांत अपराजित राहून सर्वाधिक ७ गुणांसह जेतेपद निश्चित केले. विजेतेपदाची शर्यत अखेरपर्यंत चुरशीची राहिली. दुसऱ्या पटावर रेयांश वेंकट (१९०६) आणि मयूरेश पारकर (१७८१) यांचा महत्त्वपूर्ण सामना बरोबरीत सुटला, तर कुश अजय अग्रवाल (१८३५) याने गौरांग भंडारी (१८८९) याचा पराभव केला. अव्वल मानांकित श्रेयांश सोमय्या (१९७३) याने एआयएम आकाशकुमार यादव (१६०२) याला नमवून विजयी सांगता केली.

### ललित मोदी देणार शिष्यवृत्ती

**नवी दिल्ली :** आयपीएलचे संस्थापक आणि माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी १५ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशीला आयपीएलच्या इतिहासातील राजस्थान रॉयलची सर्वोत्तम खरेदी म्हटले आहे. गुजरात टायटन्सविरुद्ध क्वालिफायर २ मध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळताना वैभवने अवघ्या ४७ चेंडूंमध्ये ९६ धावांची धडाकेबाज खेळी केली. या स्फोटक खेळीदरम्यान वैभवने सात षटकार ठोकले. वैभव केवळ १५ वर्षांचा आहे आणि त्याची खेळी ही अत्यंत क्लासी आहे. मोठमोठ्या गोलंदाजानाही मैदानावर वैभव घाम फोडतो आणि सर्वांनीच त्याचे कौतुक केले आहे. त्याने या आयपीएलमध्ये अनेक रेकॉर्ड्सही मोडले आहेत. दरम्यान भारतासाठी त्याने खेळावे असं अनेकांचं म्हणणं आहे. वैभवच्या निर्भय फलंदाजीने प्रभावित होऊन, ललित मोदींनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक लांब आणि भावनिक पोस्ट लिहिली. त्यांनी वैभवच्या कामगिरीचे वर्णन धावांच्या पलीकडचे असे केले आणि त्याला जगभरात कुठेही मोफत शिक्षण घेण्यासाठी पूर्ण शिष्यवृत्तीची घोषणा केली. ललित मोदींनी आपल्या ट्विटमध्ये लिहिले, आज वैभव सूर्यवंशी कदाचित शतक पूर्ण करण्यापासून चार धावा दूर राहिला असेल, पण माझ्या मते त्याने त्याहूनही मोठी गोष्ट साध्य केली आहे. एक निर्भय तरुण प्रतिभा म्हणजे काय असते, हे त्याने संपूर्ण देशाला दाखवून दिले आहे.ललित मोदींनी ट्विटमध्ये पुढे लिहिले, खेळाने केवळ मनोरंजनच नाही तर संधीही निर्माण केल्या पाहिजेत, यावर माझा नेहमीच विश्वास राहिला आहे. त्यामुळे, जर वैभवला भविष्यात शिक्षण घेण्याची इच्छा झाली, तर मी त्याला जगातील कोणत्याही विद्यापीठात किंवा महाविद्यालयात पूर्ण शैक्षणिक शिष्यवृत्ती देऊ इच्छितो, ज्याचा संपूर्ण खर्च उचलला जाईल. हे त्याने केलेल्या धावांसाठी नाही. तर त्याने लाखो तरुण भारतीयांना दिलेल्या धैर्यासाठी, विश्वासासाठी आणि प्रेरणेसाठी आहे.

### सूर्यवंशीने नावावर केला महारेकॉर्ड

**मुंबई :** चंदीगडमध्ये गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्समध्ये क्वालिफायर २ चा सामना सुरू आहे. राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सला २१५ रन्सचे टार्गेट दिले होते. राजस्थान रॉयल्सकडून वैभव सूर्यवंशीने शानदार खेळी केली. त्याने महत्वपूर्ण अशा ९६ रन्स केल्या. त्याच्या जोरावर राजस्थानने २०० पार



टार्गेट पूर्ण केले. मात्र या सामन्यात वैभव सूर्यवंशीने आपल्या नावावर एक नवा रेकॉर्ड नोंदवला आहे. राजस्थानचा संघ सुरुवातीच्या ओव्हर्समध्ये अडचणीत सापडला होता. मात्र समोर विकेट्स जात असताना देखील वैभव सूर्यवंशीने तग धरून ठेवला. तसेच त्याने एक शानदार आणि आक्रमक खेळी केली. मात्र या सामन्यात देखील शतकापासून दूर राहिला. त्याने ९६ रन्सची खेळी केली. मात्र या खेळीच्या जोरावर त्याने आपल्या नावावर एक नवा रेकॉर्ड केला आहे. आयपीएलमध्ये सर्वात वेगवान १००० रन्स पूर्ण करण्याचा रेकॉर्ड त्याने आपल्या नावावर केला आहे. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने पूर्ण आयपीएल हंगामात शानदार खेळी केली आहे. वैभव सूर्यवंशी आयपीएलमधील सर्वात वेगवान १००० रन्स करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. असा रेकॉर्ड करणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. आजच्या सामन्यात आवश्यक असताना वैभव सूर्यवंशीने ९६ रन्सची खेळी केली. सध्या वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ मध्ये सर्वाधिक रन्स केल्या आहेत. वैभव सध्या ऑरेंज कॅपचा मानकरी ठरला आहे.

### आयपीएल क्रिकेट स्पर्धा; मार्केटिंग फंडा की पर्यावरणाची सेवा?

# ग्रीन डॉट बॉल मोहिमेवर प्रश्नचिन्ह

**| मुंबई | प्रतिनिधी |**

सध्या देशभरात आयपीएलचा ज्वर सातत्याने वाढत असून, दररोज संध्याकाळी करोडो क्रिकेटप्रेमी टीव्ही आणि मोबाईल स्क्रीनसमोर खिळून बसलेले दिसतात. सामन्यांदरम्यान फलंदाजांच्या चौकार-षटकारांचा आनंद घेताना, प्रेक्षकांना धावफलकावर निर्धाव चेंडूच्या जागी चमकणारा हिरवा ठिपका किंवा झाडाचे चिन्ह विशेष लक्षवेधी ठरत आहे.

बीसीसीआय आणि टाटा समूहाने पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सुरू केलेल्या ग्रीन क्रेडिट उपक्रमांतर्गत, प्ले-ऑफ फेरीतील प्रत्येक डॉट बॉलसाठी ५०० झाडे लावण्याचा संकल्प केला असून, याद्वारे आतापर्यंत तब्बल ६,२७,००० हून अधिक झाडे लावल्याचा भव्य दावा केला जात आहे. ही वृक्षारोपण मोहीम महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेशातील ओसाड जमिनींवर आणि गंगा-यमुना खोऱ्यात राबवली जात असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्ष जमिनीवर ही झाडे नक्की कुठे आहेत, याचा कोणताही अधिकृत अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही.




आजच्या आधुनिक डिजिटल युगात कोणत्याही मोठ्या पर्यावरणीय मोहिमेची सत्यता आणि पारदर्शकता सिद्ध करण्यासाठी जिओ-टॅगिंग आणि जीपीएस लोकेशन हे अत्यंत प्रभावी साधन मानले जाते. असे असतानाही, बीसीसीआयने या झाडांचे अचूक अक्षांश-रेखांश आणि प्रगतीची छायाचित्रे संकेतस्थळावर का उपलब्ध केली नाहीत, असा रास्त प्रश्न आता जागरूक क्रिकेटप्रेमी आणि पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित करत आहेत. केवळ जाहिरातींपुरता किंवा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत केला जाणारा हा एक मार्केटिंग फंडा तर नाही ना, अशी शंका जनमानसात निर्माण होत आहे. हा स्तुत्य उपक्रम कागदावरून उतरून प्रत्यक्ष जमिनीवर दिसावा यासाठी त्याचा पारदर्शक अहवाल जाहीर करणे ही काळाची गरज आहे.

> "स्क्रीनवर ६ लाखांपेक्षा जास्त झाडे लावल्याचा आकडा दाखवला जातोय, पण ही झाडे नक्की कुठे आहेत? आजच्या डिजिटल युगात बीसीसीआयने या झाडांचे जिओ-टॅगिंग करून त्यांची अचूक लोकेशन आणि फोटो जनतेसाठी खुले करायला हवेत, तरच या उपक्रमावर विश्वास बसेल.
> – संघर्ष जाधव
> एक जागरूक क्रिकेटप्रेमी,"

यासोबतच, वीस वर्षांच्या अथक प्रतीक्षेनंतर तयार झालेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणात कोकणातील हजारो जुनी आणि डेरेदार झाडे नष्ट झाली असल्याने, बीसीसीआयने औदार्य दाखवून या निधीचा मोठा हिस्सा या महामार्गाच्या कडेला वनीकरण करण्यासाठी वापरावा; ज्यामुळे कोकणच्या निसर्गाला नवसंजीवनी मिळेल आणि या मोहिमेचे खऱ्या अर्थाने संधीचे सोने होईल, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.केवळ स्क्रीनवर हिरवा ठिपका चमकावून पर्यावरण हिरवेगार होत नाही, तर त्यासाठी प्रत्यक्ष माती ओली व्हावी लागते. बीसीसीआयने केवळ आकडेवारीचा खेळ न खेळता कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीला उत्तरदायित्वाची जोड द्यावी.

केवळ पडद्यावर झाडांचे आकडे दाखवून चालणार नाही; ती लाखो झाडे प्रत्यक्ष जमिनीवर कुठे लावली आहेत, याचे जीपीएस लोकेशन आणि पारदर्शक अहवाल बीसीसीआयने जाहीर करावा.

## पंतने लखनौचे कर्णधारपद सोडले

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

ऋषभ पंतने आयपीएल फ्रँचायझी लखनौ सुपर जायंट्सचे कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. फ्रँचायझीने निवेदन जारी करून सांगितले की, पंतने स्वतःच कर्णधारपद सोडण्याची विनंती केली होती, जी स्वीकारण्यात आली आहे. लखनौचा संघ या हंगामात १०व्या आणि शेवटच्या स्थानावर राहिला.

मागील हंगामातही संघाची कामगिरी चांगली नव्हती आणि तो सातव्या स्थानावर राहिला होता. दोन हंगामांत पंतच्या कर्णधारपदी लखनऊने २८ सामन्यांपैकी केवळ १० मध्येच विजय मिळवला आहे.

लखनौचे क्रिकेट संचालक टॉम मूडी यांनी या निर्णयाची माहिती देताना सांगितले की, पंतने या विनंतीसह फ्रँचायझीशी संपर्क साधला होता आणि आम्ही ती आदराने स्वीकारली आहे. खेळात असे निर्णय कधीही सोपे नसतात.

मूडी म्हणाले, पंतने कर्णधार म्हणून या ड्रेसिंग रूमला जे काही दिले आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे खूप आभारी आहोत. लखनौ सुपर जायंट्सने पंतला २७ कोटी रुपयांना विकत घेतले होते, त्यामुळे त्याच्या कामगिरीवर लक्ष ठेवले जात होते.

## महाराष्ट्राच्या मुलांनी पटकावले विजेतेपद

### बीच लगोरी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा; मुलींमध्ये हरियाणा विजेते

**| विरार | प्रतिनिधी |**

लगोरी स्पोर्ट फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेली देशातील पहिली बीच लगोरी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २०२६ वसई-विरार येथील भुलगाव बीचवर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत देशभरातील १५ मुलांचे आणि १५ मुलींचे संघ सहभागी झाले होते.



स्पर्धेच्या अंतिम सामन्यांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, संघभावना आणि जिद्दीचे प्रदर्शन करत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. विशेषतः महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने शानदार कामगिरी करत राष्ट्रीय विजेतेपद पटकावले, तर मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळवून राज्याचा गौरव वाढविला.

महाराष्ट्र मुलींच्या संघाच्या यशामागे प्रशिक्षक करण गौड आणि विशाल यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. महाराष्ट्र मुलांच्या संघाचे प्रशिक्षक श्रेयस रामबडे आणि बरकत शेख यांनी संघाला विजेतेपदापर्यंत पोहोचविण्यात रोलाचे योगदान दिले. बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रदीपिका सिंग, ख्याती घरत, अरुणा दाभरे, मार्शल लोपीस आणि रोहन सावंत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना चषक आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

## इगा श्वीऑटेकची आगेकूच

### ■ पुरुष एकेरीत त्सित्सिपास पराभूत

**| पॅरिस | वृत्तसंस्था |**

चारवेळच्या विजेत्या इगा श्वीऑटेक हिने आपली दमदार आगेकूच कायम राखताना फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या चौथ्या फेरीत प्रवेश केला. श्वीऑटेकने आपल्या देशाच्या मॅग्डा लिनेट्टेचा सहज पराभव केला.

चौथ्या फेरीत श्वीऑटेकची गाठ ही युक्रेनच्या मार्टा कोस्त्युक हिच्याशी पडणार आहे. यंदाच्या हंगामात कोस्त्युकने क्ले कोर्टवर सलग चौदा सामन्यात अपराजित आहे. पंधराव्या मानांकित कोस्त्युकने स्वित्झर्लंडच्या व्हिक्टोरिया गोलुबिच हिचा पराभव केला. महिला एकेरीतच आठव्या मानांकित मिरा आंड्रीवा हिने आगेकूच कायम राखताना चौथ्या फेरीत प्रवेश केला. मिराने चेक प्रजासत्ताकच्या मारी बोझकोव्हचा सरळ सेटमध्ये पराभव केला.

पुरुष एकेरीत इटलीच्या मॅटेओ अर्नाल्डी विरुद्ध वैद्यकीय वेळ घेत त्सित्सिपासने कोर्टवरच उपचार करून घेतले होते. त्याचा परिणाम माजी उपविजेत्या त्सित्सिपासच्या खेळावर झाला. दुसऱ्या फेरीत चार सेटपर्यंत रंगलेल्या या लढतीत अर्नाल्डीने विजय मिळला.

याच गटातील अन्य लढतीत रशियाच्या आंद्र रुब्लेवने आपले आव्हान कायम राखले. लवचिकता आणि कौशल्यतेचे सुरेख प्रदर्शन करताना रुब्लेवने तिसऱ्या फेरीत पोर्तुगालच्या नुनो बोर्जेसचा पराभव केला. तर, पाब्लो कारेनो बुस्टाने अर्जेन्टिनाच्या टिरांटेचा चार सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत पराभव केला. इटलीच्या माट्टेओ बेरेट्टिनी याने तिसरी फेरी गाठताना आर्थर रिंडरकेंचचा पराभव केला.

## गुजरातची फायनलमध्ये धडक

**नवी दिल्ली :** कॅप्टन शुबमन गिल याने केलेलं शतक आणि साई सुदर्शन याच्या अर्धशतकाच्या जोरावर गुजरात टायटन्सने राजस्थान रॉयल्सवर दणदणीत विजय मिळवून अंतिम फेरीत धडक दिली आहे. राजस्थान रॉयल्सने वैभव सूर्यवंशी याने केलेल्या ९६ रन्सच्या जोरावर गुजरातसमोर २१५ धावांचं आव्हान ठेवलं होतं. गुजरातने हे आव्हान एकतर्फी फरकाने पूर्ण करुन ७ विकेट्सने विजय मिळवला आहे. गुजरातने विजयी आव्हान ८ बॉलआधी पूर्ण केलं. गुजरातने १८.४ ओव्हरमध्ये ३ विकेट्स गमावून २१९ धावा केल्या.

## वैभवची भारतीय संघात जागा पक्की

### ■ सूर्यादादाला मिळणार टीममधून डच्चू

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आयपीएल २०२६ मध्ये आपल्या बॅटने धुमाकूळ घालणारा वैभव सूर्यवंशी लवकरच भारतीय संघात पदार्पण करू शकतो. बीसीसीआयने यावर्षी सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांसाठी १५ वर्षीय सूर्यवंशीचा संभाव्य खेळाडूंच्या यादीत समावेश केला आहे.

आशियाई खेळांमध्ये सूर्या भारतीय संघाचा कर्णधार असणार नाही. बीसीसीआयने संभाव्य खेळाडूंच्या यादीत त्याच्या नावाचा समावेश केलेला नाही. बीसीसीआयच्या खेळाडूंच्या या मोठ्या यादीत वैभव सूर्यवंशी, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत आणि यशस्वी जयस्वाल यांचा समावेश आहे.

आशियाई खेळांसाठी बीसीसीआयच्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत ३० क्रिकेटपटूंचा समावेश आहे, त्यापैकी १५ खेळाडूंची संघात निवड केली जाईल. २०२३ मध्ये ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली भारताने सुवर्णपदक जिंकले होते. त्या विजेत्या संघातील गायकवाडसह नऊ खेळाडूंचा संभाव्य खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

आशियाई खेळ सप्टेंबरमध्ये होणार आहेत, परंतु वैभव सूर्यवंशी त्यापूर्वीच भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण करू शकतो. आशियाई खेळांपूर्वी, भारतीय संघ पुढील महिन्यात आयर्लंडविरुद्ध दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका, जुलैमध्ये इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका आणि तीन एकदिवसीय सामने, झिम्बाब्वेविरुद्ध तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने आणि ऑगस्टमध्ये श्रीलंकेविरुद्ध दोन कसोटी आणि दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहे.

व्हीव्हीएस लक्ष्मण आशियाई खेळांमध्ये भारतीय संघाचे प्रशिक्षक असू शकतात. भारताचे मुख्य प्रशिक्षक संघासोबत जाणार नाहीत. आशियाई खेळांमधील पुरुषांची क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. याच काळात भारतीय संघ २७ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत वेस्ट इंडिजविरुद्ध तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे.

**संभाव्य क्रिकेटपटूंची यादी:**

इशान किशन, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत, अभिषेक शर्मा, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, आयुष बडोनी, अनुकुल रॉय, अक्षर पटेल, हर्ष दुबे, ध्रुव जुरेल, हार्दिक पंड्या, खलील अहमद, हर्षित राणा, जसप्रीत बुमराह, नितीश कृष्णा रेड्डी, प्रदीप रेड्डी, कृष्णा रेड्डी, खलील अहमद, श्रेयस अय्यर, रिंकू सिंग, संजू सॅमसन, ऋतुराज गायकवाड, शिवम दुबे, शाहबाज अहमद, तिलक वर्मा, वैभव सूर्यवंशी, विपराज निगम, वॉशिंग्टन सुंदर, यशस्वी जयस्वाल आणि यश ठाकूर.

## आयर्लंडला हरवून न्यूझीलंडने जिंकली कसोटी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

### ■ कीवी संघाचा एक डाव आणि ७९ धावांनी विजय; ब्लेअर टिकनरने पहिल्यांदाच ५ बळी घेतले

न्यूझीलंडने बेलफास्ट कसोटीत आयर्लंडला एक डाव आणि ७९ धावांनी हरवले. शुक्रवारी फॉलोऑन खेळायला उतरलेल्या आयर्लंडचा संघ दुसऱ्या डावात २३२ धावांवर ऑलआउट झाला. वेगवान गोलंदाज ब्लेअर टिकनरने कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच ५ बळी घेतले. आयर्लंडने तिसऱ्या दिवसाची सुरुवात ६५/२ अशी केली आणि २३२ धावांवर ऑलआउट झाले. पहिल्या डावात त्यांनी १७९ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडने पहिल्या डावात ४९० धावा केल्या होत्या. टॉम ब्लेंडल आणि रचिन रवींद्रने शतकी खेळी केल्या.ब्लेंडलला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी आयर्लंड २४६ धावांनी मागे होती. पहिल्या डावात ६ बळी घेणाऱ्या नॅथन स्मिथने सकाळी पहिल्या ५ षटकांत नाइटवॉचर थॉमस मेसला स्लिपमध्ये झेलबाद करून आयर्लंडला पहिला धक्का दिला.ब्लेअर टिकनरच्या वेगवान बाउन्सरने हॅरी टेक्टरच्या बॅटच्या हँडलला स्पर्श केला आणि तो स्लिपमध्ये झेलबाद झाला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कर्टिस कॅम्पला टिकनरचा उसळता चेंडू सांभाळता आला नाही आणि चेंडू त्याच्या डाव्या हाताला लागला. कॅम्प वेदनेने विव्हळला आणि ४ धावांवर रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाबाहेर गेला. त्याला तात्काळ स्कॅनसाठी रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर सलामीवीर स्टीफन डोहेनी टिकनरच्या शॉर्ट डिलिव्हरीवर गल्लीमध्ये झेलबाद झाला. बाद होण्यापूर्वी डोहेनीने ५१ धावा केल्या. लंचपर्यंत आयर्लंडने १३१ धावांवर ५ गडी गमावले होते.

लंचनंतर विकेटकीपर फलंदाज लॉर्कन टकरने प्रतिहल्ला सुरू केला आणि ६९ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले. मात्र, अर्धशतक पूर्ण करताच तो पुढच्या चेंडूवर टिकनरचा बळी ठरला.

भुवीला मोठा झटका | अंतिम सामन्याकडे लागले लक्ष

# ऑरेंज-पर्पल कॅपसाठी महाथरार!

**| मुंबई | प्रतिनिधी |**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून क्रिकेट चाहत्यांचे लक्ष केवळ ट्रॉफीकडेच नाही, तर ऑरेंज आणि पर्पल कॅपच्या शर्यतीकडेही लागले आहे. यंदाच्या हंगामात अनेक खेळाडूंनी दमदार कामगिरी केली, पण फलंदाजी आणि गोलंदाजीतील सर्वोत्तम खेळाडू ठरण्यासाठी आता अंतिम सामन्यात निर्णायक लढत पाहायला मिळणार आहे. अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात होणार असून या सामन्यानंतरच ऑरेंज-पर्पल कॅप पुरस्कारांचे चित्र स्पष्ट होणार आहे.




**भुवनेश्वरने गमावली ऑरेंज कॅप**

दुसरीकडे, पर्पल कॅपच्या शर्यतीतही मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत आरसीबीचा अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार आघाडीवर होता. मात्र क्वालिफायर २ नंतर मात्र गुजरात टायटन्सचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने क्वालिफायर सामन्यात शानदार गोलंदाजी करत त्याला मागे टाकले. रबाडाने महत्त्वाच्या क्षणी विकेट्स घेत संघाला अंतिम फेरीत पोहोचवण्यात मोठे योगदान दिले. भुवनेश्वर कुमारने यंदाच्या हंगामात अत्यंत उत्कृष्ट गोलंदाजी केली असून त्याचा इकॉनॉमी रेटही चांगला राहिला आहे. त्यामुळे अंतिम सामन्यात तो पुन्हा पर्पल कॅप मिळवतो का, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे. २०२६ चा अंतिम सामना केवळ ट्रॉफीसाठीच नव्हे, तर वैयक्तिक पुरस्कारांच्या निर्णायक लढतीसाठीही खास ठरणार आहे. ऑरेंज कॅप कोण जिंकणार आणि पर्पल कॅप कोणाच्या डोक्यावर राहणार, याचा फैसला आता अंतिम सामन्यात होणार आहे.

### गिल अन् साई सुदर्शनमध्ये स्पर्धा

ऑरेंज कॅपच्या शर्यतीत गुजरात टायटन्सचे कर्णधार शुभमन गिल आणि युवा फलंदाज साई सुदर्शन यांच्यात जोरदार स्पर्धा आहे. दोन्ही खेळाडूंनी संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण फलंदाजी करत संघाला विजय मिळवून दिले. शुभमन गिलने आपल्या आक्रमक शैलीत मोठ्या धावा केल्या, तर साई सुदर्शनने शांत आणि संयमी खेळी करत सर्वांचे लक्ष वेधले. अंतिम सामन्यात कोण मोठी खेळी करतो, यावर ऑरेंज कॅपचा निकाल अवलंबून असणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)